म. ग्रं सं. वाचनालय, ठाणे
विषय चा० च०
दा. क्र. ५६५७



IRBK-0105657

# स्वराज्यमंत्रद्रष्टे दादाभाई नौरोजी

स्वराज्य मंत्रद्रष्टे

# दादाभाई नौरोजी

☆

[illegible] ५९५८ [illegible]

लेखक

श्री. अभिराग

IRBK-0105657

किंमत बारा आणे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. ( टिळक )
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

☆

नवीन सुधारलेली आवृत्ति

☆

जून १९५६

☆

सर्व हक्क स्वाधीन

# प्रास्ताविक

हिंदुस्थानांत इंग्रजी राजवट सुरू झाली तेव्हांपासूनच त्या परकीय सत्तेविरुद्ध जाणत्या लोकांत असंतोष उत्पन्न झाला होता. ‘ परमेश्वरी इच्छेनें इंग्रजी राज्य येथें स्थापित झालें,’ असा कांहीं लोकांचा समज झाला असला तरी त्या राजवटीबद्दल असंतोष त्यांच्यांतहि निर्माण झाला होताच, या असंतोषाचा उद्रेक स. १८५७ मध्यें प्रकट रूपानें झाला असला तरीहि तत्पूर्वी त्या राजवटींतील दोष दाखवून ते सुधारण्याचा सनदशीरपणें प्रयत्न सुरू झालेला होता.

दादाभाई नौरोजी इंग्लंडला प्रथम जाण्यापूर्वीच म्हणजे स. १८५० च्या सुमारास मुंबईत जाहीरसभा भरून हिंदी लोकांच्या मागण्या काय आहेत त्या स्पष्ट स्वरूपांत पार्लमेंटाला सादर केल्या होत्या व त्या मागण्याचें स्वरूप पाहतां देशाचा बव्हंशीं कारभार देशी लोकांच्या हातीं द्यावा असेंच होतें. आणि या चळवळीचे आद्य प्रवर्तक हिंदुस्थानचे प्रपितामह दादाभाई नौरोजी हे होत.

दादाभाईंचें सर्व चरित्रच अत्यंतिक त्याग व भारतहितासाठीं केलेल्या अविश्रान्त परिश्रमानें भरलेलें आढळतें. त्यांनीं हिंदुस्थानापेक्षां हिंदुस्थानाबाहेर राहून इंग्लंडमध्यें येऊन जाऊन सतत पन्नास वर्षें वास्तव्य करून ब्रिटिशजनतेला गदगदून हालविण्याचे दीर्घ प्रयत्न केले. कारण त्यांची अशी श्रद्धा होती कीं, इंग्रज माणूस हा जात्या स्वातंत्र्यप्रिय आहे व तो आपल्या देशांतील राज्यकारभार ज्या पद्धतीनें करतो त्या पद्धतीनें त्यानें हिंदुस्थानांतहि राज्यकारभार करावा. त्यांनीं हजारों व्याख्यानें दिलीं. शेंकडों लेख त्यांनीं लिहिले व ते असे अभ्यासपूर्ण कीं विरोधकांना त्यांत बोटहि शिरकावितां येऊं नये.

त्यांची इंग्लंडमधील कामगिरी पाहिली म्हणजे त्यांना कोणी मवाळ म्हणण्यास धजणार नाहीं. इतक्या पोट–तिडिकेनें ते बोलत कीं, इंग्रजांचा हृदयभेदच व्हावा व या त्यांच्या तळमळीनें त्यांना इंग्लंडमध्यें अनेक आंग्ल स्त्री पुरुष सहकारी लाभले व त्यांच्या साहाय्यानें त्यांना पार्लमेंटचे सभासदहि होतां आलें. सिंहाच्या गुहेंत शिरून त्याची आयाळ उपटण्याचें जें कार्य दादाभाईंनीं केलें, त्याला मोल नाहीं. अखेर अखेरीस त्यांचा इंग्रजां-

वरील विश्वासहि डळमळूं लागला असावा असें वाटतें, कारण आमस्तरदाम येथील जागतिक मजूर परिषदेंत त्यांनीं भाग घेऊन तेथें हिंदी कैफियत प्रभावीपणें मांडली. त्या वेळीं ते वृद्धावस्थेंत होते. नहून त्यांनीं मजूरपक्षांत सामील होऊन राजकारण खात्रीनें केलें असतें आणि मजूरपक्ष भारताला स्वराज्य द्यावें अशा मताचा सामान्यतः होताच. परंतु त्या वेळीं त्यांचें प्रभावी संघटन नव्हतें.

दादाभाईंनीं राजकारण केलें तें अखिल भारतासाठीं. विशिष्ट जमातीसाठीं त्यांनीं चळवळ केलेली नाहीं. उलट सर सय्यद अहमद यांनीं सवता सुभा काढला, त्याचा त्यांनीं निषेधच केला आहे. देशांत एकजुटीनें चळवळ करण्याकडे त्यांचा फार कटाक्ष होता. रानडे-गोखले प्रभृतींनीं पुण्याची सार्वजनिक सभा सोडली, त्या वेळीं त्यांनीं श्री. महादेवराव नामजोशी यांना पत्र लिहून अशी विघटना होऊं देऊं नका, असें लिहिलें. अशीं अनेक उदाहरणें सांगतां येतील.

स्त्रीशिक्षणाचा आद्य पुरस्कर्ता, त्याचप्रमाणें राजकीय चळवळ प्रतिष्ठितपणें व प्रभावीपणें करण्यांत अग्रेसर, अत्यंत त्यागी, पैशाचा वा मानाचा लोभ कधींहि न धरणारा, सरकारनें देऊं केलेल्या पदव्या त्यांनीं साभार नाकारल्या. असा हा नरोत्तम होता. त्याचप्रमाणें आरंभीं जरी ते व्यापारीपेशांत पडले व तोच व्यवसाय त्यांनीं पुढें चालविला असता तर टाटा, अगर वाडियाप्रमाणें तेहि कोट्याधीशांत मोडूं लागले असते. परंतु त्यांनीं ते मोह बाजूला सारून केवळ हिंदुस्थानचें कल्याण हीच एकमेव दृष्टि आपणापुढें ठेवून त्यासाठीं आमरण देह झिजविला. आणि म्हणूनच हिंदुस्थानची राजकीय त्रयी म्हणून कोणती हें सांगतांना, दादाभाई हे प्रपितामह, लोकमान्य टिळक हे पितामह व म. गांधी हे पिताजी, असेंच म्हणावें लागेल.

या थोर पुरुषाचें चरित्र थोडक्यांत निवेदन केलें आहे तें वाचकांस आवडेल अशी अपेक्षा आहे.

पुणें ५।५।५६ अभिराग

स्वराज्य मंत्रद्रष्टे

# दा दा भा ई नौ रो जी

## १. विषय-प्रवेश

**भारतांत** विदेशीयांचें आक्रमण दोन प्रकारांनीं झालें; एक युद्धपिपासू म्हणून भारतांत घुसले. त्यांत अलेक्झांडर महंमद कासीमपासून सुरुवात होते. अलेक्झांडर व त्यानंतरच्या ग्रीस लोकांच्या आक्रमणाला भारतीयांनीं यशस्वीपणें तोंड देऊन त्यांचा हिंदुस्थानचा मार्गच बंद केला, परंतु महंमद कासीम, तैमुरलंग, गझनीचा महमंद प्रभृतींच्या आक्रमणाला, आपसांतील यादवीमुळें प्रभावी तोंड न देतां आल्यानें त्यांनीं भारतांत आपली सत्ता बद्धमूल केली. मध्यंतरीं मराठ्यांनीं या आक्रमणाला आळा घातला होता; परंतु कालांतरानें अंतस्थकलहानें जर्जर झालेल्या भारताला त्याचें निर्मूलन न करतां आल्याकारणानें इस्लामी सत्ता नष्ट न होतां आज तिचें पर्यवसान भारत-विच्छेदनांत, पाकिस्तान-निर्मितींत कसें झालें हा इतिहास ताजा आहे.

मुस्लीमांखेरीज दुसरीहि एक जमात भारतांत फार पूर्वकालीं आली, पण ती आक्रमक म्हणून नव्हे तर आश्रयार्थी म्हणून ! आणि ती जमात पारशांची. स्वदेशांत त्यांना मानानें जगतां येईनासें झालें तेव्हां त्यांनीं भारताचा आश्रय घेतला आणि भारतानेंहि आपल्या उदारतेस अनुसरून त्यांना आश्रय दिला आणि या जमातीनें भारताचे हे उपकार कृतज्ञतापूर्वक स्मरले आहेत. भारतीय आशाआकांक्षेशीं विदेशीयांपैकीं केवळ पारशी समाजच एकरूप झाला. त्या समाजानें आपल्या जमातीचा स्वाभिमान व चालीरीति कायम राखल्या असूनहि तो समाज भारताशीं एकरूप झालेला आहे.

याचें दुसरेंहि एक कारण असण्याचा संभव आहे. भारतीय वैदिक धर्मानुयायांप्रमाणें ही जमात अग्नि व सूर्योपासक आहे. त्यांचा धर्मग्रंथ झेंदा अवेस्ता व वेद यांमध्यें त्यांचें मूळ स्वरूप एकच असावें कीं काय इतकें वाटण्याइतपत साधर्म्य आहे; पण हें कांहींहि असलें तरी पारशी जमात भारतीय आकांक्षांशीं पूर्णतः एकरूप झाली आहे, असें म्हणण्यांत किंचितहि अतिशयोक्ति नाहीं. पारशी जमात ही व्यापार-धंद्यांत निष्णात. त्यांनीं अलोट संपत्ति संपादन केली व ती मुक्तहस्तानें दान करण्यांतहि ते मागें राहिलेले नाहींत. टाटा, वाडिया यांनीं मोठमोठे विश्वस्त निधि निर्माण केले व त्या निधींतून देशांतील जाती वा धर्म यांचा विचार मनांतहि न आणतां त्यांनीं भरपूर द्रव्यसाहाय्य केलेलें आहे. निदान महाराष्ट्रतरी या गोष्टीस अपरिचित नाहीं, व ही गोष्ट कृतज्ञताबुद्धीनें मान्य केलीच पाहिजे.

व्यापार व दानधर्म या बाबतींत त्यांनीं जशी ज्ञातिनिरपेक्षबुद्धि दाखविली, त्याप्रमाणें राजकारणांतहि हिंदी आकांक्षांना सदैव पाठिंबाच

दिला आहे. सर जमशेटजी टाटा, देशभक्त दादाभाई नौरोजी, सर फेरोजशाह मेथा, श्री. वाच्छा यांचीं उदाहरणें या आमच्या विधानांस साक्ष आहेत. वस्तुतः भारतांत ही जमात अत्यंत अल्पसंख्य असतां, ब्रिटिश अमदानींत अल्पसंख्याकांच्या रक्षणाचें जें बीज ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं पेरून ठेवलें होतें, त्याचा लाभ त्यांनीं मागितला असतां तर त्याबद्दल कोणी तक्रारहि केली नसती, इतका तो समाजच अल्पसंख्य होता व आहेहि. परंतु अल्पसंख्यांक रक्षणाचें ब्रिटिशांनीं उठविलेलें पिशाच्च हें राष्ट्रघातक आहे आणि त्यामुळें देशांत निश्चितपणें दुहीच माजेल–आणि त्याचा आज आपण अनुभव घेतच आहों–या खात्रीनें त्या सुविद्य समाजानें स्वजातीसाठीं म्हणून विशेष राजकीय हक्क संपादन करण्याची केव्हांच खटपट केली नाहीं. उलट सर्व भारताला हितकारक होतील अशाच गोष्टी त्यांनीं केल्या.कायदेमंडळांत भांडणें भांडलीं तीं सर्व देशासाठीं, विलायतेंत चळवळ केली ती सर्व देशासाठीं. आपली जन्मभूमि भारत आहे, तिला मातृस्वरूप मानूनच त्यांनीं हरएक प्रकाराच्या चळवळी केल्या. मॅडम कामा यांचें या संबंधांतील उदाहरण देतां येण्यासारखें आहे. त्या थोर भगिनीनें भारताच्या सेवेसाठींच आपलें सर्वस्व वेचलें, ही गोष्ट विसरतां यावयाची नाहीं.

अशा प्रकारची पारशांची जमात राष्ट्रीय वृत्तीची आहे. त्यांचा मूळ देश इराण. तेथून ते भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन उतरले व नवसारी भागांत येऊन स्थाईक झाले. पारशी लोक भारतांत आल्यानंतर त्यांनीं कित्येक भारतीय चालीरीति आत्मसात केल्या. इंग्रजी अमलापूर्वीं नवसारी वगैरे भागांवर मराठ्यांची सत्ता होती. पुढें पेशवाई बुडल्यानंतर इंग्रजी अंमल दृढ झाला व त्यांनीं महाराष्ट्रां-

तील सत्ता-केंद्र मुंबई बेट केलें. इंग्लंडहून येण्याजाण्याला सोयीवार बंदर म्हणून साहजिकच या बेटाला महत्त्व येऊं लागलें व तेथील व्यापार उदीम वाढूं लागला. पारशी जमात ही हाडाची व्यापारी; त्यांनीं या क्षेत्रांत प्रवेश करून अल्पावधींतच आपलें बस्तान चांगल्या प्रकारें बसविलें.

● ● ●

## २. कुलवृत्तान्त व बालपण

पारशी लोक प्रथमतः भारताच्या किनाऱ्यावर उतरून ज्या टापूंत स्थाईक झाले, त्यांत नवसारी हें गांव आहे. या भागाला नागमंडल असें जुनें नांव आहे. नवसारीचा सर्व भाग गायकवाडाच्या राज्यांत मोडत असे. नवसारी हें गांव पारशी लोकांत पारशी विद्वानांचें एका काळीं आगर समजलें जाई. दादाभाईंच्या पूर्वजांचा धंदाहि भिक्षुकीचाच होता. या गांवाला अनेक दृष्टींनीं महत्त्व प्राप्त झालेलें आहे. सर जमशेटजी जिजीभाई व जमशेटजी टाटा यांचें मूळ गांव नवसारीच होय! दादाभाईंचे पूर्वजाहि याच गांवचे राहिवाशी. नवसारीपासून जवळच असलेल्या धरमपूर संस्थानांत त्यांनीं कांहीं मिळकत संपादन केली होती व दादाभाईंचें आजे व पिताजी हेहि तेथेंच वास्तव्य करीत.

नवसारी येथें प्रथम आलेले झरथोस्ट मोबेद हे दादाभाईंचे पूर्वज. भिक्षुकीचा धंदा पिढीजाद असल्यानें पित्यानें मुलाला त्या कर्मांत तयार करावयाचें ही पूर्वापर पद्धति. दादाभाईंचे वडील त्यांच्या अगदीं बालपणींच वारल्यानें त्यांच्या मागें भिक्षुकीचें लचांड लागलें नाहीं,

इतकेंच. दादाभाईंचे एक पूर्वज चांदजी कामदिन म्हणून होते. ते उत्कृष्ट अत्तरें तयार करीत. त्यांचा लौकिक त्या वेळीं विद्यमान असलेल्या नूरजहानच्या कानावर गेला व जहांगीर अहमदाबादेस गेला असतांना त्यानें चांदजींना बोलावून नेलें. चांदजीनें उत्तम अत्तराच्या चार शिशा जहांगिरास दिल्या व बादशहानें खूष होऊन चांदजीला नवसारीस शंभर बिघे जमीन देणगीदाखल दिली. त्यासंबंधानें बादशाही हुकूम २४ ऑगस्ट १६१८ या तारखेचा आहे.

नवसारीमध्यें दादाभाईंचा पूर्वज स. १२०१ च्या सुमारास स्थाईक झाला. त्याचें नांव झरथोस्ट मोबेद. त्यांच्यापासून दादाभाई नववे वंशज होत. दादाभाईंचे वडील नौरोजी पालनजी दोर्डी हे मुंबईस आपली पत्नी माणकबाई यांसह स्थाईक झाले व त्यांच्या पोटीं दि. ४ सप्टेंबर १८२५ रोजीं दादाभाईंचा जन्म झाला. दादाभाई हें हिंदु नांव स्वयंस्फूर्तीनें दिलेलें असो वा जाणून बुजून दिलेलें असो, हे दादाभाई कालांतरानें हिंदुस्थानचे ‘दादा’ झाले हें मात्र सत्य होय. दादाभाईंचे वडील ते अल्पवयी असतांनाच वारले. तेव्हां त्यांना त्यांच्या मातेनेंच उत्तम शिक्षण दिलें. माणकबाई स्वतः शिकलेल्या नसल्या तरी त्यांना शिक्षणाचें महत्त्व उत्कृष्ट कळत होतें. आपल्या बालपणाच्या दिवसाबद्दल खुद्द दादाभाई म्हणतात:—

“मी आपल्या आईबापांचा एकुलता एक मुलगा. माझ्या मातेचें जीवन सर्वस्वच मी झालों होतों. तिचे बंधु तिला थोडीफार मदत करीत; पण ती स्वतः कष्ट करून मला तिनें कधींच कमी पडूं दिलें नाहीं. आज मी जो दिसतो आहे तो माझ्या आईनें बनविला आहे. स्त्री-शिक्षणाच्या कामीं व इतर समाजसुधारणेच्या कामीं तिनें मला सर्वदा पाठिंबाच दिला आहे.”

आपल्या बालपणाबद्दल दादाभाई सांगतात:—

" नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी " नांवाची संस्था नुकतीच स्थापन झाली होती. तींत इंग्रजी व देशी भाषांतून शिक्षण देण्यांत येई. आमच्या मेहताजींनीं आपला मुलगा त्या शाळेंत पाठविला व मलाहि त्याच शाळेंत घालावा असें माझ्या आईचें मन वळविलें. या शाळेंत शिक्षण अगदीं मोफत असे. फी देऊन शिक्षण असतें तर माझ्या आईनें त्याला कधींहि संमति दिली नसती, कारण फी देण्या-इतकीहि तिची ऐपत नव्हती. मोफत शिक्षणाचा मला असा फायदा झाला ही गोष्ट मी कधींच विसरलों नाहीं, व म्हणून सरकारनें शिक्षण मोफत करावें अशी मागणी मी पुढें संधि मिळेल तेव्हां करीत असें.

" माझा गणित विषय उत्तम असे व त्यांतहि दिसायला मी जरा बरा असल्यानें मी त्या शाळेंत एक ' प्रदर्शनीय मुलगा ' झालों होतों. कित्येक समारंभाचे वेळीं आम्हां मुलांच्या परीक्षा घेत, तेव्हां मीं अनेकदां वाहवा मिळविली आहे.

"आमच्या शाळेंत दोन युरोपियन शिक्षक असत.एक भाषाविषया-साठीं व दुसरा गणितासाठीं. या दोन शिक्षकांत कांहीं तरी वाद झाला व त्यांनीं शाळेचे दोन भाग केले. शिक्षकांपैकीं एकजण अत्यंत शिस्तीनें वागणारा व दुसरा असाच गबाळ्या होता. मी दुसऱ्याच्या वांटणींत गेलों.वर्गात विद्यार्थी कसेहि वागले तरी आमचे गुरुजी तिकडे फारसें लक्ष देत नसत. पण मी मुलांच्या गोंधळांत कधीं गेलों नाहीं. माझी बुद्धि चांगली तीव्र होती. स्मरणशक्ति चांगली असल्यानें गोष्टींचा भरणा मजजवळ भरपूर होता. शाळेंत मी मुलांना गोष्टी

सांगे व त्यांचे माझ्या भोंवतीं कडें पडे. वहुतेक विद्यार्थी शिक्षकाचें लक्ष नसल्यानें बाहेर जाऊन सर्व दिवस खेळत. त्यांतहि मी तयार होतों. खेळांत व गोष्टी सांगण्यांत माझें नैपुण्य असल्यानें मी मुलांचा पुढारी सहजच बनलों होतों. खेळांत विटीदांडूचा खेळ मला फार आवडे, व दररोज आम्ही एस्प्लेनेड मैदानावर तासभर तरी खेळत असूं.

"अशाच एका प्रसंगीं रस्त्यावर कांहीं मुलें अपशब्द बोलत असतांना मीं ऐकले व तेव्हांपासून आपण अपशब्द उच्चारावयाचाहि नाहीं, असा निश्चय केला. आमच्या कुटुंबांत भोजनापूर्वी थोडी दारू पीत असत. एकदां ती घरांतील संपली होती व मला समोरच्या दुकानांत पाठविण्यांत आलें. तेथें मी जे प्रकार पाहिले ते पाहून अंगावर शहारे आले व दारूच्या दुकानांत पुनः पाऊल टाकावयाचें नाहीं असा निश्चय केला."

शाळेंत असतांना परीक्षेच्या एका विद्यार्थ्यानें उत्तरें अगदीं पाठ करून ठेविलीं होतीं व सर्व बाक्षिसें उपटलीं होतीं. पण बक्षीस–समारंभाचे वेळीं परीक्षकांनीं पुस्तकाबाहेरील प्रश्न त्या मुलास विचारतांच तो गडबडला. दादाभाईंनीं त्या संधीचा फायदा घेतला, व त्या इंग्रज माणसानें विचारल्या सर्व प्रश्नांचीं चोख उत्तरें दिलीं, तेव्हां परीक्षकानें स्वतः दादांना पारितोषिक दिलें.

त्या वेळीं पारशी समाजांतहि बालविवाहाची प्रथा रूढ होती. कदाचित् ती हिंदुसमाजाच्या सहवासानेंहि पडली असण्याचा संभव आहे. दादाभाईंच्या मातुश्री माणकबाई यांनीं त्यांच्या वयाच्या अक-

राव्या वर्षीच सोराबजी श्रॉफ यांची कन्या गुलबाई, यांचें वय त्या-वेळीं सात वर्षांचें होतें, त्यांच्याशीं विवाह करून टाकला.

• • •

## ३. महाविद्यालयांत प्रवेश

**त्या वेळीं** आजच्याप्रमाणें परीक्षांचें चक्र नव्हतें. शाळांतील शिक्षण झालें म्हणजे उच्च शिक्षणासाठीं विद्यार्थ्यांची निवड करीत. त्याप्रमाणें त्या वेळीं एल्फिन्स्टन कॉलेजांतील प्रा० बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर हे दादाभाईंच्या शाळेंत तपासणी करण्यास गेले असतां तेथील शिक्षकानें पांच सहा मुलें निवडून तीं त्याच्यापुढें उभीं केलीं. दादाभाईंचा अभ्यास अत्युत्कृष्ट होता, पण घरची गरिबी म्हणून शिक्षक श्रीमंत मुलांचा पक्षपात करीत. पण दादाभाईंच्या अभ्यासामुळें त्यांस वगळतांहि येईना, तेव्हां त्याला अगदीं शेवटीं उभें करण्यांत आलें. परंतु बाळ गंगाधर शास्त्री यांची दृष्टि अचूक असल्यानें त्यांनीं दादाभाईंची तत्काळ निवड केली व ती निवड सर्वस्वीं योग्य अशीच ठरली.

या वेळीं नव्या पद्धतीच्या शिक्षणाचा प्रसार मुळींच झालेला नव्हता. क्वचित् एखादी शाळा निघे. तिला सरकारहि साहाय्य देत नसे. दादाभाईंच्या बालपणीं तरी निदान अशीच अवस्था होती. त्या वेळीं मुंबईचा गव्हर्नर मौन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा होता. तो विद्याभिलाषी होता. त्याच्या प्रयत्नानें नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. तो १८२७ मध्यें सेवानिवृत्त झाल्यावर देशी राजे-रजवाड्यांनीं त्याच्या स्मारकासाठीं मोठा निधि जमविला व त्यांतून

एल्फिन्स्टन कॉलेजचा जन्म झाला व त्याची व्यवस्था एका बोर्डाकडे ठेवण्यांत आली. या कॉलेजमध्यें दादाभाईंनीं जांभेकर शास्त्र्यांच्या प्रयत्नानें प्रवेश मिळाला. शास्त्रीबोवांची परीक्षा कशी अचुक होती याचें प्रत्यंतर लवकरच आलें.

कॉलेजमध्यें त्यांना शिकविणारांत प्रो. बेल, प्रो० हार्कनेस, हेंडरसन, ऑरलेबार व रीड असे नामांकित प्राध्यापक होते. या कॉलेजमध्यें कोणते विषय शिकवीत याची फारशी माहिती उपलब्ध नाहीं. परंतु प्रो. बेल हे गणित व नॅचरल सायन्स हे विषय, प्रो. हेंडरसन हे इतिहास, प्रो. हार्कनेस हे इंग्रजी व तत्त्वज्ञान हे विषय शिकवीत. हे सर्वच प्राध्यापक आपल्या विषयांत निपुण होते, असें सर दिनशा वाच्छा आपल्या आठवणींत सांगतात. दादाभाईंनीं आपली अभ्यासाची तयारी उत्कृष्ट केली. अनेक ग्रंथ वाचून काढले. त्यांत त्यांचा आवडता ग्रंथ म्हणजे फिरदोसीचा शाहनामा व झोरोस्ट्रियनचीं कर्तव्यें ही गुजराथी भाषेंतील पुस्तकें होत. याशिवाय वॅट या ग्रंथकाराचें मनाची सुधारणा ( Improvement of mind ) हें पुस्तक त्यांचें फार आवडतें होतें.

सन १८४० मध्यें दादाभाईना क्लेयर शिष्यवृत्ति मिळाली. यानंतर दोन वर्षांनीं त्यांना नॉर्मल स्कॉलर्स क्लासमध्यें प्रवेश मिळाला. या वर्गांत प्रवेश मिळणें म्हणजे तत्कालीन शिक्षणांतील अत्युच्च प्रगति समजली जाई. कॉलेजमध्यें दादाभाईंनीं उत्तम लौकिक संपादन केला. विद्यार्थी व प्राध्यापक यांचे ते आवडते असत. प्रो. आरलेबार तर म्हणत ‘ दादाभाई म्हणजे हिंदुस्थानची आशा ’ आहे. दादाभाई विद्यार्थि-दशेंत असतांना भारतमातेचें चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें उभें

राही. जुलमानें ग्रस्त झालेली पण तिची जाण नसलेली, आपल्या हक्काबद्दलहि जाणीव नसलेली, अशी निद्रिस्त भारतमाता त्यांना दिसे. त्या मोहानिद्रेतून तिला जागें करून सुधारलेल्या जगांत आपल्या मानाची जागा संपादन करण्याचा मार्ग दादाभाईंना तयार करावयाचा होता.

• • •

## ४. प्रोफेसर दादाभाई

दादाभाईंच्या कॉलेजच्या अभ्यासामुळें कॉलेजचे प्रोफेसरसच नव्हे तर त्या वेळचे सरन्यायाधीशहि मुग्ध झाले. त्या वेळीं मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश सर इर्स्किन पेरी हे होते. ते शिक्षणबोर्डाचे अध्यक्ष असल्यानें त्यांचें लक्ष दादाभाईकडे गेलें व त्यांनीं दादाभाईंना पुढील शिक्षणासाठीं इंग्लंडला जावें अशी सूचना केली. परंतु दादाभाईंची आर्थिक परिस्थिति कठीण होती. त्यांचे मामा रस्तुमजी देसाई हेच त्यांचा प्रपंच चालवीत. सर पेरी यांस ही अडचण समजली, तेव्हां त्यांनीं निम्मा खर्च स्वतः सोसण्याचें मान्य केलें व ज्ञातिबांधवानीं निम्मा खर्च सोसावा अशी सूचना केली. ती सूचना प्रथम पारशी पुढाऱ्यांना पटलीहि. परंतु विलायतेंत गेल्यावर धर्म बुडेल, अशा कल्पनेमुळें त्यांनींहि पुढें नकार दिला. कारण पारशांपैकीं धनजीभाई नौरोजी व होर्मसजी पेस्तनजी हीं मुलें १८३९ मध्यें अशींच बाटविण्यांत आलीं होतीं. तेव्हां पारशांनीं दादाभाईंस मदत नाकारणें स्वाभाविक होतें. या गोष्टीला सहा वर्षे होऊन गेल्यानंतर सर पेरी यांनीं दादाभाईंबद्दल सूचना केली होती, पण ही संधि गेली. कॉलेजचे शिक्षण संपल्यानंतर पुढें काय, असा प्रश्न

अनुक्रम २९८४९
विभाग वा. वा.
क्रमांक २०७९

सहजच पुढें आला. तेव्हां सरकारी नोकऱ्यांना वाण नव्हतीं. मुंबई सरकारच्या सेक्रेटरीएटमध्यें दादाभाईंना नोकरी मिळाली परंतु कॉलेजच्या प्रोफेसरांनीं गळ घालून ती नोकरी पत्करण्यापासून दादाभाईंना परावृत्त केलें.

एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें नेटिव्ह असिस्टंटची जागा रिकामी झाली होती, ती दादाभाईंना देऊं केली व दादाभाईंनीं ती पत्करली व तेथून त्यांची गणिताचे प्राध्यापक म्हणून कॉलेजमध्यें नेमणूक झाली. कॉलेजमध्यें हिंदी माणसास प्रोफेसर म्हणून नेमण्याचा मान भारतांत दादाभाईंनाच प्रथमतः मिळाला. हिंदी बुद्धिमत्तेचें चीज झालें म्हणून दादाभाईंचें सर्वत्र अभिनंदन झालें. सन १८५४।५५ च्या बोर्डानें आपल्या अहवालांत दादाभाईंच्या नेमणुकीचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. या नेमणुकीबद्दल दादाभाई म्हणतात, 'पुढें आयुष्यांत मला अनेक मानसन्मान मिळाले, परंतु मी जेव्हां प्रोफेसर म्हणून नेमला गेलों त्या वेळीं मला जसा अभिमान वाटला तसा पुढें वाटला नाहीं. "

गणित हा विषय विद्यार्थ्यांना प्रचंड धोंड म्हणून वाटतो. परंतु दादाभाईंनीं हा रुक्ष विषय अत्यंत मनोरंजक करून शिकवावा. ज्यांचा तो विषय कच्चा असे अशा विद्यार्थ्यांना दादाभाई कॉलेजच्या अभ्यासानंतर जादा तास घेऊन तो शिकवीत. हा विषय मुळापासूनच नीट शिकविला जावा यासाठीं दादाभाई स्वतः शाळेंतील खालच्या इयत्तांना त्याप्रमाणें शिकविण्यास शिक्षकांना सांगत. त्या वेळीं दादाभाईंच्या हाताखालीं अनेक शिष्य तयार झाले. तें पुढें मोठ्या मानमान्यतेसहि चढते. ते दादाभाईंच्या शिक्षणपद्धतीबद्दल व आत्मीयते-

बद्दल मोठ्या गौरवानें बोलत. सर रामकृष्ण भांडारकर हे त्यांचे शिष्य होते. ते नेहमीं दादाभाईंच्या शिक्षणपद्धतीबद्दल मोठ्या आदरानें बोलत.

भारतासाठीं असीम कष्ट भोगणारे जे थोर पुरुष होऊन गेले त्यांनीं बहुतेकांनीं राजकारणांत पडण्यापूर्वी शिक्षकाचा पेशाच पत्करल्याचें आढळून येतें. विष्णुशास्त्री चिपळोणकर, लोकमान्य टिळक, ना. गोखले, ना. शास्त्री, विपिनचंद्रपाल, लाला लजपतराय, पं. मालवीयजी अशीं किती तरी नांवें सांगतां येतील. जणुं पुढें करावयाच्या राजकारणाची शिक्षकपेशा ही मधली पायरी म्हणूनच समजली जाई. त्याचप्रमाणें दादाभाई पुढें राजकारणांत पडले. त्यापूर्वी यशस्वी शिक्षक म्हणून ते गाजले ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी वाटते.

• • •

## ५. समाजसुधारक

दादाभाई कॉलेजमध्यें अध्यापकांचें काम करीत असतांनाच त्यांचें लक्ष समाजसुधारणेकडे वेधलें गेलें. हिंदुसमाजाप्रमाणेंच पारशी समाजहि अत्यंत पुराणमतवादी होता. स्त्रियांना शिक्षणाचा गंधहि नव्हता. बालविवाह रूढ होता. दादाभाईंनीं समाजांत कांहीं चैतन्य ओतण्यासाठीं स. १८४८ मध्यें 'स्टूडन्ट्स् लिटररी ॲन्ड सायंटिफिक सोसायटी' स्थापन केली. प्रो. पॅटन हे अध्यक्ष व दादाभाई खजिनदार म्हणून निवडले गेले. राजकारण व धर्मकारण या विषयांखेरीज इतर विषयांवर संस्थेच्या सभासदानें आपल्या पाळीप्रमाणें वाङ्मयीन, सामाजिक वा शास्त्रीय

विषयावर एखादा निबंध लिहिलाच पाहिजे असा तींत दण्डक असे. जो कोणी सभासद ही गोष्ट करावयास चुकेल त्याला प्रथम एक रुपया दुसऱ्या वेळीं दोन रुपये व तिसऱ्यांदाहि चुकला तर संस्थेंतून हकाल-पट्टी, असा नियम होता. संस्थेंत ज्या विषयावर प्रथम चर्चा व्हावयाची, व तींत एकमत झालें म्हणजे त्यांना वृत्तपत्रांतून प्रसिद्धि द्यावयाची. यासाठीं संस्थेनें गुजराथी व मराठी ' ज्ञानप्रसारक मंडळी ' अशा दोन शाखा स्थापन केल्या होत्या.

अशा रीतीनें जागृतीचें काम सुरू होतांच दादाभाईंनीं स्त्री-शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला. आपल्या स्त्रियांना शिक्षण पाहिजे. संसारांत त्याशिवाय राम नाहीं असें म्हणणारे तरुण तेव्हां होतेहि. परंतु त्या दिशेनें प्रयत्न मात्र कोणीं केला नाहीं. एका सभेंत संस्थेचें एक सभासद श्री. बेहेरामजी खरशेडजी गांधी यांनीं स्त्री-शिक्षणावर निबंध वाचला. त्यांत या प्रश्नांची सांगोपांग चर्चा केली होती. दादाभाईंना या विषयाची जात्याच आवड असल्यानें संस्थेंत लागलीच ठराव करण्यांत आला कीं, स्त्री-शिक्षणाच्या शाळा काढाव्या. संस्थेच्या सदस्यांनीं आपापल्या घरचीं मतें तयार करून मुलींना शाळेंत पाठ-विण्याचें मान्य केलें. ऑगस्ट स. १८४९ रोजीं ही घटना घडली. हिंदुस्थानांत स्त्री-शिक्षणाचा एका अर्थानें मुहूर्तच त्या दिवशीं करण्यांत आला.

मोठ्या मुष्किलीनें कांहीं मुली जमा केल्या. कारण त्या काळीं पारशी समाजहि स्त्री-शिक्षणाला विरोधी होता. परंतु चिकाटीनें प्रयत्न करीत ३।४ शाळा सुरू करण्यांत आल्या. दादाभाई स्वतः कसलेले शिक्षक असल्यानें व बालकांच्या मनोवृत्तीची त्यांना चांगली कल्पना

असल्यानें तेच या खात्याचे प्रमुख होते. श्री. जगन्नाथ शंकर शेठ हे शिक्षण-मंडळाचे एक सदस्य होते. त्यांनीं शाळेसाठीं जागा दिली. नंतर कांहीं पारशी गृहस्थांनींहि देणग्या दिल्या व अल्पावधींतच शाळेला पगारी शिक्षक ठेवण्याची ऐपत आली. या शाळा व्यवस्थित चालूं लागल्या तेव्हां सर पेरी यांनीं अशी सूचना केली कीं, शाळांवर देखरेख करण्यासाठीं व त्यांत सुधारणा करण्यासाठीं एक महिला समिति नेमावी. या समितींत कांहीं युरोपियन स्त्रियाहि नेमल्या गेल्या. त्याबरोबर फिरून पुराणमताभिमान्यांनीं ओरड सुरू केली. वृत्तपत्रांतूनहि मोठी चळवळ करण्यांत आली. परंतु सोसायटीच्या विद्यार्थ्यांनीं विरोधाला न जुमानतां शिक्षणाचा कार्यक्रम तसाच चालू ठेवला. ज्ञानप्रसारक मंडळानें मराठी व गुजराथीमध्यें शिक्षणाच्या उपयुक्ततेसंबंधीं व्याख्यानें दिलीं त्यामुळेंहि विरोध पुष्कळ कमी झाला.

स्त्री-शिक्षणाचें काम सुरू झाल्यानंतर पारशी धर्म सुधारणेचें काम दादाभाईंनीं हातीं घेतलें. हिंदुस्थानांत पारशी समाज आल्यानंतर त्याच्यांत हिंदु—मुसलमानांच्या बऱ्याच चालीरीति शिरल्या होत्या, व झोराथ्रुस्टच्या शिकवणीला तो विसरूं लागला होता. तो मूळधर्म कायम राहावा म्हणून दादाभाईंनीं तो प्रश्न हातीं घेतला आणि 'मझदेयासनन सभा' नांवाची संस्था स्थापन केली. मोठ्या प्रयासानें दादाभाईंनीं सर जमशेटजी जिजीभाई यांची सहानुभूति या कामीं मिळविली. त्यामुळें दादाभाईंचें इच्छित कार्य चांगलें सफल होऊन समाजांत शिरलेल्या अन्य चालीरीति टाकून देण्यांत येऊं लागल्या व दादाभाई स्वीकृत कार्यांत यशस्वी झाले.

●●●

## ६. राजकारणांत प्रवेश

त्या वेळीं हिंदुस्थानावर ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार चालू असे व कंपनी मन मानेल त्याप्रमाणें येथें कारभार करी. इंग्लिश जनताहि या कारभाराकडे फारसें लक्ष देत नसे. सर्व सत्ता कंपनीच्या हातीं असे. कंपनी इंग्लंडमधून वेळोवेळीं नोकर पाठवी. त्यांना या देशाची भाषा, चालीरीति, संस्कृति यांचें काडीइतकेंहि ज्ञान नसल्यानें ते नोकरहि त्यांना वाटेल तसा कारभार हांकीत. या पद्धतींत कांहीं बदल झाला पाहिजे, अशी जाणीव हिंदुस्थानांत नुकतीच होऊं लागली होती. बंगाली लोकांनीं या कामीं प्रथम पुढाकार घेऊन आपल्या तक्रारी मांडण्यासाठीं एक संस्था स्थापन केली. त्याचप्रमाणें मुंबईत ऑगस्ट २६ स. १८५२ रोजीं एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें एक सभा होऊन "बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन," नांवाची संस्था स्थापन केली. दादाभाई हेहि या सभेस हजर होते व त्यांनीं सभेंत भाषण करून अशी संस्था कां काढावी लागले याचें स्पष्टीकरण केलें. आपल्या तक्रारी काय आहेत त्या साधार एकत्र करून त्या पुढें मांडण्यासाठीं राज्यकारभारांत काय चुकत आहे हें दाखविण्यासाठीं ही संस्था आहे असें त्यांनीं सभेंत सांगितलें.

या असोसिएशननें ब्रिटिश पार्लमेंटला सादर करण्यासाठीं एक अर्ज तयार केला. त्यांत हिंदुस्थानांतील राज्यकारभार सुधारण्यासाठीं काय तजवीज केली पाहिजे याचें स्पष्टीकरण केलें असून हिंदी माणसांना सिव्हिल सर्व्हिसमध्यें प्रवेश असावा, व प्रांतानिहाय उत्तम अधिकारी तयार करण्यासाठीं एकेक विद्यापीठ काढावें, स्थानिक सर-

कारांत सुशिक्षित हिंदी माणसाला प्रवेश असावा, सरकार शिक्षणासाठीं देत असलेला पैसा अपुरा असल्यानें भरपूर पैसा द्यावा, व जमीनमहसुलापैकीं जास्तींत जास्त पैसा त्या त्या ज़िल्ह्यांत खर्च करावा, इत्यादि अनेक सूचना त्या अर्जांत केल्या होत्या. ही संस्था स्थापन केली तेव्हां कित्येक आंग्ल गृहस्थांनीं त्या कामीं प्रोत्साहन दिलें होतें, परंतु असोसिएशननें वरील अर्ज केला व तो प्रसिद्ध होतांच त्याजवर इंग्लंडमध्यें एकच गडबड उडाली. जॉन ब्राइट, सर पेरी, लॉर्ड मॉन्टिगल, सर एडवर्ड रायन, जोसेफ ह्यूम प्रभृतींनीं या मागणीला पाठिंबा दिला. कॉब्डेनें तर असेंच जाहीर केलें कीं, हिंदुस्थानावर हिंदी लोकांचेंच राज्य असलें पाहिजे.

ता. १३ मार्च १८५३ रोजीं लंडनमध्यें फ्रेन्डस् ऑफ इंडिया या संस्थेनें एक मोठी सभा घेऊन अर्जांतील मागण्यांना पाठिंबा दिला. परंतु कॉमन्स सभेवर याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं, व कंपनीचें राज्य पूर्ववत् चालूच राहिलें. पुढें १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर पार्लमेंटनें हिंदुस्थानचा सर्व कारभार हातीं घेतला तें वेगळें. परंतु हिंदी लोकांना पूर्ववत् नोकऱ्यांत सर्वत्र मज्जाव होता तो कायमच राहिला. या सर्व प्रकारामुळें दादाभाईंचें लक्ष मात्र राजकारणानें आकृष्ट केलें.

आपल्याला राजकीय वा सामाजिक कसलीहि चळवळ करावयाची तर स्वतंत्र विचाराचें वृत्तपत्र असलें पाहिजे ही जाणीव दादाभाईंना तीव्रतेनें भासूं लागली व त्यांनीं श्री. खरशेटजी कामा यांच्या साहाय्यानें ‘ रास्तगोफ्तार ’ नांवाचें वृत्तपत्र सुरू केलें. रास्तगोफ्तार म्हणजे सत्यवादी. याला लागणारें भांडवल कामाशेठजींनीं दिलें व दादाभाईंनीं संपादनाचें काम पत्करलें. या पत्राचा पहिला अंक १५

नोव्हेंबरला १८५१ ला प्रसिद्ध झाला. ' रास्त गोफ्तार ' चा अंक लोकांस फुकट वांटावयाचा, अशी ही योजना होती.

याच सुमारास मुसलमानांनीं पारशी जमातीवर हल्ला चढवून मोठा दंगा केला. या दंग्याला कारण असें घडलें कीं, "चित्रज्ञानदर्पण" नांवाचें एक वृत्तपत्र एक पारशी तरुण प्रसिद्ध करीत असे. त्यानें पारशी जमातीवर ज्या मोठ्या लोकांचे कांहीं संस्कार घडले त्यांचीं चरित्रें देण्याचा उपक्रम आपल्या पत्रांतून सुरू केला. त्यांत महंमद पैगंबरांचें चरित्र त्यानें दिलें. त्या लेखांत पैगंबरांना योग्य तो आदर दाखविला गेला नाहीं, अशा समजुतीनें मुसलमान समाज खवळला व त्यानें पारशी जमातीवर हल्ला करून लुटालूट, खून इत्यादि भयंकर प्रकार केले. पोलिसांनाहि त्यांचा बंदोबस्त करतां आला नाहीं. अखेर पत्राचे संपादक बेहरामजी खरशेटजी गांधी यांनीं माफी मागितली तेव्हां जरा स्थिरस्थावर झालें.

दादाभाई या दंगलभागांतच राहात असल्यानें त्यांनीं स्वनेत्रांनीं अनेक अत्याचार पाहिले. अशा धामधुमींत ' रास्त गोफ्तार 'चा जन्म झाला. दादाभाईनीं मुसलमानांच्या अत्याचाराबद्दल सणसणीत टीका केली. गव्हर्नराकडे एक शिष्टमंडळ जाऊन त्यानें सर्व प्रकार निवेदन केला. या शिष्टमंडळांत दादाभाईहि होते. दादाभाई सरकारी नोकरींत असून वृत्तपत्राचे संपादक होते ते सतत १८५५ पर्यंत, इंग्लंडला जाईपर्यंत.

हें काम चालू असतां दादाभाईंचीं इतर कामेंहि सुरूच होतीं. पारशी समाजांतील एक पुढारी फ्रामजी कावसजी बनाजी यांनीं स्टूडन्टस् लिटररी व सायन्टिफिक सोसायटीच्या उभारणीस चांगली

मदत केली होती. त्यांचें स्मारक इमारत बांधून करावें म्हणून निधि जमा करण्यासाठीं एक सभा झाली. दादाभाईनीं सहा हजार रुपये जमा करण्याचें मान्य केलें. एक पारशी नाटक मंडळी १८५३ मध्यें स्थापन झाली त्या समितींतहि ते होते. अशा रीतीनें विविध स्वरूपाचीं सार्वजनिक कामें करीत असतां त्यांना विलायतेंत जाण्याचा योग आला.

• • •

## ७. विलायतेंत प्रयाण

दादाभाई एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें गणिताचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते व त्यांनीं सार्वजनिक क्षेत्रांतहि बरेंच नांव संपादन केलें होतें. परंतु त्यांचा विशेष कल राजकारणाकडे होता आणि त्या वेळच्या परिस्थित्यनुरूप त्यांचें राजकारण जहाल स्वरूपांतच मोडण्यासारखें होतें, ही गोष्ट पार्लमेंटपुढें जो अर्ज सादर करण्यांत आला त्यावरून सिद्ध झालेली आहे. ब्रिटिशांची सत्ता हिंदुस्थानांत हा वेळपावेतों बद्धमूल होत होती. हिंदुस्थानांत इंग्रजांनीं व्यापारी बस्तान उत्कृष्ट बसविलें होतें. परंतु खास इंग्लंडमध्यें हा वेळपर्यंत एकाहि हिंदी कंपनी स्थापन झालेली नव्हती. कामा घराण्यानें या कामीं आघाडी मारून स. १८५५ मध्यें लिव्हरपूल येथें आपली एक व्यापारी शाखा काढण्याचें ठरविलें. इंग्लंडमध्यें व्यापारी शाखा काढणें हें एकपरीनें धाडसच होतें व तेथें काम करणाराहि फार मोठ्या योग्यतेचा व हुशार अशा मनुष्याची आवश्यकता होती.कामा मंडळींनीं दादाभाईंना

भागिदारींत ती शाखा सांभाळण्याबद्दल विनंती केली व ती त्यांनीं मान्यहि केली व आपल्या जागेचा राजीनामा दिला.

दादाभाईंना निरोप देण्याचा समारंभ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं केला. त्यांत डॉ. सर भांडारकर, बाळ मंगेश वागळे यांनींहि गुण-गौरवपर भाषणें केलीं. स्टू. लि. व सायंटिफिक सोसायटीनेंहि समारंभपूर्वक निरोप दिला. अशा रीतीनें लोकांच्या शुभेच्छा घेऊन दादाभाई जून २७ स. १८५५ या दिवशीं पी. ओ. कंपनीच्या ‘ मद्रास ’ या बोटीनें इंग्लंडच्या पहिल्या यात्रेस निघाले, ते ऑगस्टमध्यें सौथॅम्प्टन येथें पोहोंचले. दादाभाईंच्याबरोबर मंचरजी होर्मसजी कामा व खरशेडजी रुस्तुमजी कामा हे दोघे शाखा स्थापनेसाठीं गेले व शाखा स्थापन झाली. दादाभाईंचें म्हणणें सर्व व्यवहार प्रामाणिकपणें झाला पाहिजे. तेथील व्यापारांत अफू, दारू यांचाहि व्यापार चाले. दादाभाईंनीं लोकांस व्यसनीं करणाऱ्या या धंद्यांतील फायदा घेण्याचें नाकारलें. कामा म्हणत, व्यापारांत असलें तत्त्वज्ञान कामाचें नाहीं. दादाभाईंस ही गोष्ट पटेना. अखेरीस दादाभाईंनीं कामा कंपनीशीं असलेला आपला संबंध तोडून टाकला. ही गोष्ट १८५९ च्या प्रारंभीं घडली.

परंतु दादाभाई व कामा यांचे मित्रत्वाचे संबंध कायमच राहिले. त्यानंतर दादाभाई हिंदुस्थानांत परत आले, ते पुष्कळच अनुभवाचा सांठा घेऊन. इंग्लंडमधील राज्यपद्धतीचा अनुभव व हिंदुस्थानांतील राज्यकारभार त्या मानानें किती कुचकामी आहे ही गोष्ट त्यांचे मनांत चांगलीच ठसली व हिंदुस्थानाबद्दल इंग्लंडमध्येंच नेटानें चळवळ केली पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. इंग्लंडमध्यें

असतांना लंडन विद्यापीठ कॉलेजनें त्यास गुजराथीचे प्राध्यापक म्हणून नेमलें. त्या कॉलेजमध्यें सुमारें दहा वर्षे ते प्राध्यापक होते.

तीन वर्षे इंग्लंडमध्यें दादाभाई होते. परंतु त्यांचें लक्ष मुंबईंत काय घडामोडी चालल्या आहेत इकडे पूर्ण असें. पारशी समाजांत एक पत्नीच करावी, अशी चळवळ सुरू झाली व सरकारनें तसा कायदाहि करावा अशी मागणी समाजधुरीणांनीं केली. दादाभाईंनींहि या मागणीस पाठिंबा दिला. या खेपेस ते हिंदुस्थानांत फार दिवस राहिले नाहींत. पण जे थोडे दिवस राहिले त्या वेळीं व्हिक्टोरिया राणीच्या नांवानें एक बाग व वस्तुसंग्रहालय उघडावें अशी सरकारला विनंती करण्यासाठीं एक सभा झाली, तींत दादाभाई होते व त्यांनीं ही सूचना उचलूनहि धरली. 'स्त्री-ज्ञानमाला' म्हणून एक नियतकालिक त्यांचे मित्र पेस्तनजी रुस्तनजी कोल्हा, हे काढीत. त्यांतहि दादाभाईंनीं स्त्रीजीवनासंबंधीं अनेक लेख या काळांत लिहिले.

दादाभाई जानेवारी ९ सन १८५९ ला पुनः इंग्लंडला निघाले. त्यांचेबरोबर कामा कुटुंबांतील कांहीं तरुण, त्यांचा भाचा फ्रामजी रुस्तुमजी देसाई असे लोक होते. विलायतेंत येतांच त्यांनीं "दादा-भाई नौरोजी आणि कं." नांवाची स्वतः एक कंपनी काढली. तींत कपाडिया व कोल्हा यांना त्यांनीं भागीदार म्हणून घेतले. दादाभाई व्यापार करू लागले. परंतु व्यापारांत लबाडी केलेली त्यांना कधींहि खपली नाहीं व व्यापारांत त्यांचें पुष्कळ नुकसान झालें तरीहि त्यांनीं तें सोसलें. परंतु त्यांच्या सचोटीमुळें त्यांचें नांव मात्र विश्रुत झालें. 'क्वीन' इन्शुअरन्स कंपनीचे डायरेक्टर म्हणून ते निवडून आले. सन १८६२ मध्यें औद्योगिक प्रदर्शनाचे ते गॅरेन्टॉर म्हणून नियुक्त

झाले. लिव्हरपूलमधील बहुतेक संस्थांमध्यें ते सदस्य होते! मँचेस्टर-च्या कॉटन सप्लाय असोसिएशनचे ते सभासद झाले. त्यांचा प्रमुख व्यापार कापसाचा होता. हिंदी लोकांनीं व्यापारांत शिरून इंग्रजी व्यापाराची पद्धत उचलली पाहिजे, असें ते नेहमीं म्हणत.

लिव्हरपूल येथें सॅम्युअल स्मिथ नांवाच्या एका कापूस व्यापाऱ्यांशीं दादाभाईंचा संबंध आला व पुढें त्याचें रूपांतर दोघांच्या दृढ स्नेहांत झालें. हा गृहस्थ हिंदी प्रश्नांत मन घालणारा व हिंदुस्थानाबद्दल सहानुभूति बाळगणारा होता. तो १८८२ ते ८५ पर्यंत पार्लमेंटचा सभासदहि निवडून आला होता. टेम्परन्स चळवळीचा तो आधारस्तंभ असल्यानें दादाभाईंची व त्यांची खूप गट्टी जमली. सन १९०६ मध्यें हिंदुस्थानांत टेम्परन्स परिषदेचा अध्यक्ष म्हणून तो आला होता व १९०६ सालीं दादाभाईंच्या अध्यक्षतेखालीं कलकत्ता काँग्रेसचें अधिवेशन झालें त्या सभेलाहि तो हजर होता. याच काँग्रेसमध्यें दादाभाईंनीं स्वराज्याची प्रसिद्ध घोषणा केली. काँग्रेसचें अधिवेशन चालू असतां काँग्रेसच्या चौथ्या दिवशीं हा गृहस्थ कालवश झाला. त्याच्या मृत्यूमुळें दादाभाईंना फार दुःख झालें.

दादाभाई व्यापारांत पडले असले तरी हिंदी लोकांचीं गाऱ्हाणीं इंग्लंडमधील जनतेपुढें मांडण्याचें त्यांचें काम चालूच होतें. भारताचे ते एक बिनसरकारी वकील म्हणूनच काम करीत. सन १८५९ पासूनच ते हें काम करूं लागले. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत बस-णारांचें वयोमान एकदम कमी करण्यांत आलें व त्यांत हिंदी लोकांना प्रवेश मिळत नाहीं याविरुद्धाहि त्यांची खटपट सारखी सुरूच होती. इंग्लिश राजकारणाचा अभ्यास करून दादाभाईंची अशी खात्री झाली

कीं, हिंदी लोकांचा हिंदुस्थान सरकारच्या राज्ययंत्रांत जास्त प्रवेश झाल्याखेरीज परिस्थिति सुधारणार नाहीं. पुढें कंपनीचा कारभार पार्लमेंटनें आपल्या हातीं घेतला तेव्हां व्हिक्टोरिया राणीनें जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्या आधारावर दादाभाईंनीं भर दिला. पण राज्यकर्त्यांचीं आश्वासनें पोकळ असल्याची त्यांची लवकरच खात्री पटली. पुढें लॉर्ड कर्झननें तर त्याचा अर्थ " शक्य असेल तेथें " इतकाच केला. पण पुढें मोर्ले साहेब भारतमंत्री झाल्यावर त्यांनीं त्याचें स्पष्टीकरण असें केलें कीं, " राणीनें शहाण्या मुत्सद्यांच्या संमतीनें जाहीरनामा तयार केला असल्यानें त्याच्या अर्थाची ओढाताण करतां कामा नये. "

हिंदी लोकांच्या तक्रारी सारख्या वाढतच होत्या व त्यावर एकच उपाय दादाभाईपुढें होता तो म्हणजे हिंदी लोकांना राज्यकारभारांत जास्त स्थान मिळणें. पुढें इंडियन मेडिकल सर्व्हिसचा प्रश्न उत्पन्न झाला तेव्हां त्यांनीं या विषयाला पुनः चालना दिली. इंग्लंडमध्यें पारशी विद्यार्थी व पारशी व्यापारी यांची संख्या वाढूं लागली तेव्हां दादाभाईंनीं सन १८६१ मध्यें 'लंडन झोरोस्ट्रियन असोसिएशन,' स्थापन केली. आतांपर्यंत त्या संस्थेनें पारशी समाजाला अत्यंत मोठें साहाय्य केलेलें आहे. या संस्थेचे अध्यक्षहि दादाभाईच होते.

इंग्लंडमध्यें जाणाऱ्या पारशी विद्यार्थ्यांचें ते एक प्रकारें पालकच होते. त्यांनीं विद्यार्थ्यांत सार्वजनिक कामाची आवड उत्पन्न केली व त्यांच्या साध्या व सरळ स्वभावाचा परिणाम विद्यार्थि-वर्गावर चांगला पडे. मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या करण्यास लागणारें शिक्षण त्यांना दिलें जाई. परंतु दादाभाईंचें खरें लक्ष होतें चळवळीवर. त्या

कामीं त्यांना सरकारी अधिकाऱ्यांचाहि बराच त्रास सोसावा लागला. परंतु निराशा ही त्यांना माहीतच नसल्यानें त्यांनीं आपल्या कार्य-क्रमांत खंड पडूं दिला नाहीं.

• • •

## ८. प्रापंचिक त्रास

दादाभाईंचा विवाह त्यांच्या लहानपणीं झाला होता. त्यांची पत्नी गुलबाई ही त्यांच्यासारख्या चतुरस्र माणसाला शोभेशी नव्हती. तरी दादाभाईंनीं आपल्या पत्नीबद्दल केव्हाहि वावगा शब्द काढला नाहीं किंवा तिला दुखाविलें नाहीं. ते नेहमीं तिला लिहायला वाचावयास शिकविण्याचा प्रयत्न करीत. आपल्या पत्नीनें चांगलें सुविद्य व्हावें अशी त्यांची उत्कट इच्छा होती. स्त्री–शिक्षणाचे ते कट्टे पुरस्कर्ते असून त्यांच्या प्रयत्नानें मुंबईत मुलींच्या शाळाहि निघाल्या होत्या. आपल्या पत्नीनें आपल्या बरोबरीनें समाजकार्यांत भाग घ्यावा अशी त्यांची इच्छा, परंतु गुलबाईनें त्यांच्या इच्छेला कधींच मान दिला नाहीं, व लिहायला वाचावयाला कधीं शिकलीहि नाहीं. दादाभाईंच्या मनःस्थितीची कल्पना त्यांची माता माणकबाई यांना पुरी होती. तेव्हां दादाभाईंनीं दुसरें लग्न करावें अशी त्यांनीं सूचना केली. माणकबाईंनीं आपल्या भावाकडूनहि तशी सूचना करून पाहिली. परंतु दादाभाई हे स्वतः द्विभार्या–पद्धतीला प्रतिकूल असल्यानें त्यांनीं अखेरपर्यंत आपल्या मातुश्रींचें म्हणणें मानलें नाहीं !

दादाभाई विलायतेंत असतांना त्यांच्या घरासमोर एक इंग्रज डॉक्टर राहात असे. दादाभाई अधूनमधून त्या डॉक्टर आर्चरकडे जात. त्याला

दोन तीन मुली होत्या. दादाभाई डॉ. आर्चरच्या एका मुलीशीं लग्न करणार आहे. तो बाटून ख्रिस्ती होणार, अशा वार्ता माणकबाईच्या कानीं कोणीं तरी घातल्या. त्याबरोबर त्यांची माता घाबरून गेली व तिनें दादाभाईंना लिहिलें, 'बाबारे, कांहींहि कर, पण आपला धर्म सोडून आपल्या कुळाला कलंक लावूं नकोस,' अशा प्रकारचीं पत्रें सारखीं जाऊं लागलीं. तेव्हां दादाभाई तांतडीनें हिंदुस्थानांत आले, त्यांनीं आपल्या आईचें सर्व प्रकारें समाधान केलें तेव्हांच हा प्रश्न मिटला.

ते मुंबईस आल्यावर त्यांनीं अनेक सार्वजनिक कामांत भाग घेतला. ता. १२ डिसेंबर १८६३ रोजीं मुलींच्या शाळेचा बक्षीस-समारंभ मुंबईचे न्या० सर बार्टल फ्रीयर यांचे अध्यक्षतेखालीं झाला. त्याला दादाभाई, उपस्थित होते. त्यांना उद्देशून सर फ्रीयर यांनीं स्त्री-शिक्षणाचे आद्य प्रणेते म्हणून त्यांचा मोठा गौरव केला. पारशी समाजांत अनेक सुधारणा त्यांनीं घडवून आणल्या. त्यांत ' सोसायटी ऑफ पारशीज ' नांवाची एक संस्था निघाली तिच्या सभासदांनीं आपल्या कुटुंबांतील बायकांसमेवत एकत्र भोजनास बसण्याची शपथ घेतली. आज या गोष्टीला फारसें महत्त्व वाटत नसलें तरी शंभर वर्षांपूर्वीची परिस्थिति ध्यानीं घेतां त्या काळीं ती फार मोठी समाजसुधारणा असेंच तिचें स्वरूप होतें.

दादाभाईंनीं इंग्लंडला पुनः प्रयाण केलें एप्रिल २९ स. १८६४ रोजीं. या वेळीं त्यांनीं आपल्या बरोबर आपली आई, बायको, पुत्र अर्देसीर व कन्या शिरीन, यांनाहि नेलें.

या वेळीं अमेरिकेंत सिव्हिल वॉर सुरू होती व तिचा फायदा

दादाभाईंना खूप झाला. त्यांनीं खूप कापूस विकला व त्याबद्दल पैसाहि सपाटून मिळाला. दादाभाईचा इंग्लंड व हिंदुस्थानमधील इतर व्यापारी कंपन्यांशींहि संबंध होता व त्यांजकडून दादाभाईचे येणेंहि पुष्कळ होतें. परंतु त्या एकदम गडगडल्या,त्यामुळें दादाभाईचें मनस्वी नुकसान झालें व त्यांना आपली कंपनी बंद करावी लागली. इंग्लंडमधील व्यापारी क्षेत्रांत दादाभाईंनीं आपल्या सच्चेपणानें एवढी छाप बसविली होती कीं, दादाभाईंनीं आपला धंदा तसाच पुढें चालू ठेवावा, त्यांना लागेल ती रक्कम आपण देऊं असेंहि आश्वासन अनेक इंग्रज व्यापाऱ्यांनीं दिलें. दादाभाईंनीं अत्यंत शांततेनें आपला व्यवहार आवरता घेतला. यानंतर दादाभाईची कुटुंबांतील मंडळी एक वर्षभर इंग्लंडमध्यें राहिली व पुढें १८६८ मध्यें ती मंडळी परत फिरली.

• • •

## ९. ब्रिटनमध्यें कार्यारंभ

दादाभाई इंग्लंडला गेले त्यांत त्यांचा मुख्य हेतु तेथील राज्यव्यवस्था पाहावी, तेथील लोकमत समजावून घ्यावें हा होता. इंग्लंडवर राज्य पार्लमेंटचे असलें तरी इंग्लंडचे खरे राज्यकर्ते म्हणजे जनताच आहे अशी त्यांची खात्री पटली. इंग्लंडमध्यें लोकशाही अशा रीतीनें पूर्णत्वाला गेली असतांना, भारतांत येणारे इंग्रज अधिकारी इतके मग्रूर व लोकमताला तुच्छतेनें लाथाडणारे कां असावेत, हा प्रश्न दादाभाईंना सारखा त्रस्त करीत असे, व हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत जर कांहीं सुधारणा घडवून आणा-वयाची असेल तर ब्रिटनचें लोकमत तयार केलें पाहिजे, त्यांना

हिंदुस्थानांतील वस्तुस्थिति नीट समजावून सांगितली पाहिजे; तर कांहीं लाभ होण्याचा संभव; परंतु हें काम अर्थात् एका माणसाच्या आंवाक्याबाहेरचें असल्यानें त्यांनीं त्या वेळीं इंग्लंडमध्यें असलेले वंगीय पुढारी श्री. व्योमेशचंद्र बानर्जी यांच्या साहाय्यानें " लण्डन इंडियन सोसायटी, " नांवाची संस्था स्थापन केली. इंग्रज व हिंदी लोक वरचेवर एकत्र आणून भारतीय प्रश्नावर चर्चा करावयाची हा या संस्थेचा मुख्य हेतु होता. या संस्थेनें सतत पन्नास वर्षे भारताच्या वतीनें उपयुक्त असा प्रचार केला. या संस्थेचे अध्यक्ष दादाभाईच होते व ते इंग्लंडमधून स. १९०७ मध्यें कायमचे भारतांत येईपर्यंत अध्यक्ष म्हणूनच राहिले.

सिव्हिल सर्व्हिस परीक्षेंत हिंदी विद्यार्थ्यांवर भलतींच नियंत्रणें घालण्यांत येऊं नयेत म्हणून त्यांनीं पुष्कळच प्रयत्न केले. त्यासाठीं लंडनमध्यें जाहीर सभा भरविल्या. भारतमंत्र्याकडे निषेध खलिते पाठविले. अशा किरकोळ चकमकी सुरू होत्याच. हिंदुस्थानच्या लोकांबद्दल अनेक दुर्ग्रह पसरविले जात. जॉन क्राफर्ड नांवाच्या इसमानें स. १८६६ मध्यें एथ्नॉलॉजिकल सोसायटीपुढें एक निबंध वाचला. त्यांत हिंदी लोक अत्यंत निर्बुद्ध, त्यांच्यांत बुद्धि नाहीं, राज्य करण्याची त्यांना अक्कल नाहीं, हिंदुस्थान व आशियावासी यापेक्षां श्रेष्ठ जाती म्हणजे युरोपियन होत, ते आशियांतील राज्य करण्यासाठींच जन्मले आहेत, असे अनेक तारे तोडले. दादाभाईंना हा भारतीयांचा केलेला अपमान मुळींच सहन झाला नाहीं, व एक महिन्याच्या आंतच त्यांनीं क्राफर्डच्या सर्व मुद्द्यांवर कडाडून हल्ला चढवून ते सर्व मुद्दे खोडून काढले, व बुद्धिमत्ता, साहित्य, राजकारण इत्यादि

सर्व क्षेत्रांत भारतीय लोक श्रेष्ठ कसे होते ही गोष्ट त्यांनीं साधार व अनेक दाखले देऊन मांडिली, इतकेंच करून ते न थांबतां, इंग्रज लोक कसे दांभिक व डांबिस ( Rogues ) आहेत, दुसऱ्यांना फसविण्यांत ते तरबेज कसे आहेत, इत्यादि गोष्टी अनेक उदाहरणें देऊन पुढें मांडिल्या. दादाभाईंनीं आपला स्वानुभवच त्यांत कथन केला आहे. स. १८५६ मध्यें ते व्यापारासाठीं इंग्लंडमध्यें येण्यास निघाले, तेव्हां त्यांच्या युरोपियन मित्रांनीं त्यांस उपदेश केला कीं, We should be exceedingly careful in our business in the city against the many rogues we should meet here. In India we keep one eye open, in England we must keep both eyes wide open."

हिंदुस्थानासंबंधीं असले गैरसमज उत्पन्न करण्यांत येतात, त्यांना प्रभावी आळा घालण्यासाठीं संघटित प्रयत्न झाला पाहिजे, यासाठीं त्यांनीं दि. १ डिसेंबर १८६६ रोजीं "ईस्ट इंडिया असोसिएशन" स्थापन केली. या संस्थेंत अनेक इंग्रज गृहस्थहि होते. भारताचें कल्याण व्हावें असें वाटणाऱ्या सर्वांना त्या संस्थेंत प्रवेश होता. दादाभाईंच्या प्रयत्नानें भारतांत नोकरी केलेले अनेक अधिकारी, माजी गव्हर्नर्स, लष्करी व मुलकी अधिकारी यांची सहानुभूति मिळाली. अनेक लोक सदस्य झाले.लॉर्ड लायव्हेडेन हे या संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांचा जन्म कलकत्त्यास झाला होता. त्यांनीं बंगालमध्यें उत्तम लौकिक संपादन केला होता. या संस्थेचे सेक्रेटरी दादाभाई झाले.

या संस्थेंत हिंदी प्रश्नावर उत्तम चर्चा चाले व प्रतिष्ठित लोक त्यांत भाग घेत. स. १८६७ च्या मे महिन्यांत दादाभाईंनीं " इंग्लंडचीं हिंदुस्थानसंबंधीं कर्तव्यें " नांवाचा एक निबंध वाचला.

इंग्लंडला आजचें वैभव प्राप्त झालें आहे तें हिंदुस्थानच्या पैशानें झालें आहे, हें त्यांनीं आंकड्यानिशीं दाखवून दिलें, पण उलट इंग्लंडनें राज्यकारभार सुरू केल्यापासून हिंदुस्थानांत शिक्षण नाहीं, हिंदी लोकांना राज्यकारभारांत प्रवेश नाहीं, दुष्काळ सारख्या भेटी देत आहेच, या गोष्टी तपशीलवारपणें मांडल्या. याच वर्षी जुलैमध्यें "म्हैसूर" वर त्यांनीं निबंध वाचला. त्याला म्हैसूरचें राज्य त्या घराण्याकडे देणें कां इष्ट आहे ही गोष्ट सप्रमाण मांडिली, व तिचा योग्य परिणाम होऊन म्हैसूर राजघराणें पुन: सुप्रतिष्ठित झालें. त्यानंतर ब्रिटिशांनीं ऑबिसीनियांत युद्ध सुरूं केलें, तेथें हिंदी सैन्य नेलें होतें. त्याचा खर्च ब्रिटिशांनीं दिला पाहिजे, कारण त्या युद्धांत हिंदुस्थानचा हितसंबंध कांहींच नाहीं, असें त्यांनीं ठासून प्रतिपादन केलें. दादाभाईंनीं अशा रीतीनें उपक्रम सुरू करतांच अनेक सभासद विविध विषयांवर निबंध वाचूं लागले.

जनरल सर आर्थर कॉटन यांनीं "हिंदुस्थानांतील पाटबंधारे व जलमार्ग-वाहतुक" या विषयावर निबंध वाचला. हिंदुस्थानांत त्या वेळीं दुष्काळानें कहर उडविला होता. याचें कारण देशांतील पाट-बंधाऱ्याची अनास्था हें प्रमुख आहे, असें हिंदी लोकमत होतेंच, त्याला सर कॉटन यांच्या भाषणानें दुजोरा मिळाला. परंतु सरकारनें त्याची दखल मात्र घेतली नाहीं.

स. १८६७ मध्यें सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचा प्रश्न पुन: उत्पन्न झाला. त्या वेळीं दादाभाईंनीं पुन: चळवळ करून भारतमंत्र्यांकडे एक खलिता पाठविला. दादाभाईंनीं पार्लमेंटच्या अनेक सभासदांची गांठ घेऊन त्यांना हा विषय समजावून दिला. या परीक्षा हिंदुस्थानांत

व इंग्लंडमध्यें एकाच वेळीं व्हाव्यात अशी मागणी होती. परंतु हिंदी लोक त्या जागेला लायख नाहींत अशी हाकाटी विरोधकांनीं सुरू केली. दादाभाईनीं त्यांच्या आक्षेपांना मुद्देसूद उत्तरहि दिलें. ' हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्व्हिसमध्यें हिंदी मनुष्य नको, म्हणणें म्हणजे इंग्लंडमध्यें इंग्लिश मनुष्याला सिव्हिल सर्व्हिसमध्यें घेऊं नये,असें म्हणण्यांतील हा प्रकार नव्हे काय ? ' असा त्यांनीं खडा सवाल टाकला.

असोसिएशनचें काम इंग्लंडमध्यें पद्धतशीरपणें सुरू झालेलें पाहतांच त्याच्या शाखा हिंदुस्थानांतहि काढाव्यात व त्यांना राजे-रजवाड्यांकडून आर्थिक साहाय्य मिळवावें अशी कल्पना निघून त्या कामासाठीं दादाभाईनीं हिंदुस्थानांत जावें असें ठरलें.

हिंदुस्थानांत परत येण्यापूर्वी, असोसिएशनतर्फे एक शिष्टमंडळ भारतमंत्र्यांच्या भेटीस जाऊन हिंदुस्थानांतील पाटबंधाऱ्याबावत कशी हयगय चालू आहे व त्यामुळें देशांत दुष्काळानें किती कहर उडविला आहे, याचें आंकड्यांनिशीं दादाभाईनीं तयार केलेलें एक पत्रक सादर करण्यांत आलें.

स. १८७० सालीं सरकारनें दहा कोटी पौंड खर्चून रेलरस्ता तयार करण्याची योजना आंखली. त्याबरोबर असोसिएशननें पाट-बंधाऱ्याचीं कामें टाकून रस्ता-योजना हातीं घेणें शहाणपणाचें नाहीं,असें सरकारला बजावलें. याच वर्षी गव्हर्नरजनरलनें आपल्या अखत्यारींत त्याला योग्य वाटतील त्या गृहस्थांना परीक्षेशिवाय सिव्हिल सर्व्हिसमध्यें घ्यावें असें बिल पार्लमेंटांत आलें. दादाभाईचा हा एक विजय होय. परंतु त्यांचें म्हणणें असें कीं, आम्हांला अशी कृपेची भाकर नको, बरोबरीच्या नात्यानें चढाओढीच्या परीक्षा घ्या व लायख उमेदवारांना

निवडा. या नेमणुकीविरुद्ध १८८६ पर्यंत सारखी ओरड सुरू होती. १८८६ मध्यें सरकारनियुक्त सिव्हिल सर्व्हन्ट नेमण्याची प्रथा बंद करण्यांत आली.

• • •

## १०. मातृभूमींत जागृति

**असोसिएशनच्या** शाखा स्थापन करण्यासाठीं दादाभाई हिंदुस्थानांत परत येतांच त्यांनीं धडाक्यानें कामास सुरुवात केली. चळवळीचा नारळ मुंबईत फुटला. मुंबईत मोठ्या उत्साहानें शाखा स्थापन होतांच दादाभाईंनीं आपला मोर्चा संस्थानांकडे फिरविला. कच्छ, जुनागड, गोंडळ या संस्थानिकांनीं त्यांचें स्वागत करून द्रव्यसाहाय्यहि चांगलें केलें. अल्पावधींत कलकत्ता, मद्रास व इतर मोठ्या शहरीं असोसिएशनच्या शाखा स्थापन झाल्या व हिंदी संस्थानिकांनींहि भरपूर द्रव्यसाहाय्य दिलें.

याच सुमारास फेरोजशाह मेथा इंग्लंडहून परत आले. त्यांनीं स्वनेत्रांनीं दादाभाईंनीं इंग्लंडमध्यें किती मौल्यवान काम केलें तें पाहिलें होतें व दादाभाईबद्दल त्यांना अत्यंत आदरहि होता तेव्हां मुंबईकरांनीं या महान् देशभक्ताचा योग्य असा सन्मान करावा, अशी सूचना त्यांनीं केली. मुंबईच्या नागरिकांनींहि ती सूचना उचलून धरली व दादाभाईंना मानपत्र व थैली अर्पण करावी असें ठरून तीस हजार रुपये तत्काळ जमाहि झाले. फ्रामजी कावसजी संस्थेमध्यें हा समारंभ ३ जुलै १८६९ रोजीं मोठ्या थाटानें झाला. या निधीपैकीं २५ हजारांची थैली दादभाईंना अर्पण केली व पांच हजार रुपयांचें

भव्य तैलचित्र फ्रामजी कावसजी हॉलमध्यें पुढें लावण्यांत आलें. थैलींतील पैसा अर्थात् असोसिएशनकडे पावता झाला.

आपल्या देशबांधवांनीं आपण केलेल्या अल्पसेवेचा गौरव केला याबद्दल दादाभाईंचें मन उचंबळून यावें हें अत्यंत स्वाभाविक आहे. थैली स्वीकारतांनाहि 'मी ही देणगी विशिष्ट परिस्थितीमुळें व माझ्यावरील तुमच्या प्रेमामुळें आज स्वीकारीत असलों तरी त्याची भरपाई करण्याची संधि परमेश्वरानें लवकर मला द्यावी,' असे अंतःकरणपूर्वक उद्गार त्यांनीं काढले.

हिंदुस्थानांतील कार्य यशस्वी झालेलें पाहून ते पुनः चौथ्या खेपेला इंग्लंडला निघाले. हिंदुस्थानांतील कार्य कल्पनेबाहेर यशस्वी झालें. सामान्यजनतेंत राजकारणाबद्दल विलक्षण उत्साह उत्पन्न झालाच, परंतु देशी राजेरजवाडेहि दादाभाईंची सल्लामसलत घेऊं लागले. वरिष्ठ सत्ता व संस्थानें यांच्या संबंधाबाबतच्या अनेक तक्रारी त्यांनीं मिटविल्या. दादाभाईंची मुत्सद्देगिरी, चातुर्य, चिकाटी या गुणांचा मोठा प्रभाव पडला व याचें पर्यवसान म्हणजे त्यांना बडोद्याच्या दिवाणगिरीची जबाबदारी पत्करावी लागली.

इंग्लंडमध्यें जातांच दादाभाईंनीं असोसिएशनपुढें हिंदुस्थानांतील रेलरस्ते व वाहतूक यासंबंधींचा एक निबंध वाचला. त्यांत रेल्वे कंपन्यांना सरकारनें देऊ केलेल्या सवलती हिंदुस्थानाला बाधक कशा आहेत हें स्पष्ट करून सांगितलें. असोसिएशनचें कार्य वाढत चाललें. सभासदांची संख्याहि हजारावर गेली व तिच्या कार्याचा प्रभाव पार्लमेंटवराहि पडूं लागला. संस्थेला मोठें वाचनालय पाहिजे होतें व तिचें कार्य सतत चालूं राहील असा निधीहि पाहिजे होता. त्या

कामीं दादाभाईंनीं हिंदुस्थानांत जमविलेल्या देणग्या अपुऱ्या होत्या, म्हणून निधि जमविण्यासाठीं दादाभाई परत हिंदुस्थानांत आले. त्यांनीं त्या कार्याला जुंपून घेतलें, अनेक आजीव सभासद नोंदविले. शेंकडों लोकांना विनंतीपत्रें पाठविलीं. त्या वेळीं टाइपरायटर निघाला नव्हता. तेव्हां दादाभाईना आपले सर्व लेख व पत्रव्यवहार हातानें पत्रें लिहूनच करावा लागे. दादाभाईंनीं लंडन असोसिएशनचें काम मन:पूर्वकच चालविलें होतें व ती संस्थाहि त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञ होती. १८७२ मध्यें भरलेल्या वार्षिक सभेंत, असोसिएशनचे अध्यक्ष श्री. ई. बी. ईस्टरिक यांनीं दादाभाईच्या कामगिरीलबद्दल अत्यंत गौरवपर उद्गार काढले.

• • •

## ११. हिंदुस्थानचें शोषण

हिंदुस्थानची प्रजा अत्यंत दरिद्री व ती दिवसानुदिवस जास्तच दरिद्री होत चालली असतां राज्यकारभाराचा खर्च मात्र इतका वाढला कीं, त्याला अन्य तोडच नाहीं. ब्रि० नोकरशाहीच्या बोजाखालीं प्रजा चिरडत आहे. तो बोजा कमी झाला पाहिजे, अशी वस्तुस्थिति. पण इंग्लंडमधील सामान्य जनतेला या गोष्टीची किंचितहि कल्पना नाहीं; यासंबंधांत सत्य माहितीहि मिळणें दुरापास्त. सरकारी माहिती सर्वस्वी चुकीची व अशा चुकीच्या माहितीवर आधारलेले निष्कर्ष तसेच चुकीचे ठरणार हें उघड होतें. दादाभाईंनीं फार परिश्रम करून पुष्कळ माहिती गोळा केली आणि त्या आधारें हिंदी माणसाचें वार्षिक उत्पन्न दर डोकीं सुमारें वीस रुपयांचें आहे असें सिद्ध केलें.

स. १८७०–७१ सालीं जमीनमहसुलाचें उत्पन्न, उत्पन्नाचा एक अष्टमांश धरून दोन कोटी दहा लक्ष पौंड धरण्यांत आलें म्हणजे उत्पन्नासह १६ कोटी ८० लक्ष पौंड; यांत अफू, मीठ, कोळसा याचें व इतर उत्पन्न एकंदर वीस कोटी पौंडाइतकेंच होतें. या उत्पन्नांत दादाभाईनीं जकात, कापड यांचें उत्पन्न धरलें व एकंदर उत्पन्न तीस कोटी पौंड धरलें व हिंदुस्थानची लोकसंख्या पंधरा कोटी म्हणजे दर डोई उत्पन्न २ शिलिंग किंवा हिंदी नाण्यांत वीस रुपयेच पडतें असें दाखवून दिलें.

दादाभाईनीं "हिंदुस्थानच्या गरजा व साधनें" यासंबंधानें एक निबंधच ई. इं. असोसिएशनपुढें १८७० मध्यें वाचला. हिंदी जमाबंदीची एकंदर चौकशी व्हावी अशी मागणी असोसिएशनच्या मुंबई शाखेनें केली. भारतमंत्र्याकडे एक खलिता रवाना करण्यांत आला. याच सुमारास दादाभाईंचा निबंध वाचला गेला. ब्रिटिश स्नेह्यांनीं दादाभाईना पाठिंबा दिला. हिंदुस्थानचें शोषण कसें चाललें आहे याचें उदाहरण दादाभाईनीं असें दिलें—

"इंग्लंडचें उत्पन्न सात कोटी पौंड आहे. पण त्या उत्पन्नांतील पैन् पै इंग्लंडमध्येंच खर्च होते. देशाबाहेर पैसा जात नाहीं. हिंदुस्थानचा महसूल पांच कोटी पौंड, पण त्यापैकीं १। कोटी पौंड प्रतिवर्षीं वाढत्या प्रमाणांत देशाबाहेर जातात."

पुढें दादाभाईंच्या प्रयत्नानें एक चौकशी कमिटी नेमण्यांत आली. दादाभाईंची साक्षाहि कमिटीपुढें झाली. पण लौकरच पार्लमेंटच्या निवडणुकी आल्या, व त्या गोंधळांत कमिटीचा अहवाल बाहेर पडलाच नाहीं.

•••

विभाग
क्रमांक
नों. दि.

## १२. बडोद्याची दिवाणगिरी

**बडोद्याचे** महाराज खण्डेराव यांना विषप्रयोग करून मारल्याच्या आरोपावरून त्यांचे बंधु मल्हारराव यांस सरकारनें नजरकैदेंत टाकलें होतें, परतु पुढें त्यांजवरील खटला काढून घेऊन त्यांस बडोद्याच्या गादीवर बसविण्यांत आलें. मल्हार-रावांना राज्याभिषेक झाला त्या निमित्तानें दरबार भरला असतां मुंबईचे गव्हर्नर सर सेमूर फिजराल्ड याला नेहमींच्या रिवाजाप्रमाणें महारा-जांच्या डाव्या हाताला बसविण्यांत आलें, परंतु तेवढ्यानें सर साहे-बांना अपमान झाला असें वाटून त्यानें व्हाइसरॉयला पत्र लिहून राणीच्या प्रतिनिधीला दरबारांत योग्य त्या मानानें वागविलें नाहीं, अशी तक्रार केली. झालें; कलकत्ता, लंडन, बडोदें येथें पत्रव्यवहार सुरू झाला. मल्हाररावांना योग्य सल्ला देईल असा कोणीहि दरबारांत मुत्सद्दी नव्हता तेव्हां त्यानें दादाभाईकडे मदत मागितली व ती त्यांनीं दिली.

दादाभाईनीं खलिता तयार करून तो वर पाठविण्यांत आला व पुढें हा वाद तात्पुरता मिटला.

पण पुढें असाच आणखी एक प्रसंग उत्पन्न झाला. व्हाइसरॉयनें मुंबईस दरबार भरविला व त्यासाठीं बडोदेकरांना रीतसर निमंत्रणहि गेलें. मल्हारराव हे स्वाभिमानी पुरुष होते. दरबाराला तर जाव-याचें नाहीं, कारण तेथें आपला मान नीट राहणार नाहीं, अशी त्यांची कल्पना, पण हें जमावें कसें ? त्याला योग्य कारण दाखवितां आलें पाहिजे. फिरून दादाभाईंची मदत घ्यावी लागली व दादाभाईनीं त्यांतूनहि मार्ग काढला. महाराजांची पत्नी अकालीं प्रसूत झाली

होती व त्यांना झालेलें मूल थोड्याच दिवसांत वारलेंहि होतें. तेव्हां दादाभाईनीं असें सुचविलें कीं, 'माझी पत्नी अत्यवस्थ असल्यानें मला दरबारांत हजर राहणें शक्य नाहीं. तरी माफी असावी.' दादाभाईनीं हा मार्ग सुचविला त्यामुळें त्यावेळेला तरी महाराज वांचले. दादाभाईनीं आपणांवर मोठे उपकार केले त्याची फेड म्हणून महाराजांनीं त्यांना पन्नास हजार रुपये देऊं केले. पण दादाभाई ते स्वीकारीनात. तेव्हां महाराजांनीं 'तुम्हांलाहि मुलेंबाळें आहेत. त्यांना म्हणून मी देतों ते तुम्ही घेतलेच पाहिजेत, असें बजावलें. त्यावर दादाभाईनीं आपल्या अनेक स्नेहीसोबत्यांचा सल्ला घेऊन अखेरीस मोठ्या मिनतवारीनें ती रक्कम स्वीकारली. पण त्याच वेळीं महाराजास बजावलें, "मी असोसिएशनच्या कामासाठीं येथें आलों आहें. ते सर्व पैसे असोसिएशनकडे जमा करीन."

मल्हाररावांनीं कारभार हातीं घेतला तेव्हां तेथें सर्वत्र गोंधळ माजला होता. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी स्थिति. मल्हाररावांच्या विरुद्ध तेथें एक मोठा गट होता. त्याचीं मल्हाररावाविरुद्ध कारस्थानें चालूच होतीं. या आपत्तींतून आपणांस कोण सोडवील असा विचार करतांना मल्हाररावांना सहजच दादाभाईंचें नांव सुचलें, व त्यांनीं बडोद्याचें दिवाणपद स्वीकारावें अशी त्यांना गळ घातली. बडोदा राज्यांत अंदाधुंदी माजली असून तेथील कारभाराची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमावें, असें हिंदुस्थानसरकारनें ठरविलें. मल्हाररावास हा मोठा अन्याय वाटला. तेव्हां त्यांनीं तांतडीनें दादाभाईस बोलावलें, व दादाभाईनींहि आपल्या आंग्लमित्रांचा सल्ला घेऊन नाइलाजास्तव ती जागा स्वीकारली.

ही वार्ता दरबारी लोकांस व रेसिडेन्सींस समजांच तेथें मात्र गडबड उडाली. कारण दादाभाईनीं अधिकार हातीं घेतला कीं दरबारांतील केरकचरा साफ होणार म्हणून दरबारी लोक नाखूष, रेसिडेन्ट कर्नल फेयर यांसहि ती नेमणूक मुळींच मान्य नव्हती, म्हणून मल्हाररावांनीं केलेल्या नेमणुकीस रेसिडेन्ट मान्यता देण्यास दिरंगाई करूं लागला. दरबारांत मल्हाररावांच्या विरुद्ध एक गट होताच. त्यानें या दिरंगाईचा फायदा घेऊन, दादाभाई येथून लवकरच जाणार अशी भुमका उठविली. त्याचा परिणाम असा झाला कीं, सरकारी कामें वक्तशीर होईनात. मल्हाररावांच्या चमत्कारिक वागण्याचा परिणाम दादाभाईवरहि चांगला झाला नाहीं. रेसिडेन्सींतील लोक रयतांना महाराजांविरुद्ध उठावणी देत, दिवाणपदाला रेसिडेंटची मान्यता नाहीं, अशा स्थितींत कांहीं स्वार्थी दरबाऱ्यांनीं दादाभाईविरुद्ध महाराजांचेच कान भरण्यास सुरुवात केली. मल्हारराव फार चंचल-वृत्तीचे. त्यांना असें वाटूं लागलें कीं, आपली निवड चुकली कीं काय ?

दरम्यान मल्हाररावाच्या राज्यकारभाराची चौकशी मुंबईला सुरू झाली होती. कमिशननें आपला अहवाल सादर केला त्यांत मल्हार-रावांनीं केलेल्या अनेक कृत्यांचा उल्लेख केला होता व त्यांचा करभार दौलतीला न साजेसा, दंडेलीचा व अन्यायाचा आहे असा निर्णय दिला. मल्हाररावांकडे अहवाल पाठविण्यांत आला व त्याला उत्तर काय पाठवावें याचा विचार सुरू झाला. दादाभाईनीं सुचविलें कीं, ' यापुढें राज्यकारभार सुव्यवस्थित करीन व तसा करण्याची मला संधि द्यावी, ' असें उत्तर द्यावें. मल्हाररावांस ही सूचना

नापसंत झाली. पण अखेर दादाभाईनीं दिलेला निर्णय मल्हाररावांस पटला व तसें उत्तर रेसिडेन्टकडे पाठविण्यांत आलें.

अशी सर्वत्र तंग परिस्थिति निर्माण झाली होती व त्यांत नित्यशः भर पडत होती. राजघराण्यांतील एका मुलीचा पति तिला नीट वागवीना म्हणून तिनें घर सोडून ती मोतीबागेंत जाऊन राहिली. तिला जबरीनें परत आणण्याचा घाट तिच्या पतीनें घातला व रेसिडेन्टानें अवश्य तर त्या कामासाठीं लष्करी लोक देण्याचें मान्य केलें. दादाभाईस ही गोष्ट समजली. त्यांनीं रेसिडेन्ट, त्या मुलीचा पति, ती मुलगी यांच्या भेटी घेऊन मी हें प्रकरण लवकर मिटवितों, असें सांगितलें; परंतु कांहीं सांगितलें तरी ती राजकन्या पतीच्या घरीं जाण्यास तयार होईना ! तेव्हां दादाभाईनीं महाराजांच्या नांवें तिला पत्र लिहून पतीच्या घरीं न गेल्यास तुला मिळणारी तैनात बंद करण्यांत येईल असें सांगितलें, तेव्हां हा सर्व वाद मिटला. पण दादाभाईंचे मन व्यग्र होण्यासारखे असले प्रकार नित्याचे होऊन बसले. अद्याप दिवाण म्हणून त्यांना मान्यता मिळाली नव्हतीच, महाराजांचें भवितव्य अधांतरी होतें. तथापि दादाभाईनीं आपलें काम उत्तम चालविलें होतें. कामांत पद्धत निर्माण केली, प्रांतांत दौरे काढून रयतांच्या तक्रारींची दाद लागूं लागली.

बडोदा राज्यांत न्यायविक्री उघडपणें चाले. ती प्रथा बंद केली. नजराणा पद्धतहि बंद करण्यांत आली. पोलिसांना शिस्त व वळण लावण्यांत आलें. एकंदर राज्यकारभारांत अनेक सुधारणा होऊं लागल्या. आणि स्वतः मल्हारराव जर दादाभाईंच्या सर्वस्वी तंत्रानें वागते तर त्यांजवर आपत्ति आलीहि नसती. परंतु त्यांच्या भोंवतीं सर्व होयबांचा वेढा पडलेला;

त्यांतून ते बाहेर पडणेंच अशक्य होतें. दादाभाईंनीं नजराणापद्धत बंद केली, तेव्हां मल्हाररावांभोंवतालच्या कुटाळांनीं त्यांच्या मनांत भरवून दिलें कीं, 'महाराज नजराणा म्हणजे आपली मिळकत, तींत दिवाणानें हस्तक्षेप करण्याचें कारण काय ?' महाराजांसहि ही गोष्ट पटली व दिवाणांनीं नजराण्याची सर्व रक्कम वसूल करावी अशी मागणी केली. परंतु दादाभाईंनीं पूर्ण विचारान्तीं ती गोष्ट ठरविली असल्यानें त्यांनीं उलट सांगितलें कीं, आपणाला हवें तें करा, मी राजीनामा देतों. दादाभाईंचा राजीनामा म्हणजे ब्रिटिश हस्तक्षेप व पदच्युती ही गोष्ट महाराजांस आतां उमगली. दादाभाईंना काय हवें तें यादी करून पाठवा म्हणजे आपण त्याचा विचार करूं, असें महाराजांनीं दादाभाईंस सुचविलें. दादाभाईंनीं आपली दहा कलमी योजना महाराजांकडे दिली. तीवर विचार होत आहे तोंच व्हाइसरॉयाकडून एक खलिता येऊन धडकला. त्यांत महाराजांनीं आपला दिवाण नेमावा व राज्यकारभार १८७५ अखेरपर्यंत जर सुधारला नाहीं तर पदच्युत व्हावें लागेल अशी तंबीहि त्यांत दिली होती.

दादाभाईंच्या प्रयत्नानें मल्हाररावांस यश मिळालें होतें तरी त्यामुळें रेसिडेन्ट कर्नल फेयर याच्या अंगाची आग झाली, व महाराज कसें टिकतात पाहूं असें उद्गार त्यानें काढले ! दोन-तीन महिन्यांत सर्व बडोदा राज्य दिवाणाविरुद्ध उभे करतों, पाहा चमत्कार ! असेंहि तो बडबडला. दादाभाईंच्या कामीं या वार्ता जात होत्याच. पण त्यांनीं तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. परंतु ज्याच्या जिवावर दादाभाई संस्थान सुधारूं इच्छित होते, त्या मल्हाररावांना वाटलें, आतां दीड वर्ष तरी आपल्याला भीति नाहीं. मग दिवाणाच्या तंत्रानें इतकें

वागावयाचें तरी कशाला ? या गोष्टींची दादाभाईंना कल्पना येतांच ते त्यांचे जोडीदार वाडिया यांनीं आपल्या जागांचे राजीनामे दिले. त्याबरोबर महाराज घाबरले. दादाभाई गेले तर आपला निभाव लागणार नाहीं असें त्यांस मनोमन पटून त्यांनीं दादाभाईंची इतकी विनवणी केली कीं, दादाभाईंना आपला राजीनामा परत घ्यावा लागला.

दादाभाई संस्थानचा दिवाण होणें ही गोष्ट रेसिडेन्ट कर्नल फेयर यांस प्रथमपासूनच नापसंत होती, तेव्हां त्यानें मल्हाररावांच्या विरोधी पक्षांतील बापुभाई, गोविंदराव मामा यांच्या करवीं महाराजांस निरोप पाठविला कीं, दादाभाई व त्यांचे हस्तक ताबडतोब बडतर्फ करा, व आपला हस्तक मणीभाई हा उत्तम कारभारी असल्यानें त्याच्या हातीं सर्व कारभार सोपवा. तसें न केल्यास त्याचा परिणाम वाईट होईल. दादाभाईंना ही वार्ता समजतांच ते महाराजांना भेटून म्हणाले, “ महाराज, राज्य सुधारणा करण्याची तुमची मनापासून इच्छा असेल तर व्हाइसरॉय तुमचें ऐकतील, त्यांना अपणाबद्दल सहानुभूति वाटते. तेव्हां मी दिवाणपदीं राहावें कीं कसें हें तुम्ही विचार करून ठरवा. ”

या वेळीं महाराजांनीं रेसिडेन्टची भीति न धरतां दादाभाईंना दिवाणपदीं कायम करून त्यांजवर आपला पूर्ण भरंवसा आहे, असें नेमणूक पत्रांत स्पष्ट लिहिलें व २३ सप्टेंबर १८७४ रोजीं दरबार भरवून दादाभाईंना दिवाणगिरीची वस्त्रें दिलीं. अखेर या गोष्टीला रेसिडेन्टनेंहि मान्यता दिली. हिंदुस्थानसरकारनेंहि फर्मान काढून रेसि-

डेन्टला आज्ञा केली कीं, 'संस्थानांत ज्या ज्या सुधारणा करण्यांत येतील त्यांना रेसिडेन्सीनें सर्वतोपरी साहाय्य करावें.

इतका प्रकार झाला तरी दादाभाईंना बदनाम करण्याचा प्रयत्न रेसिडेन्टनें चालूच ठेवला व त्यांच्या विरुद्ध अनेक खोट्यानाट्या गोष्टी हिंदुस्थान सरकारकडे पाठवूं लागला. महाराजांनाहि दादाभाई नको आहे. त्यांच्या जागीं माझा दुय्यम मणीभाई हा फार लायक असल्यानें त्यांस दिवाण म्हणून नेमावें अशी सूचनाहि पत्रद्वारें हिंदुस्थान सरकारला केली.

तेव्हां मुंबई सरकारनें रेसिडेन्टला चांगली तंबी देऊन दिवाण नेमण्याचा अधिकार महाराजांचा आहे तुमच्या तक्रारींत कांहीं अर्थ नाहीं. यापुढें असल्या तक्रारी करतां कामा नयेत असें कळविलें. महाराज छंदिष्ट होते व त्यांनीं माजी दिवाण व मेहुणा खानवलकर व दुसरा गुंड दामोदर यांस दूर केलें नाहीं. खानवलकर यास आपला प्रतिनिधि म्हणून ठेवला, व दामोदर हा तर रेसिडेन्टचा हस्तकच होता.

• • •

## १३. राजीनामा व महाराजांची पदच्युती

**दादाभाईंना** दिवाणपद मिळतांच त्यांनीं एक-चतुर्थांश सारा माफी केली. नजराणापद्धत बंद केली. वेठ—बिगार कायद्यानें बंद केली. अनेक सरदारांच्या इस्टेटी जप्त केल्या होत्या त्यांच्या तक्रारींचा विचार चालूच होता. परंतु सरदार लोक दिवाणांना मानीनात. महाराजांचाहि अपमान करूं लागले. अर्थात् त्यांना कोणाची तरी फूस होती हें सहज लक्षांत येईल. राज्यांत दिवाण ज्या सुधारणा करील त्यांना

रेसिडेन्टनें साहाय्य केलें पाहिजे, असा हिंदुस्थानसरकारचा स्पष्ट आदेश असतां रेसिडेन्ट फेयर हा दिवाणांना मदत न देतां त्यांच्या कामांत विघ्नेंमात्र आणूं लागला. दादाभाईना या गोष्टीचा अत्यंत त्रास होऊं लागला, तेव्हां महाराजांच्या संमतीनें सरकारकडे रेसिडेन्टला तेथून काढून घ्यावा अशी मागणी केली. त्या खलित्यांत अत्यंत प्रभावी भाषेंत रेसिडेन्ट आपल्या कामांत विघ्नें कशी निर्माण करीत आहे याचीं अनेक उदाहरणें दिलीं. हिंदुस्थान सरकारची तशी खात्री पटली व त्यांनीं कर्नल फेयरची उचलबांगडी करून त्या जागीं सर लुइस पेली याची नेमणूक केली. मल्हाररावांचा हा मोठाच विजय होता. परंतु दरबारी लोक स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं मल्हाररावांचे कान फुंकण्यास सुरुवात केली. नजराणा पद्धत बंद केल्यामुळें मल्हाररावांचें नुकसान झालेंच होतें. दादाभाईंनीं त्यांना स्पष्टच बजावलें होतें कीं, नजराण्याच्या पैशाला स्पर्श कराल तर मी लागलीच येथून चालूं लागेन.

दरबारी लोकांचे हे खेळ पाहतांच दादाभाईंनीं महाराजांस स्पष्टच सांगितलें कीं, या सर्व दरबारी लोकांना नेमणुका द्या, असें म्हणतां पण तिजोरींत तर पैसा नाहीं. इकडे दरबारी लोकांनीं रेसिडेन्सींतील लोकांच्या मदतीनें पैशाचा तगादा लावला. महाराज खासगींतून एक पैहि देण्यास तयार नव्हते.

असा प्रकार सुरू असतां आणखी एक संकट दत्त म्हणून उभें राहिलें. कर्नल फेयर याला रेसिडेन्ट म्हणून कमी केला असला तरी त्याचा अखेरचा हुकूम येईपर्यन्त तो बडोदा येथेंच होता. तो दररोज घोड्यावरून रपेटीला जात असे व परत आल्यावर सरबताचा एक पेला घेई. दि. ९ नोव्हेंबर या दिवशीं नित्याप्रमाणें त्यानें सरबताचें

एक दोन घोट घेतले व बाकीचें बेचव लागलें म्हणून सर्व घेतलें नाहीं. तोंच त्याचें डोकें फिरूं लागलें. तेव्हां त्याला शंका आली, व डॉक्टरकडून पेल्यांतील अवशेष तपासून पाहतां त्यांत कांहीं अर्सेनिक व हिऱ्याचा चुरा असल्याचें आढळून आलें. फेयरनें मुत्सद्यानें सर्व प्रकार सरकारकडे लिहून कळविला. आपला यांत कांहींहि संबंध नाहीं, असें महाराजांनीं दादाभाईस सांगितलें. पण त्यांच्या मागें भगभग वाढली मात्र.

सर पेली हे नवे रेसिडेन्ट म्हणून आले. ते स्वतः हुशार व कार्यदक्ष होते. दादाभाईच्या कामाचें चीज करणारा तो गृहस्थ होता. दरबारच्या अनेक भानगडी मिटवावयाच्या होत्या. दरबारी लोक तक्रारी घेऊन रेसिडेन्टकडे गेले कीं तो त्यांना सरळ सांगे. " प्रथम दिवाणांच्याकडे जा. तेथें तक्रारी न मिटल्या तर मग पुढें पाहतां येईल. यापुढें लांडी-लबाडी, कारस्थानें चालणार नाहींत. " अशा रीतीनें रेसिडेन्टकडे आपली मात्रा चालणार नाहीं अशी दरबारी लोकांची खात्री पटतांच कामाचा उरक झपाट्यानें होऊं लागला. पण त्यालाहि पैसा हवा होता. दादाभाईनीं महाराजांस सुचविलें, आपण खासगींतून पैसा द्या, म्हणजे कामें झटपट उरकतील.

महाराजांना वाटलें, आतां आपलें काम झालें. शत्रु गेला आहे. आतां दादाभाईची मनधरणी कशाला ? त्यानें सांगितलें पैसा हवा असेल तर कर बसवा, कर्ज काढा. मी पैसे देणार नाहीं. भोंवतालीं जुन्या दरबाऱ्यांचा गराडा होताच. ते दादाभाईच आतां खरा राजा, असें मल्हाररावांदेखत उपरोधिक बोलत. दादाभाईनीं भोंवतालचे दरबारी बडोद्यांबाहेर काढून लावा, म्हणून एकदां मल्हाररावांस स्वच्छ बजावलें. महाराज त्या गोष्टीस तयार होईनात. शेवटीं गोष्टी अशा

थराला गेल्या कीं, येथें राहून आपला कांहीं उपयोग होणार नाहीं. अशी दादाभाईंची खात्री झाली व त्यांनीं राजीनामा देण्याचें ठरविलें. त्या बरोबर, वाडिया, बाळ मंगेश, शाहबुद्दिन हे लोक दादाभाई बरोबर आले होते, त्यांनींहि राजीनामे देण्याचें ठरविलें. दादाभाईंनीं मुंबई सरकारकडूनहि कांहीं अधिकारी मागून घेतले होते. तेहि दादाभाईंच्या मागें राहण्यास तयार नव्हते.

दादाभाई राजीनामा देणार ही वार्ता रेसिडेन्ट पेलीला समजली, तेव्हां त्यानें अनेक प्रकारें आग्रह करून त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण दादाभाईंनीं आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. एकदां दादाभाई रेसिडेन्सींत गेले असतांना सर पेली यानें त्यांना सांगितलें कीं, कर्नल फेयरला विष घालण्यांत महाराजांचें अंग होतें, असा कबुलीजबाब दोन इसमांनीं दिला आहे. खुद्द दादाभाईंच्या समोर त्या इसमांनीं कबुली दिली. महाराजांवर हें भलतेंच संकट आलें. दादाभाईंनीं महाराजांस ही गोष्ट कळविली व दि. ११ जानेवारी १८७५ या दिवशीं दादाभाईंनीं आपल्या मदतनीसांसह बडोदा सोडला. मल्हाररावानें अगदीं गाडींत बसेपर्यंत दादाभाईंनीं जाऊं नये म्हणून आर्जवें चालविलीं होतीं.

इकडे दादाभाईंनीं बडोदा सोडला व तिकडून पुण्याहून मुंबई-मार्गे एक पलटण बडोद्याकडे रवाना झाली. असें सारखें सैन्य येऊं लागतांच मल्हारराव गडबडले व त्यांनीं दादाभाईंना तार करून बोलावलें. दादाभाईंस तार मिळाली व त्याबद्दल विचार करीत आहेत तोंच ' टाइम्स ऑफ इंडिया ' पत्रांत मोठ्या अक्षरांत बातमी प्रसिद्ध झाली. " मल्हाररावांस अटक. "

मल्हाररावांस अटक झाली व चौकशी कमिशन नेमण्यांत आलें. मल्हाररावांचे सॉलिसिटर्स मे० जेफर्सन व पेन यांनीं भाई शंकर नानाभाई यांना बडोदा येथें पुरावा जमा करण्यासाठीं पाठविलें, परंतु बडोद्यास कोणी तोंड उघडच्यास तयार झालें नाहीं. दादाभाईजवळ कांहीं कागदपत्र होते ते त्यांनीं सॉलिसिटरना दिले. कर्नल फेयरला विष घालण्यापूर्वीं तीन दिवस त्याला तेथून बदलल्याचें प्रसिद्ध झालें असतां त्याला विष घालण्याचें कारणच काय? असा एक महत्त्वाचा मुद्दा होता पण महाराजांचा अत्यंत विश्वासू समजला जाणारा दामोदर यानेंच महाराजांविरुद्ध साक्ष दिली.

विषप्रयोग करण्यांत महाराजांचा हात नसावा ही गोष्ट कमिशननें मान्य केली, परंतु अत्यंत गैरशिस्त कारभाराच्या आरोपावरून मल्हाररावांस पदच्युत करून हद्दपार करण्यांत आलें व दादाभाईंच्या बडोदा कारकीर्दीतील नाटकावर अखेरचा पडदा पडला.

• • •

## १४. नगरसेवा व इंग्लंडला प्रयाण

**बडोद्याला** दादाभाईंनीं एकंदर तेरा महिने काढले. एखाद्या संस्थानचा राज्यकारभार आपल्या मनाप्रमाणें सुधारून दाखवावा ही त्यांची मनाची ईर्षा, परंतु रेसिडेन्टचा विरोध, दरबारी मंडळाचा विरोध व खुद्द मल्हारराव अत्यंत चंचल वृत्तीचे यामुळें त्यांना तेथून कांहीं विशेष कामगिरी न करतां परत यावें लागलें. बडोद्यास त्यांना विविध प्रकारचा मानसिक त्रास झाला व त्याचा परिणाम त्यांच्या शरीरावरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं.

तेव्हां बडोद्याहून परत येतांच त्यांनीं चार महिने विश्रांती घेतली व नंतर लागलीच कामास लागले. मुंबईच्या नगरपालिकेंत त्यांची निवड झाली. तेथें निवडून येतांच त्यांनीं कारभाराकडे लक्ष दिलें.त्यांत विहारच्या तलाव बांधण्यासाठीं नगरपालिकेनें सरकारकडून घेतलेल्या कर्जाची व्याजवसुली सरकार वाजवीपेक्षां जास्त करीत असून नगरपालिकेला पन्नास लक्षांचा भुर्दंड विनाकारण भोगावा लागत आहे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं येतांच ऑडिट जनरलपासून थेट स्टेट-सेक्रेटरीपर्यंत तो प्रश्न नेऊन भिडविला पण त्याचा निर्णय लागण्यापूर्वीच त्यांना इंग्लंडमध्यें जावें लागल्याकारणानें त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला.

दादाभाई थोडेच दिवस नगरपालिकेंत होते पण त्या अवधींत त्यांनीं निष्ठापूर्वक असें काम केलें कीं त्याचा प्रभाव इतरांवर पडला, व त्यांनीं दादाभाईंच्या उत्कृष्ट कामगिरीचा उल्लेख स्वतंत्र ठराव करून केला. आतांपर्यंत असा ठराव करण्याची प्रथा मुंबईच्या महानगरपालिकेंत नव्हती. ती गोष्ट अत्यंत मानाची समजली जाई व तो मान दादाभाईंना मिळाला. स. १८७५ ऑगस्टमध्यें मुंबईच्या शेरिफनीं एक सभा बोलावून हिंदुस्थानांत प्रिन्स ऑफ वेल्स ( नंतर सातवे एडवर्ड) येणार यांचा सत्कार करावा असें ठरलें.या सभेंतहि दादाभाईंनीं भाग घेऊन कांहीं देणगीहि दिली.

दादाभाई हिंदुस्थानांत असतांना त्यांचीं मुलें—दोन मुली व एक पुतण्या इंग्लंडमध्यें शिकण्यासाठीं राहिले होते. त्यांजवर दादाभाईंचे मित्र मंचरजी दादीना हे देखरेख करीत. त्यामुळें उभय कुटुंबांचा घनिष्ठ संबंध आला व पुढें दोन्ही कुळांत शरीरसंबंध होऊन ते दृढ झाले.

दादाभाईंचा एकुलता एक मुलगा आदी त्याचा विवाह दादिनाची

मुलगी वीर इच्याशीं व मुलगी शिरीन इचा विवाह दादिनाचा मुलगा फ्रामजी याच्याशी आणि द्वितीय कन्या मार्की इचा विवाह फ्रामचा कनिष्ठ बंधु होमी याच्याशीं ठरला; व ही गोष्ट दादाभाईंना कळविण्यांत आली, तेव्हां त्यांनीं फार खर्च न करतां विवाह उरकून घ्या एवढेंच दादिनांना कळविलें. त्याप्रमाणें विवाह झाले. दादाभाईंचा मुलगा आदी हा डॉक्टरीची परीक्षा पास झाला व स्वतंत्र धंदा करूं लागला. दादाभाईंना पुढें नातू झाला. त्याचे नांव करशेट. हा मोठा धाडशी व शूर होता. महायुद्धांत त्यानें भाग घेऊन चांगलें नांव कमावलें.

स. १८७५ मध्यें दादाभाईंची मातुश्री वारली. जिनें दादाभाईंच्या शिक्षणासाठीं अनेक खस्ता खाल्लया, तिनें दादाभाईंना वैभवावर चढलेलेंहि पाहिलें. दादाभाईंना मात्र मातृवियोग फार जाणवला.

• • •

## १५. भारताचें दारिद्र्य–इंग्रजी सत्ता

मुंबई नगरपालिकेंत अल्पकाळ काम केलें पण त्यां वेळांत त्यांनीं नगरपालिकेच्या पन्नास लक्ष रुपयांची बचत करून आपलें नांव तेथें अजरामर केलें. दादाभाई हे हाडाचे राजकारणी. इंग्रजांची राजवट हिंदुस्थानांत सुरू झाल्यापासून हिंदुस्थानची प्रत्येक कामास पिच्छेहाट होत असून दुष्काळामागून दुष्काळ, लोक दरिद्री जास्त होऊं लागले, या सर्वांचें आदि कारण म्हणजे जळूप्रमाणें इंग्रज सत्ताधारी हिंदुस्थानचें करीत असलेलें शोषण हें होय. हें शोषण बंद पडल्याखेरीज हिंदुस्थानची स्थिति

सुधारणें शक्य नाहीं, अशी त्यांची खात्री पटली होती, व हा इंग्रजी अत्याचार बंद करावयाचा असेल तर इंग्लंडचें लोकमत अनुकूल करून घेतलें पाहिजे; कारण इंग्लंडमध्यें खरीखुरी लोकशाही नांदत असून जनता ठरवील त्याप्रमाणें राजशासनपद्धति बदलू शकते, अशी त्यांची खात्री पटली होती. इंग्लंडमध्यें ते स्वत: लोकजागृतीचें कार्य अत्यंत निष्ठेनें करीत होते व त्याच कामाला पाठिंबा मिळावा म्हणून हिंदुस्थानांतहि त्यांनीं असोसिएशनच्या शाखा काढल्या होत्या, हें आपण मागें पाहिलेंच आहे.

लंडन शाखेमार्फत हिंदुस्थानला उपयुक्त व लाभदायक अशा अनेक प्रश्नांवर चर्चा होई.त्यांत अनेक इंग्रज लोकहि भाग घेत. व ती असोसिएशन लंडनमध्यें प्रतिष्ठा पावली होती.सन १८७६ मध्यें मुंबईस असोसिएशनमध्यें "Poverty and Un-British rule in India" या विषयावर एक प्रबंध दादाभाईनीं वाचला. या प्रबंधांत आंकडेवारीनें हिंदुस्थानचें दारिद्र्य इंग्रजी सत्ता स्थापित झाल्यापासून कसकसें वाढत गेलें याची साधार माहिती दिली. हिंदी माणसाचें उत्पन्न फक्त वर्षाला वीस रुपये असल्यानें त्याच्या जीवनाला आवश्यक अशा गरजाहि तो भागवूं शकत नाहीं. तुरुंगांतील कैद्यापेक्षांहि तो वाईट जिणें जगतो व या सर्वांचें कारण एकच, इंग्लंडनें चालविलेलें भारताचें शोषण व या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं अनेक इंग्रजांचेच आधार दिले.

देशांत उद्योगधंद्यांची वाढ झाली पाहिजे. पण त्यासाठीं लागणारें भांडवल हिंदुस्थानजवळ नाहीं. हिंदी धंद्यांना संरक्षण दिलें पाहिजे, इत्यादि अनेक मुद्दे त्यांनीं मांडले व इंग्रज अधिकाऱ्यांना ते खोडूनहि

काढतां आले नाहींत. दादाभाईंच्या मुद्द्यांना उत्तर देण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला. सन १८८२ मध्यें लॉर्ड क्रोमर व सर डेव्हिड बार्बर यांनीं हिंदी माणसाचें उत्पन्न २७ रुपये ठरविलें. सन १९०१ मध्यें लॉर्ड कर्झनची मजल तीस रुपयांपलीकडेहि गेली नाहीं. यावरूनच दादाभाईंनीं किती परिश्रमानें निबंध तयार केला हें ध्यानीं येईल.

सन १८७६ ते १८८१ हा काळ दादाभाईंना जरा शांततेचा गेला. लॉर्ड लिटनच्या कारकीर्दींत दडपशाहीचे अनेक कायदे झाले, त्यामुळें दादाभाई जरा उदास झाले, परंतु ते स्वस्थ मात्र बसले नाहींत. दादाभाईंची कंपनी व्यापाराचें काम करीत होती, पण तींत दादाभाईंना लक्ष घालावयास वेळ सांपडत नसे. या अवधींत त्यांना कंपनीच्या व्यवहाराकडे जास्त लक्ष पुरवावें लागलें. आतांपर्यंत दादाभाई हिंदुस्थानांत असतांना त्यांचा प्रतिनिधि म्हणून दादी डोसाभाई कामा हा कंपनीवर देखरेख करी. त्यांनीं दादाभाईंशीं केलेल्या पत्रव्यवहारावरून कंपनी एकंदरींत नुकसानींतच चालली होती, असें दिसतें.

कंपनीचा हा गोंधळ चालू असतांहि दादाभाईंनीं हिंदुस्थानासंबंधीं सर्व प्रकारची आंकडेवार माहिती जमविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न चालविला होता. ई. इं. कंपनीच्या नोकरांचे पगार काय असत, एकंदर जमा किती होई, अशा प्रकारची माहिती सरकारी दप्तरांतून मिळविण्याचे भगीरथ प्रयत्न त्यांनीं चालविले.

विल्यम वेडरबर्नचे बंधु सर डेव्हिड वेडरबर्न हे कॉमन्स सभेचे सभासद होते. त्यांजकडून वेगवेगळ्या खात्यांतील नोकरांचे पगार काय व त्यांना पेन्शन किती दिलें जातें, ही माहिती पार्लमेंटांत

विचारावयास लावून ती जमा केली. हिंडमन यांजकडूनहि अशीच माहिती जमा केली आणि त्यावरून भारताचें शोषण कसें चाललें आहे ही गोष्ट स्पष्ट दिसून आली व 'भारताचें दारिद्र्य' या विषयावर त्यांनीं प्रबंध तयार केला. तो अत्यंत अभ्यसनीय व ब्रिटिश राजनीतीचें कुटिल स्वरूप सत्यरूपांत समजण्यास फार उपयोगी ठरलेला आहे.

दादाभाईनीं आपला प्रबंध तयार करण्यापूर्वीं भारतमंत्र्यांपासून तों तहत अनेक बड्या अधिकाऱ्यांकडून माहिती जमविण्याचा दीर्घोद्योग केला. अर्थात सर्वांनींच ती पुरविली असें नसलें तरी जी माहिती दादाभाईनीं प्रसिद्धिली ती निरपवाद अशीच होती. दादाभाईंचा मुख्य कटाक्ष होता तो बड्या नोकऱ्यांबद्दल. सर्व बडे हुद्देदार इंग्लिश, त्यांना पगार, पेन्शन भरपूर व तो सर्व पैसा देशाबाहेर जातो. शिवाय हिंदुस्थानांत नोकरी करून त्यांना जो अनुभव मिळतो, त्याचा उपयोग हिंदुस्थानाला होत नाहीं तो नाहींच. हिंदुस्थानचें हें दुहेरी नुकसान होतें असें दादाभाईंचें म्हणणें.

" इंग्रजी अमलामुळें जीवितवित्ताला सुरक्षितता लाभली ही गोष्ट एक दृष्टीनें खरी असली तरी इंग्लंडची जी पकड पडली आहे तीपासून सुरक्षितता मात्र राहिली नाहीं. कारण प्रतिवर्षी चार कोटी पौंडांचें शोषण सतत सुरूच आहे. सतत गोऱ्या लोकांची भरती सुरूच आहे. यावरून अशी परिस्थिति निर्माण झाली आहे कीं, आतांपर्यंत हिंदुस्थानवर झालेल्या अनेक परकीय स्वाऱ्यांपेक्षांहि इंग्लंडची सत्ता अत्यंत घातुक ठरली आहे. माझी ही विनंती इंग्रज सद्गृहस्थाला

आहे, त्यानें ही स्थिति नीट ध्यानांत घ्यावी म्हणून मीं तळमळीनें ही वस्तुस्थिति त्यांजपुढें मांडीत आहे "

अशा प्रकारानें दादाभाईनीं वर्षानुवर्षे इंग्रज जनतेपुढें तळमळून भारताचें गाऱ्हाणें मांडलें. सतत २५ वर्षें त्यांनीं ही चळवळ केली, तेव्हां कोठें थोड्याशा सुधारणा लागू करण्यांत आल्या. दादाभाईनीं या पुस्तकांत आर्थिक व राजकीय या दोन्ही बाजू मांडल्या. मालाचें उत्पादन, वाटप, कर, रेल्वे, परदेशी व्यापार, किंमती, मजुरी, चलन, हुंडणावळ, सरकारी कर्ज, उत्पन्न व भारताचें द्रव्य-शोषण या विविध स्वरूपाचें विवेचन आर्थिक बाजू मांडतांना केलें व राजकीय बाजू मांडतांना इंग्रजी राज्यकारभाराचा अंतिम हेतु, मोठ्या नोकऱ्या हिंदी लोकांना देणें (लष्करांत व मुलकी खात्यांतहि), भारतमंत्री व ब्रिटिश पार्लमेंट व हिंदुस्थान या परस्परांचे संबंध, कायदेमंडळांत हिंदी लोकांना प्रतिनिधित्व, देशी संस्थानें व रशियाच्या स्वारीची संभाव्यता, इत्यादि गोष्टी मांडतांना राज्यकर्त्यांना न रुचेशा गोष्टीहि दादाभाईंना सुनवाव्या लागल्या. हिंदुस्थानांत राज्यकारभार एकंदरीनें, ब्रिटिशांना न शोभेसा, व आत्मघातकीपणाचा कसा आहे, ही गोष्ट दादाभाईनीं अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडली. इंग्लंडमध्यें जी राज्यघटना आहे तिला न साजेसा हिंदुस्थानांतील एकंदर कारभार चालला आहे ही गोष्ट दादाभाईनीं अत्यंत स्पष्टपणें आपल्या पुस्तकांत मांडिली.

• • •

वा. क. ५६५७ नो १२
का. ना.

## १६. हिंदुस्थानांतील कामगिरी

स. १८८१ मध्यें दादाभाईनीं लंडन येथील आपली पेढी बंद केली तथापि कामा कंपनीच्या मार्फत मुंबईशीं त्यांचा व्यापारधंदा चालूच होता. ते मातृभूमीस परतले, तेव्हां हिंदुस्थानांतील राजकीय वातावरण जरासें निवळलें होतें. लॉर्ड लिटनची जुलुमी कारकीर्द संपून त्या जागीं लॉर्ड रिपन यांची व्हाइसरॉय म्हणून नेमणूक झाली होती व दादाभाईंना आतां राज्यकारभारांत कांहीं सुधारणा होतील अशी आशा वाटूं लागली होती.

सन १८८१ मध्यें एक एज्युकेशन कमिशन नेमण्यांत आलें. त्यापुढेंहि दादाभाईनीं आपली कैफियत सादर केली. इतर राज्यकार-भारांत जी स्थिति होती तीपेक्षां शिक्षणांत कांहीं जास्त प्रगति नव्हती इतकेंच नसून शिक्षणाची सर्वस्वी हेळसांड कशी होत आहे, ही गोष्ट त्यांनीं साधार व मुद्देसूदपणें कमिशनपुढें मांडिली. त्यांनीं दोन सुधारणा सुचविल्या. देशाचें उत्पन्न लोकसंमतीनें खर्च केलें पाहिजे. लोकांना स्वराज्याचें शिक्षण दिलें पाहिजे, व सरकारला लागणाऱ्या सर्व वस्तु देशांतीलच घेतल्या पाहिजेत. राज्यकारभाराला लागणाऱ्या वस्तु काय किंवा माणसें काय हीं देशांतीलच असलीं पाहिजेत.

हिंदुस्थानच्या राज्यकारभारविषयाचे तज्ज्ञ, म्हणून दादाभाईंचा लौकिक आतां सर्वत्र पसरला होता, इतका कीं, सर थॉमस पर्थ यांनीं त्यांना पत्र पाठवून अशी विचारणा केली कीं, "भारतांतील शेती व

उद्योगधंदे वाढविण्यासाठीं, शेती सुधारण्यासाठीं व रेलरस्ते बांधण्यासाठीं ब्रिटिश भांडवल गुंतवावयाचें तें कशा पद्धतीनें गुंतवावें, याबद्दल आपलें मत कळवा."

स. १८८३ सालीं दादाभाईंना जस्टिस ऑफ दि पीस नेमण्यांत आलें. याच सुमारास हिंदी लोकमत प्रकट करण्यासाठीं "व्हॉइस ऑफ इंडिया" नांवाचें पत्र त्यांच्या प्रोत्साहनानें निघालें. त्याला भांडवलहि त्यांनींच पुरविलें. स. १८९० मध्यें 'इंडियन स्पेक्टेटर' या पत्रांत समाविष्ट करण्यांत आलें. हें पत्र श्री. बी. एम्. मलबारी हे चालवीत. त्यांनीं १९१२ पर्यंत तें चालविलें. मलबारींच्या मृत्यूमुळें पुढें तें बंद पडलें.

लॉर्ड रिपनची कारकीर्द एकंदरीनें सुखावह झाली. त्यांची मुदत वाढवावी म्हणून इंग्लंडच्या राणीला अर्ज सादर करण्यासाठीं दादाभाईंच्या प्रयत्नानें एक जाहीर सभा झाली. यानंतर इलबर्ट बिलाला संमति देण्यासाठीं एक मोठी सभा झाली. या बिलाचा हेतु कायद्यापुढें सर्वांना समानतेनें वागविण्यांत यावें एवढाच होता. परंतु युरोपियन लोकांनीं या बिलाविरुद्ध प्रचंड काहूर उठविलें. राणीचा जाहीरनामा धाब्यावर बसविण्यांत आला. व्हाइसरॉयाला शिव्याशापांची लाखोली वाहण्यांत आली व कलकत्त्याला युरोपियन लोकांची सभा भरून रिपनला उचलून बोटींत घालून इंग्लंडला पाठवावा अशीहि भाषा झाली. त्याला उत्तर म्हणून मुंबईची सभा होती. जॉन ब्राईट यांचे अध्यक्षतेखालीं लंडनला सभा भरून इलबर्ट बिलाला पाठिंबा देण्यांत आला व त्यांनीं आपल्या भाषणांत इंग्रज सत्ताधाऱ्यांवर चांगलेच कोरडे ओढले.

पुढें एक वर्षानें लॉर्ड रिपन सेवानिवृत्त झाले. त्यांनीं चांगला कारभार केला याबद्दल मुंबईस जाहीर सभेंत ठरावहि करण्यांत आला व लॉर्ड रिपन यांचें स्मारक करावें असें ठरून निधि जमा करण्याचें काम दादाभाईकडे आलें व त्यांनीं संस्थानिकांकडून चांगलीच मदत मिळविली.

याच काळांत त्यांनीं स्वजातींतील दोर्डी व मोबेड यामधील वाद मिटविला. नगरपालिकेचें कामहि चालूच होतें. "बॉम्बे असोसिएशन व ईस्ट इंडिया असोसिएशनची मुंबई शाखा" या जवळ जवळ मृतवत् झाल्या होत्या. त्यांत नवा जीव घालण्यापेक्षां नवीनच संस्था काढावी असें ठरून "बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन" नांवाची संस्था जानेवारी ३१ स. १८८५ या दिवशीं स्थापन करण्यांत आली. दादाभाईंना उपाध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. "या संस्थेंतून दादाभाईप्रमाणें कार्यकर्ते निर्माण व्हावेत अशी आमची आकांक्षा आहे," असे उद्गार या वेळीं सर फेरोजशाह मेथा यांनीं काढले.

ऑगस्ट १८८५ मध्यें लॉर्ड रे, मुंबईचे गव्हर्नर, यांनीं दादाभाईंना मुंबई कायदे मंडळांत नेमून घेतलें. ही त्यांची निवड लोकमान्य व राजमान्य अशीच होती.

याच सुमारास आयर्लंडच्या होमरूलच्या मुद्द्यावर इंग्लंडमध्यें निवडणुकी घेण्याचें इंग्लंडच्या प्रधानानें ठरविलें. त्या वेळीं आपलेंहि गाऱ्हाणें इंग्लंडच्या चव्हाट्यावर मांडण्यासाठीं एक शिष्टमंडळ इंग्लंड-मध्यें पाठवावें असें मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशननें ठरविलें व जे पार्लमेंटचे प्रतिनिधि भारताला साहाय्य करणारे असतील त्यांना शिष्ट-

मंडळानें पाठिंबा द्यावा असें ठरलें. या शिष्टमंडळांत सर नारायण चंदावर-कर, मनमोहन घोष व रामस्वामी मुदलीयार यांचा समावेश केला होता. असोसिएशननें पाठिंबा दिलेला एकहि उमेदवार निवडून आला नाहीं, तथापि हजारों लोकांच्या कानीं हिंदुस्थानच्या तक्रारी पोहोंच-विण्याचें काम शिष्टमंडळानें बजावलें.

दादाभाईच्या मनांत स्वतःच ब्रि. पार्लमेंटमध्यें निवडणुकीस उभें राहावें अशी कल्पना या वेळीं उत्पन्न झाली असावी. याच सुमारास दोन मोठ्या घटना घडल्या. एक मोठी म्हणजे श्री. ए. ओ. ह्यूम यांच्या प्रेरणेनें कॉंग्रेसची स्थापना व दुसरी "बाम्बे रेटपेअर्स असोसि-एशनची स्थापना." कॉंग्रेसच्या स्थापनेंत दादाभाईचा प्रामुख्यानें भाग होता व सभेंत पास झालेल्या ठरावावर त्यांचा हात फिरला होता हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

• • •

## १७. ब्रिटिश पार्लमेंटांत निवड

ब्रिटिश पार्लमेंट हें ब्रिटिश साम्राज्याचें शक्तिपीठ समजलें जातें तें अगदीं यथार्थत्वानें. खऱ्या लोक-शाहीची आद्य जननी म्हणून ब्रिटिश पार्लमेंटला संबोधण्यांत येते, तेंहि अत्यंत उचित. आपलीं मतें ठासून व निर्भीडपणें मांडण्याचें तें सर्वोच्च व्यासपीठ. तेथें जाऊन आपणांस हिंदी जनतेच्या तक्रारी मांडतां आल्या तर ती संधि आपण कां घेऊ नये, असा विचार दादाभाईच्या मनांत येऊन त्यांनीं इंग्लंडमधील आपल्या हितचिंतकांशीं पत्रव्यवहार सुरू केला व सुदैवानें त्यांनीं उभें राहावें असा आग्रहहि अनेक गृह-

अनुक्र. ८४८
विभाग का भा
क्रमांक २०११

स्थानीं केला. त्यांत त्या वेळचे " टाइम्स ऑफ इंडिया " चे संपादक मार्टिन वुड, यांनीं त्यांना पाठिंबा दिला. या संबंधांत दादाभाईंनीं इंग्लंडमधील अनेक स्नेह्यांना पत्रें लिहून त्यांचीं मतें अजमावलीं. निवडणुकीच्या कामासाठीं इंग्लंडमध्यें जातांना मुंबईकर नागरिकांनीं त्यांना रिपन क्लबमध्यें मोठी मेजवानी दिली; परंतु त्या वेळीं दादाभाईंनीं आपल्या निवडणुकीसंबंधानें एक अवाक्षरहि उच्चारलें नाहीं.

इंग्लंडमध्यें याच वेळीं, बंगालमधील एक पुढारी श्री. लालमोहन घोष यांनीं निवडणुकीस उभें राहावें व तें हॉलबोर्न मतदार संघातर्फे त्यांनीं उभें राहावें असें प्रयत्नहि चालू होते. परंतु लालमोहन यांनीं निवडणुकीस उभे राहण्यास नकार दिला. तेव्हां दादाभाईंच्या इंग्रजी मित्रांनीं दादभाईंचें नांव सुचविलें. सेन्ट आल्बन्स संघामार्फत दादाभाईंनीं उभें राहावें असाहि त्यांना आग्रह करण्यांत आला. तो मतदार संघ टोरी पक्षाचा समजला जाई व तेथें दादाभाईंनीं उभें राहावें म्हणजे टोरी उमेदवाराला चांगला टोला बसेल अशी त्यांच्या चाहत्यांची कल्पना. परंतु त्यापेक्षां हॉलबोर्न मतदारसंघच बरा असें ठरून लिबरल पक्षानें दादाभाईंना आपल्या पक्षातर्फे उभें करण्याचें ठरविलें व दादाभाईंनीं त्याला संमति दिली.

दादाभाई हॉलबोर्न मतदार संघातर्फे उभे राहिले खरे, पण मोठ्या धामधुमीनें, कारण त्या मतदारसंघांत टोरी पक्ष प्रबल होता व तो आयर्लंडला होमरूल देण्याविरुद्ध होता. तथापि लिबरल पक्षानें त्यांना निवड-ल्यानंतर दादाभाईंनीं धडाडीनें प्रचार सुरू केला. दादाभाईंच्या बाजूनें प्रचार करण्यांत अनेक इंग्रज स्त्री–पुरुष होते. परराष्ट्र-खात्याचा दुय्यम मंत्री जेम्स ब्राईस यानें एका सभेंत दादाभाईंना निवडून देण्यांत आपण

योग्य माणसाचा योग्य सत्कार कसा केल्यासारखें होणार आहे, हें मतदारांस नीट समजावून सांगितलें. दादाभाईच्या निवडणुकीच्या भाषणांत ‘ हिंदुस्थान ’ च्या ऐवजीं ‘ आयर्लंड ’ एवढाच फरक असे. कारण दोन्ही देशांची सुखदु:खें एकच असून तीं पार्लमेंटच्या हातीं होतीं. मि. ब्लंट, हॉडग्सन प्रॅट, मार्टिन वुड, रे स्टुवर्ट हेड-लॅम इत्यादि अनेकांनीं दादाभाईना साहाय्य केलें. सर्व मतदारसंघांत सभांचें सत्र सुरू झालें. हिंदुस्थानांतहि वृत्तपत्रें दादाभाईना पाठिंबा देऊं लागलीं. सर विल्यम वेडरबर्न यांनींहि मन:पूर्वक मदत केली.

परंतु इतकें करूनहि यशाची आशा वाटत नव्हती. कारण दादाभाई फार उशिरां उभे राहिले. त्यांना भरपूर वेळ मिळाला नाहीं. अखेर या निवडणुकींत दादाभाईना यश मिळालें नाहीं व त्यांचा विरोधी कर्नल डंकन हा प्रचंड बहुमतानें निवडून आला. परंतु दादाभाई या पराजयानें निराश न होतां पुढील निवडणुकीच्या तयारीला एव्हांपासूनच लागले.

इंग्लंडमध्यें दादाभाईचें अशा प्रकारें काम चालू असतां हिंदुस्था-नांतून मलबारींनीं त्यांना लिहिलें, ‘तुमची आज हिंदुस्थानांतच फार गरज आहे. येथें येऊन कायदेमंडळांत काम करण्यास तुम्हांला खूप वाव आहे, अशा घडामोडी चालू असतांनाच कलकत्ता येथें कॉंग्रेसचें दुसरें अधिवेशन भरण्याचें ठरून दादाभाईना त्याचें अध्यक्षपद स्वीकारण्याबद्दल विनंती करण्यांत आली व त्यासाठीं दादाभाई हिंदु-स्थानांत आले. अध्यक्षपदावरून भाषण करतांना दादाभाईनीं घटना-नुसार चळवळ करावी व सामाजिक सुधारणाकडे कॉंग्रेसनें जास्त लक्ष पुरवावें असें सांगितलें. हिंदुस्थानांत अनेक धर्मांचे व पंथांचे

लोक आहेत. प्रत्येक चालीरीति, आचार भिन्न आहेत. परंतु त्या सर्वांना घेऊन राष्ट्रोद्धार करावयाचा आहे, तेव्हां सर्व जमातींना करतां येतील अशा सुधारणा काँग्रेसनें घडवून आणल्या पाहिजेत, अशी सूचना त्यांनीं केली. याच भाषणांत दादाभाईंनीं ब्रि. पार्लमेंटांत हिंदी लोकांना प्रतिनिधित्व मिळालें पाहिजे असें साग्रह प्रतिपादिलें.

काँग्रेसनें कायदेमंडळाची रचना कशी असली पाहिजे, याबद्दल दादाभाईंच्या सल्ल्यानुसार एक योजनाहि तयार केली. यानंतर काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनांत हिंदी लोकांना कायदेमंडळांत योग्य प्रमाणांत प्रतिनिधित्व मिळावें अशी मागणी सतत चालू ठेविली. दादाभाई काँग्रेससाठीं भारतांत आले तेव्हां मुंबईला पब्लिक सर्व्हिस कमिशनचें काम सुरू होते. त्यापुढें दादाभाईंनीं साक्ष दिली. या साक्षींत इंग्लंड व हिंदुस्थान येथें एकाच वेळीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षा घ्यावी, त्या नोकरांचे पगार, भत्ते, पेन्शन व परीक्षेचे नियम सर्वांना सारखेच असावेत, इत्यादि मागण्या केल्या. इतर अनेक साक्षीदारांनीं दादाभाईंच्या म्हणण्याला दुजोरा दिला. याला विरोध फक्त मुसलमानांनीं केला. त्यांना अशी भीति वाटूं लागली कीं, हिंदुस्थानांत परीक्षा घेतल्या तर बहुसंख्य हिंदु उमेदवारच निवडून येतील !

यानंतर दादाभाई इंग्लंडला परत गेले व पार्लमेंटच्या निवडणुकीच्या कामाला लागले व आपल्या निवडणुकीसाठीं त्यांनीं फिन्सबरी हा मतदार-संघ पसंत केला. येथील सभासद हॉवर्ड स्पेन्सले यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला होता. लिबरल पक्षानें उमेदवारांचीं नांवे मागितलीं व तींत दादाभाईंच्या नांवाला प्राधान्य मिळालें. पक्षानें चार उमेदवारांचीं नांवें सुचविलीं, तींत दादाभाईंना ४९, ईव्ह ४५, फोर्ड २३ व डॉड यांना ७

अशीं मतें पडून पक्षानें दादाभाईंचें नांव कायम केलें. परंतु उमेदवार सिवडण्यासाठीं पुनः सभा घ्या, अशी पक्षांतील कांहीं सभासदांनीं मागणी केली. परंतु तींतहि दादाभाईंचेंच नांव कायम करण्यांत आलें. लिबरलपक्षातर्फे दादाभाईंची निवड झाली तरी ती सहजा सहजी मात्र झाली नाहीं. तींत अनेक नामवन्त आंग्ल स्त्रीपुरुषांनीं आपलें वजन खर्च केलें. त्यांची निवड लिबरल पक्षानें केली तरी विरोधी पक्षहि स्वस्थ बसला नव्हता. टोरी पक्षाच्या वतीनें जोरानें प्रचार सुरू होता. त्यांच्या एका सभेंत लॉर्ड सॅलिसबरी यानें दादाभाईंची "काळा आदमी" Black man म्हणून हेटाळणी केली, तेव्हां लिबरल पक्षानें जास्त जोर धरला. अखेर निवडणूक होऊन दादाभाईंना २९५९ मतें पडून व विरोधी उमेदवार कॅप्टन पेन्टन याला २९५६ मतें पडून अवघ्या तीन मतांनीं दादाभाई निवडून आले.

त्याबरोबर कॅप्टन पेन्टन यानें पुनः मतमोजणी करावी असा अर्ज केला व हा घोळ सतत सहा महिने चालला होता. अखेरीस कॅ. पेन्टननें आपला तक्रार-अर्ज परत घेतला व दादाभाई ब्रिटिश पार्लमेंटांत निवडून आले. या निवडणुकींत दादाभाईंना श्री. सयाजीराव गायकवाड यांनीं फार मदत केली. स्वतःच्या वीस गाड्या निवडणुकीसाठीं दिल्या व कांहीं द्रव्यसाहाय्यहि केलें. दादाभाईंची निवड जाहीर होतांच त्यांजवर अभिनंदनाचा नुसता पाऊस पडला. हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यापासून सर्वांनींच त्यांचें अभिनंदन केलें. लंडन येथें जानेवारी २० स. १८९३ रोजीं प्रचंड सत्कार-सभा झाली. तींत पार्लमेंटचे अनेक सभासद, थोर नागरिक हजर होते. फिन्सबरी मतदारसंघानें एका भारतीय प्रतिनिधीला निवडून भारतावरील आपला विश्वास प्रकट केला, याबद्दल त्याचें अभिनंदन करण्यांत आलें.

• • •

## १८. भारत-हिताचा ध्यास

दादाभाई पार्लमेंटांत शिरले, ते तेथें राहून भारताचें कांहीं हित साधलें तर करावें या प्रमुख हेतूनें! पार्लमेंटांत हिंदुस्थानाबद्दल कळकळ वाटणारे १०।२० सभासदच होते. ते हिंदुस्थानांत नोकरी केलेले. हिंदुस्थानांतून नोकरी करून निवृत्त झालेले कित्येक मुलकी व लष्करी गृहस्थ पार्लमेंटचे सभासद होते. परंतु त्यांना भारताच्या प्रत्येक मागणीमागें राजद्रोहाची शंका येत असल्यानें, हिंदुस्थानविषयक, हिंदी हिताचा कांहीं प्रश्न उत्पन्न झाला कीं त्याला त्यांचा विरोध असे व हे सर्व सभासद हुजूर पक्षाचे होते.

दादाभाईंच्या कामाला मनःपूर्वक साहाय्य करणारे विलियम वेडरबर्न, केन व सॅम्युअल स्मिथ हे होते. केन यानें भारताला अनेक भेटी दिल्या होत्या. तेथील नगरपालिकांचें कामकाजहि पाहिलें होतें व तें काम मँचेस्टर, बर्मिंगहॅम, लिव्हरपूल अगर ग्लासगो येथील नगरपालिकांच्या तोडीचें आहे, असें त्यानें आपलें मतहि प्रसिद्ध केलें होतें. वेडरबर्न व स्मिथ यांनाहि हिंदुस्थानांतील कामकाजाचा अनुभव होता. ब्रॅडलॉ, फॉसेट, प्रो. विलियम हंटर हेहि हिंदुस्थानच्या प्रश्नांत विशेष लक्ष घालीत. परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. यासंबंधांत पार्लमेंटचा एक सभासद स्मिथ, दादाभाईंस लिहितो, " मी काल हिंदी अंदाजपत्रकावर चर्चा सुरू असतांना, हिंदुस्थानच्या विपदावस्थेबद्दल पुष्कळ बोललों, परंतु सभागृह रिकामें व वृत्तपत्रांनीं एक अवाक्षरहि रिपोर्ट दिला नाहीं. "

दादाभाईंच्यापुढें मुख्य तीन प्रश्न उभे होते. ब्रिटिश राष्ट्रानें ज्यांच्या हातीं हिंदुस्थानचा कारभार सोंपविला आहे ते अधिकारी व ब्रिटिश सत्तेखालील हिंदी जनता यांचे संबंध; इंग्रजी सत्ता भारतावर असावी कीं नसावी हा स्वतंत्र प्रश्न होता. मुख्य कटाक्ष होता तो नोकरशाहीच्या कारभाराबद्दल. विशेषतः राज्यपद्धतीबद्दल ब्रिटिशांचें भारताबद्दल धोरण तरी काय ? भारताशीं न्यायानें व समतेनें वागण्याचीं आश्वासनें इंग्रजांनीं वेळोवेळीं दिलीं तीं केवल पोकळच कीं काय ? केवळ हिंदी लोकांची ती फसवणूक करण्यासाठीं आश्वासनें दिलीं होतीं ?

दादाभाईपुढें दुसरा मोठा प्रश्न होता तो हिंदच्या दारिद्र्याबद्दलचा. भारतांत दारिद्र्य दिवसानुदिवस वाढतच चाललें आहे; ग्रांटडफ हा टोरी पक्षाचा पाठीराखा त्यानें भारतांत जणुं रामराज्य चालू आहे अशा वार्ता ब्रिटनमध्यें पसरून दिल्या. दादाभाईंनीं त्याच्या विधानाला वेळोवेळीं साधार उत्तरें देऊन तीं खोडून टाकलीं व त्याचा थोडासा अनुकूल परिणामहि झाला. हिंडमन हा दादाभाईंचा साहाय्यक होता. व तो भारतहितैषी होता. तो म्हणे, " आतां अर्ज-विनंत्यांचा काळ गेला. त्यापेक्षां खळबळ उडेल अशी चळवळ झाली पाहिजे. "

मध्यंतरीं काँग्रेसची स्थापना झाली व तिच्या वतीनें इंग्लंडमध्यें प्रचार करण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली व " इंडिया " नांवाचें पत्रहि सुरू करण्यांत आलें. या सर्व कामांत मुख्य श्रम दादाभाईंचेच होते, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

दादाभाई पार्लमेंटांत निवडून आले तेव्हां त्यांच्यावर दोन गोष्टींची जबाबदारी होती. पहिली गोष्ट भारताचें हितरक्षण करण्याचें व दुसरी

गोष्ट ज्या मतदारसंघांतून ते निवडून आले त्यांचें हित पाहण्याचें. त्यांतच दादाभाईंची आर्थिक स्थिति खालावली. लंडनमधील फर्म बंद करावी लागली. ती त्यांच्या उदारपणानें बंद करावी लागली. एका स्नेह्याला दिलेले पैसे तो देईना. इकडे निवडणुकीमुळें खर्च वाढलेला. शिवाय ते निवडून आले तेव्हां अनेक संस्था त्यांजकडे वर्गणी, देणगी मागण्यास येऊं लागल्या व त्यांना ती मदत द्यावी लागली. त्यांत कॅ. पेन्टननें फेरमोजणीचा अर्ज केला. त्या कामीं खर्च झाला. अशा प्रकारें ते आर्थिक अडचणींत असतांना मलबारी यांनीं त्यांजसाठीं निधि उभारण्याची खटपट चालविली, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. सयाजीराव महाराजांनीं १००० पौंड पाठविले व नंतर इतर कांहीं संस्थानिकांनींहि दादाभाईंना मदत केली असावी असें दिसतें.

दादाभाईंचें पहिलेंच भाषण पार्लमेंटांत झालें, त्यांत त्यांनीं हिंदी माणसाला निवडून दिल्याबद्दल ब्रिटिश जनतेचे आभार मानून भारताच्या हितसंबंधाकडे जास्त लक्ष पुरवा, अशी विनंती केली. परंतु पुढें त्यांनीं सरकारकडून विविध प्रश्नांसंबंधीं माहिती मागविण्याचा सपाटा चालविला. हिंदी शेतीचें उत्पन्न, चलन–पद्धति, सोन्याचें चलन, इत्यादि अनेक प्रश्नांसंबंधीं ते माहिती मागवूं लागले.

पार्लमेंटांत सर सेमुर किंग यांनीं एक ठराव आणला कीं, हिंदी रुपयाची कमी किंमत झाल्याकारणानें हिंदुस्थानांत जे लष्करी व मुलकी अधिकारी नोकरींत आहेत, त्यांचा पगारहि पौंडांमध्यें हिशेब केला असतां आपोआप कमी होतो; तरी त्या प्रकाराची चौकशी करण्यासाठीं एक सिलेक्ट कमिटी नेमावी. दादाभाईंनीं त्यावर उपसूचना सुचविली व तीवर भाषण करतांना त्यांनीं हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें

यथातथ्य चित्र उभें केलें व म्हणाले, आज तुम्ही या प्रश्नाची हेटाळणी करीत आहां, याचें कारण हिंदुस्थानसारख्या परिस्थितींत तुम्ही सांपडला नाहीं म्हणून, ती स्थिति तुम्हांला येऊं नये. तुम्हांला अंतःकरण असेल व जर थोडा न्याय वाटत असेल तर असा विचार करा कीं, व्हाइसरॉयनें हा पैसा आणावयाचा कोठून व कसा ?

दादाभाईंची उपसूचना बारगळली. इंडियन करन्सी कमिटी म्हणून १८९३ मध्यें नेमण्यांत आली. हा सर्व वाद होता तो रुपयाचें लग्न पौंडाशीं लावण्यांत आलें त्यामुळें उत्पन्न झाला आणि अशा रुपयाच्या नाण्यांत हिंदी रयतानें सारा भरावयाचा तो काय म्हणून ? सुवर्णचलन सुरू करण्यांतहि डाव असाच होता कीं, जी थोडीफार चांदी लोकांजवळ असेल ती एकदां बाजारांत आणावयास लावावयाची व मग सोन्याचा भाव एकदम चढवावयाचा. अशा रीतीनें रयताकडून सोनें, चांदी पिळून काढली म्हणजे अगोदरच निःत्राण झालेली रयत जास्त दारिद्र्यकर्दमांत रुतून बसावयाची. ही गोष्ट दादाभाईंनीं अत्यंत स्पष्टपणें जाहीर केली.

याच सुमारास दादाभाईंनीं पार्लमेंटपुढें बिल मांडून अशी सूचना केली कीं, इंग्लंड व हिंदुस्थान या देशांत एकाच वेळीं सिव्हिल सर्व्हिस परीक्षा घेण्यांत यावी. वस्तुतः हा परीक्षेचा प्रश्न भारतमंत्र्यांच्या हातचा होता व दादाभाईहि ही गोष्ट जाणून होते. परंतु निदान त्यावर चर्चा तर होईल एवढ्याच हेतूनें त्यांनीं हें बिल मांडलें. अशाच अर्थाचा ठराव हर्बर्ट पाल यांनींहि मांडला. पालचा ठराव चर्चेस निघाला. त्याला दादाभाई व वेडरबर्न यांनीं पाठिंबा दिला. यावर खूप चर्चा होऊन ठराव मान्य झाला. दादाभाईंचा हा मोठाच

विजय झाला यांत शंका नाहीं. पण ठराव झाला तरी त्याची बजावणी कशी होणार हा मोठा प्रश्न होता. कारण हा ठराव पास होईल अशी पार्लमेंटांत कोणाला कल्पना नसल्यानें पुष्कळ सभासद गैरहजर होते व लॉर्डांना तर हा ठरावच नको होता.

दादाभाईंचें म्हणणें असें होतें कीं सुधारणांचा मूळ पाया नोकऱ्यांचें हिंदीकरण करणें. भारतमंत्री लॉर्ड किंबरले यांनीं हा ठराव भारत सरकारकडे पाठवून दिला. दादाभाई एवढ्यावर स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं इंडियन पार्लमेंटरी कमिटी स्थापन केली व वेडरबर्न यांना त्या कमिटीचे अध्यक्ष व लॉर्ड क्लाइड यांस सेक्रेटरी निवडण्यांत आलें. अँग्लो इंडियन पत्रांनीं समकालीन परीक्षेला विरोध केला व भारतांत परीक्षा घेणें म्हणजे बाबू राज्य होईल व याचे परिणाम बंडापेक्षांहि घातुक होतील असा प्रचार सुरू केला.

दादाभाईनीं इतकें उत्कृष्ट काम चालविलें होतें तेव्हां त्यांचा सत्कार करावा अशी कल्पना निघून लाहोरला भरणाऱ्या कॉंग्रेसचें अध्यक्षपद दादाभाईनीं स्वीकारावें अशी खटपट सुरू झाली. मातृभूमीला जाण्याच्या तयारीला दादाभाई लागले. कांहीं दिवसांपुरती कामाची व्यवस्था लावली. इतक्यांत त्यांच्यावर एक कौटुंबिक आपत्ति कोसळली. त्यांचा एकुलता एक पुत्र आदी हा कच्छ—मांडवींतील आपल्या दवाखान्यांतून परत येत असतां हृदय बंद पडून एकाएकी मरण पावला! त्याच्या मागें त्याची पत्नी व १ वर्षापासून १२ वर्षेपर्यंतचीं सात मुलें होतीं. दादाभाईंवर हा मोठाच आघात झाला. परंतु त्यांनीं आपल्या चित्ताची चलबिचल न होऊं देतां नित्याचे सर्व व्यवहार नेहमींप्रमाणें सुरू ठेवले.

दादाभाईनीं हिंदुस्थानबद्दलच आस्थेनें काम केलें, असें नसून ज्या मतदार-संघांतून ते निवडून आले त्याचीहि सेवा त्यांनीं मन:पूर्वक केली. दादाभाई मातृभूमीला जाणार असें समजतांच त्यांच्या मतदार-संघानेंहि त्यांचा गौरव करणारा ठराव केला. त्यांचा पुत्र गेल्याकारणानें समारंभ मात्र स्थगित केला. दादाभाई फिन्सबरीमधील अनेक संस्थांचे सदस्य होते. त्यांच्या सभांना त्यांना नेहमीं जावें लागे. " बँड ऑफ होप " म्हणून बालकांची एक संस्था होती तींत मात्र दादाभाई खरे रंगत. याशिवाय मजूर संघ, महिला संघ, स्त्री-मतदार संघ, इत्यादि संस्थांचे ते एक आधारस्तंभच समजले जात. शिवाय जाहीर सभांतून भाषणें करण्यासाठीं नेहमीं निमंत्रणें असतच. त्यांत आर्थिक प्रश्नांसंबंधीं अनेकदां भाषणें करावीं लागत.

भारतांत निघण्यापूर्वी, त्यांनीं नियोजित व्हाइसरॉय लॉर्ड एल्जिन यांची भेट घेऊन भारतविषयक अनेक प्रश्न त्यांना समजावून दिले, व १७ नोव्हेंबरला ते भारतांत येण्यासाठीं निघाले.

• • •

## १९. मातृभूमीस पुनरागमन

विजयी वीरास साजेसें प्रचंड प्रमाणांत दादाभाईंचें स्वदेशांत स्वागत करण्यांत आलें. ब्रि. साम्राज्यांतील सर्वोच्च लोकसभेंत ते निवडून आले व लागलीच सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा इंग्लंड व भारत येथें एकाच वेळीं व्हाव्यात हा ठराव पार्लमेंटांत संमत झाला, त्यामुळें सर्व भारतभर त्यांचें मोठ्या उत्साहानें स्वागत झालें. त्यांची बोट मुंबई बंदराला

लागतांच त्यांजवर पुष्पांचा वर्षाव झाला. सर्व रस्ते ध्वजापताकांनीं सुशोभित केले होते. त्यांची गाडींतून मोठ्या थाटांत घरापर्यंत मिरवणूक काढण्यांत आली. मोठमोठे सरकारी अधिकारी, त्यांच्या भेटीस गेले. पुणें, सातारा, बेळगांव, सोलापूर, सुरत, भडोच, नवसरी इत्यादि अनेक ठिकाणांहून शिष्टमंडळें आलीं, व त्यांनीं मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या जागेंत दादाभाईंचा सत्कार केला.

दि. १८ डिसेंबरला मुंबईच्या टौन हॉलमध्यें अनेक संस्थांतर्फें त्यांना मानपत्रें समर्पण करण्यांत आलीं. दि. २० ला वाच्छासह दादाभाई लाहोर कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून लाहोरला रवाना झाले. वाटेंत, बडोदा, अहमदाबाद, अमृतसर येथें त्यांचा सत्कार करण्यांत आला. लाहोरमध्यें तर सर्वत्र उत्साहाचेंच वातावरण पसरलें होतें. लाहोरला कॉंग्रेसच्या स्वागतमंडळानें, मुसलमानांनीं व इतर नागरिकांनीं मानपत्रें दिलीं.

मानपत्रांचा स्वीकार करतांना ते म्हणाले, "तुम्ही, हिंदु, मुसलमान, पारशी कोणीहि असा, पण प्रथम आपण हिंदी आहोंत, हें विसरूं नका. मी मातृदेशीं परत आल्याचा आनंद सर्वांनाच झाला आहे. आपल्या राष्ट्राचें भविष्य फार उज्ज्वल आहे. तुम्हां सर्वांचें मंगल असो."

लाहोरला झालेला त्यांचा सत्कार पाहून विल्यम हंटर यानें 'टाइम्स' मध्यें असे उद्गार काढले. महाराजा रणजितसिंगानंतर इतकी प्रचंड मिरवणूक दादाभाईंचीच निघाली! त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत, सर्वांनीं एकजूट करावी, विरोधी पक्षाच्या हातां-तील खेळणीं बनूं नका, इंग्लंडमध्यें आपल्याला पुष्कळच अनुकूल वाता-

वरण होऊं लागलें आहे, पण त्यासाठीं चळवळ मात्र सारखी सुरू ठेवावी लागेल. धीरानें वागा, निराश होऊं नका, जय आपला आहे. ब्रिटिश पार्लमेंटांत आयर्लंडला 'होमरूल' द्यावें म्हणणारे सर्व सभासद आपल्या हिंदुस्थानच्या पाठीशीं उभे आहेत हें ध्यानीं ठेवा. आपल्या-पुढें काम पुष्कळ आहे. प्रथमतः कायदेमंडळाची सुधारणा झाली पाहिजे. लोकप्रतिनिधि बहुसंख्येनें त्यांत गेले पाहिजेत. परंतु साम्राज्यांतील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचे निर्णय ब्रि. पार्लमेंट घेत असते; तेथें आपलें प्रतिनिधि निवडून जावयास पाहिजेत.

लाहोर अधिवेशन संपल्यानंतर ते मुंबईस, आग्रा, प्रयाग, भुसावळ, खांडवा, जळगांव, मनमाड व नाशिक या मार्गानें परतले, तेव्हांहि वाटेंत त्यांचा सर्वत्र मोठ्या उत्साहानें जयजयकार करण्यांत आला.

दि. १२ जानेवारी १८९४ रोजीं मुंबईच्या महानगरपालिकेनें त्यांना मानपत्र समर्पण केलें व इतरहि अनेक ठिकाणीं त्यांचा सत्कार झाला व ते २२ जानेवारीला इंग्लंडला परत निघाले. एल्फिन्स्टन कॉलेजचे ते पहिले प्राध्यापक. त्या कॉलेजनें मोठ्या प्रमाणांत सत्कार केला व अपोलो बंदरापर्यंत त्यांची गाडी विद्यार्थ्यांनीं ओढीत नेली.

दादाभाईनीं केलेल्या कामगिरीबद्दल भारतानें त्यांचा यथोचित गौरव केला असला तरी त्यांचें अंतःकरण दुःखव्याप्त होतें. त्यांचा एकुलता एक पुत्र आकस्मिकपणें नुकताच निवर्तला होता. त्यांची पत्नी व मुलें यांचें पुढें काय हा प्रश्न त्यांना सतावीत होता. शेवटीं त्यांनीं आपल्या सूनबाईला कच्छ मांडवीला राहण्याबद्दल सुचविलें. तिनेंहि तें मान्य केलें. कच्छच्या महारावांनीं तिला आपल्या मुलाची शिक्षिका म्हणून नेमिली व अशा रीतीनें दादाभाईचें व महारावांचे जुने स्नेहसंबंध पुनः उजळून निघाले.

• • •

## २०. ब्रि. पार्लमेंटांत

दादाभाई इंग्लंडमध्यें पोहोंचतांच फिन्सबरी येथील लिबरल व रॅडिकल पक्षाचे सभासद त्यांच्या स्वागतासाठीं स्टेशनवर आलेले होते. सन १८९३ सालीं सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा भारत व ब्रिटन येथें एकाच वेळीं घ्याव्यात असा आदेश व्हाइसरॉयांकडे पाठविण्यांत आला. तथापि भारतांत अँग्लो-इंडियन पत्रांनीं व गोऱ्या सिव्हिल सर्व्हंटांनीं त्याविरुद्ध इतकें काहूर उठविलें कीं, पार्लमेंटचा तो ठराव कार्यवाहींत मात्र उतरला नाहीं.

हा प्रकार पाहतांच दादाभाईंनीं पार्लमेंटांत ठराव आणून हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची सर्वांगीण चौकशी करण्यासाठीं एक रॉयल कमिशन नेमावें असा ठराव आणला व तो संमत होऊन सदस्यांपैकीं एक म्हणून दादाभाईंची नेमणूक करण्यांत आली. सॅम्युअल स्मिथ यांनीं हा ठराव मांडला व तो मांडतांना त्यांनीं असें स्पष्टीकरण केलें कीं, "हिंदुस्थान हा दरिद्री देश आहे व त्या मानानें राज्यकारभाराचा खर्च त्याला डोईजड आहे. मीं दादाभाईंबरोबर सतत चाळीस वर्षें या विषयाचा अभ्यास केला आहे व हिंदुस्थानांत जाऊन अवश्य तो आंकडयानिशीं पुरावा गोळा केला आहे. मुख्य धोंड लष्करी खर्चाची आहे. तेथील लोकांना स्वत:ची पार्लमेंट नाहीं म्हणून त्यांना इकडे धांव घ्यावी लागत आहे."

या ठरावावर स्कोबल, जॉर्ज चेस्ने, सेमूर के, रिचर्ड टेंपल, वेडरबर्न, फौलर यांनीं स्वत:चे अनुभव सांगून हिंदी लोकांची दुरवस्था कशी झाली आहे व त्याला कारण ब्रिटिश राजवटच कशी

आहे याचें मुद्देसूद विवेचन केलें. दादाभाईनीं ठरावाला पाठिंबा देतांना अनेक उदाहरणें देऊन हिंदुस्थानला न्याय पाहिजे, कृपा नको, हें स्पष्ट केलें.

कमिशन नेमलें जाण्यापूर्वी दादाभाईनीं आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न केला तो म्हणजे इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील खर्चाच्या वांटणीचा. हा प्रश्न कमिशनच्या कक्षेंत येत होताच, पण तो नजरे-आड जाऊं नये या हेतूनें दादाभाईनीं राणीसाहेबांच्या भाषणाला संमति देण्याचा ठराव आला तेव्हां त्याला अशी पुस्ती सुचविली. " हिंदुस्थानांत लष्करी व मुलकी नोकरांवर खर्चाचा फायदा सर्व ब्रिटिश नोकरांना मिळत असल्यानें ब्रिटिश तिजोरीनें तो खर्च सोसावा, विशेषतः हिंदुस्थानच्या सीमेबाहेर होणाऱ्या खर्चाचा बोजा हिंदुस्थानवर पडतां कामा नये. "

ही उपसूचना मांडतांना ते म्हणाले, " आम्ही कांहीं धर्म करा म्हणून हें मागत नाहीं. आम्हांस न्याय पाहिजे. इंग्रजी राज्यापासून हिंदुस्थानचा फायदा झाला हें मान्य करूनहि ब्रिटिश सत्ता तेथें नांदावयाची असेल तर न्यायानें वागलें पाहिजे. युरोपियन नोकरां-पायीं प्रतिवर्षी कोट्यवधि रुपये देशाबाहेर जात आहेत. प्रत्येक गोष्टीचा हक्क प्रथम इंग्रजांना व हा फायदा फक्त गोऱ्या नोकरांनाच मिळतो असें नसून, ब्रिटिश व्यापारी, धंदेवाले, शेतकरी, जहाजवाले, मळेवाले, भांडवलदार इत्यादि सर्वांच्या खिशांत हिंदुस्थानचा पैसा विविधरूपानें जात आहे. प्रत्येक बाबतींत ब्रिटिशांना अग्रहक्क व सर्व फायदाहि त्यांचाच. हिंदी लोक म्हणजे गुलामाप्रमाणें वागविले जात आहेत. श्रम करावेत हिंदी लोकांनी व फायदा उपटावा ब्रिटिशांनीं.

तुम्ही पाशवी शक्तीच्या बळावर साम्राज्य संपादन केलें असेल, पण तें जर न्यायानें व सद्हेतूनें चालविलें नाहीं तर ते टिकणार नाहीं हें ध्यानीं घ्या. युरोपियनांसाठीं होणारा सर्वच खर्च ब्रिटननें सोसावा असें मी म्हणालों तर तें सर्वस्वी न्यायसंमतच ठरेल."

इतके सडेतोड व निस्पृह भाषण दादाभाईच्या कित्येक स्नेह्यांनाहि रुचलें नसलें तरी त्यांनीं केलेली मागणी पूर्ण न्यायसंमत व योग्य असल्यानें त्याला विरोध कोणीं केला नाहीं. तथापि सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं खुलासा करतांना सांगितलें.

"हा प्रश्न साम्राज्य विषयक धोरणाचा आहे व तो सिलेक्ट कमिटीच्या कार्यक्षेत्रांत बसत नाहीं. ही चौकशी कशी करावी त्याची पद्धतहि अद्यापि ठरली नाहीं."

उपसूचना मांडून दादाभाई बसले व त्यांना समाधान एवढेंच वाटलें कीं, या गोष्टीची तळमळ आपणास किती आहे व आपलीं विधानें साधार असल्याची गोष्ट सभासदांना पटलेली आहे.

यानंतर हिंदुस्थानांत जाणाऱ्या कापडावर जकात बसविण्याचें बिल पुढें आलें असतां सर हेन्री जेम्स यांनीं त्याला विरोध केला. त्याबरोबर दादाभाई उठून म्हणाले, "हिंदुस्थान धोक्यांत यावें अशी तुमची इच्छा आहे काय? सर जेम्स यांची सूचना मान्य केल्यानें भारतावर काय परिणाम होईल याचा विचार करा. १८५७ सालचें विस्मरण होऊं देऊं नका. तसें बंड उद्यांच होईल असें नसलें तरी अशा रीतीनें अन्यायाच्या राशी रचूं लागला तर त्यांचें अंतिम पर्यवसान त्यांतच झाल्याखेरीज राहणार नाहीं हें ध्यानीं घ्या."

दादाभाई भारतासंबंधीं कसलाहि प्रश्न निघाला असतां, कशा पोटतिडिकेनें बोलत त्याचे असे अनेक नमुने पार्लमेंटांतील त्यांच्या भाषणांत दिसून येतात.

याच सुमारास रशिया आपलें साम्राज्य आशिया खंडांत पसरूं लागल्याच्या वार्ता पसरूं लागल्या. ब्रिटिश वृत्तपत्रांनीं त्याला मोठेंच महत्त्व दिलें. त्याला उद्देशून दादाभाईनीं " इंडिया " पत्रांत लिहिलें:—

" हिंदुस्थानांत आज जो जुलूम चालला आहे, ज्या पद्धतीनें त्याचें द्रव्य शोषण होत आहे, हिंदी लोकांवर जसा अविश्वास दाखविला जात आहे, या गोष्टी अशाच कायम राहिल्या तर हिंदी लोक हीं माणसेंच असल्याकारणानें रशियाची स्वारी होवो वा न होवो, देशांत असंतोष उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं व भारतांतील असंतोषाच्या मानानें रशियन स्वारी अत्यंत क्षुल्लक म्हणावी लागेल. मी आज कित्येक वर्षे कानीं कपाळीं ओरड करीत आहे तें अरण्यरुदनच ठरलें आहे. हिंदुस्थानला संतुष्ट ठेवलें तर रशियाची भीति बाळगण्याचें कारणच नाहीं. "

हिंदुस्थानांत सुधारणा लवकर न केल्या व त्याला न्याय न मिळाला तर त्याचे परिणाम किती भयंकर होतील ही गोष्ट त्यांनीं " ह्युमॅनिटेरियन " ला मुलाखत देतांना अगदीं निस्संदिग्धपणें प्रकट केली आहे. ही मुलाखत जून १८९५ च्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. तींत ते म्हणतात:—माझ्यासंबंधीं गैरसमज करून घेऊं नका. इंग्लंडनें हिंदुस्थानांत शिक्षणप्रसार केला व इतर कांहीं गोष्टी केल्या त्याबद्दल आजची पिढी कृतज्ञच आहे. परंतु भावी पिढ्यांना मात्र तसें

वाटणार नाहीं. त्यांची चळवळ नव्या काळाप्रमाणेंच सुरू होईल. मागें काय झालें याचा विचार ते करणार नाहींत. त्यांची भूक वाढती असणार व त्यासाठीं ते झगडत राहणार.ते बंडाचा झेंडाहि उभारतील.''

दादाभाईंचे शब्द भविष्यवाणीच कशी ठरली ही गोष्ट आपण जाणतच आहोंत.

कॉमन्स सभेंत दादाभाईंनीं आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उपक्रम सुरू केला. तो अफूच्या व्यापारबंदीचा. या कामीं त्यांना इंग्लंडमधील अनेक लोकांचें सहकार्य लाभलें. अफूचा व्यापार म्हणजे ब्रिटिश सरकारला कलंक लावणारी गोष्ट आहे हें त्यांचें मत त्यांनीं स्पष्टपणें मांडलें. इंग्लंडमध्यें 'इंडिया व चायना लीग,' नांवाची संस्था स्थापन झाली होती. तींत ते सामील झाले. या अफूच्या व्यापाराची थोडक्यांत हकीकत अशी आहे:—

हिंदुस्थानांत कित्येक प्रांतांत अफूची पैदास होते व त्या व्यापाराचे सर्व अधिकार सरकारच्या हातीं असत. सरकार शेतकऱ्यांना अफूचीं झाडें लावण्यासाठीं द्रव्यसाहाय्य देई व ठराविक किंमतीला शेतकऱ्यांकडून ती विकत घेत व नंतर केवळ चीनमध्यें विकण्यासाठीं ती तयार करीत. या अफूचा लिलाव कलकत्ता येथें होई व सरकार नफा खिशांत टाकी. या व्यापाराविरुद्ध फार ओरड सुरू होती. परंतु सरकार आपलें उत्पन्न बुडविण्यास तयार नव्हतें व अफुसेवनापासून शरीरावर कांहीं वाईट परिणाम होतो ही गोष्ट सरकारास मान्य नव्हती. अफूच्या व्यापाराविरुद्ध ख्रिस्ती मिशनऱ्यांनींहि चळवळ चालू केली होती. व स. १८९१ मध्यें पार्लमेंटनें ठराव करून अफूची पैदास करण्यासाठीं मदत करूं नये व कोणास तसे परवानेहि देऊं नयेत, फक्त

औषधी कामासाठींच तिचा उपयोग करावा, ब्रिटिश राज्यांत हिंदी-संस्थानांतून अफू येऊं देऊं नये. अशा रीतीनें अफू प्रकरणीं थोडेसें यश आलें तरी दादाभाईंचें त्यानें समाधान झालें नाहीं. त्याचा मुख्य प्रश्न होता हिंदुस्थानचा. परंतु अफूविरोधी संघानें हिंदुस्थानच्या प्रश्नाबद्दल मुळींच लक्ष दिलें नाहीं. हिंदुस्थानचें जें शोषण चाललें आहे तिकडे त्या संघानें लक्ष द्यावयास पाहिजे, असें दादाभाईंचें प्रथमपासून म्हणणें होतें.

अखेर पार्लमेंटनें अफू प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमलें; परंतु कमिशनच्या अहवालामुळें कोणाचेंच समाधान झालें नाहीं. त्याविरुद्ध मोठी चळवळ झाली व मे २९ स. १८९५ ला पार्लमेंटमध्यें पुनः तो प्रश्न निघाला व सरकारचा त्यांत पराभव होऊन मंत्रिमंडळानें दि. ८ जुलैला राजीनामे दिले व पार्लमेंट बरखास्त झालें. अफूप्रमाणेंच मद्यबंदीहि व्हावी असे दादाभाईंचे प्रयत्न होते व त्या कामीं दादाभाईंना केन व सॅम्युअल स्मिथ यांचा पुरा पाठिंबा होता. या कामीं ग्रेट ब्रिटनमधील नॅशनल टेम्परन्स असोसिएशनचें सहकार्य त्यांनीं मिळविलें व त्या चळवळीची लाट हिंदुस्थानांतहि पसरली. भारतांत शहरांशहरांतून टेम्परन्स संघ स्थापन झाले.

दादाभाईंनीं इंग्लंडमधील मद्याच्या खपासंबंधानें बोलतांना सांगितलें, एकट्या संयुक्त राज्यांत १३ कोटी पौंड किंमतीची दारू खपते. एवढ्या पैशांत लोकांना ब्रेड ७ कोटी पौंडाची; लोणी-साडेतीन कोटींचें, दूध ३ कोटी पौंड किंमतीचें व घराच्या भाड्यासाठीं ७ कोटी पौंड किंमतीचें देतां येईल. दादाभाईंनीं अशा रीतीनें

ब्रिटनचे व भारताचे हितसंबंध अत्यंत दक्षतेनें डोळ्यांत तेल घालून पाहण्याचें काम केलें. परंतु पुढें पार्लमेंटच बरखास्त झाल्यानें त्यांची तेथील जागा गेली व पुन: फिन्सबरी मतदार संघानें त्यांस निवडणुकीस उभें केलें असतां ते निवडून येऊं शकले नाहींत. या निवडणुकींत लिबरल पक्षाचा सर्वत्रच सपशेल पराभव झाला, तसा दादाभाईंचा पराजय झाला. परंतु एस्. एम्. भावनगरी हे मात्र एका मतदार संघातर्फे निवडून आले. ते टोरीपक्षाच्या गोटांतील म्हणून समजले जात व त्यांच्या निवडणुकीनें हिंदुस्थानांत कोणासहि फारसें समाधान वाटलें नाहीं. श्री. उमेशचंद्र बानर्जी हे एक खरे कार्यकर्ते होते, तेहि निवडणुकीस उभे राहिले होते. पण तेहि पडले याबद्दल हिंदी लोकांस फार वाईट वाटलें.

दादाभाई पार्लमेंटांत निवडून आले तेव्हांपासून त्यांना ब्रिटिश सरकारनें एखादी पदवी द्यावी अशी त्यांच्या मित्रमंडळींची फार इच्छा होती. इराणच्या शहानेंहि दादाभाईंना एखाद्या पदवीनें विभूषित करावें अशी इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु दादाभाई असल्या भिधेपणाच्या मोहांत केव्हांच सांपडले नाहींत. त्यांनीं दोन्ही ठिकाणच्या पदव्या आभारपूर्वक नाकारल्या. त्यांचे मित्र वेडरबर्न यांनींहि दादाभाईंनीं 'सर' ही पदवी स्वीकारावी अशी गळ घातली असतां दादाभाईंनी आभारपूर्वक नकार दिला व ही गोष्ट वेडरबर्न यांनीं ना. गोखल्यांना दि. १९ आक्टोबर १९११ रोजीं पाठविलेल्या एका पत्रांत स्पष्टपणें नमूद करून दादाभाईंच्या निःस्वार्थ देशसेवेचें मोठें कौतुक केलें आहे.

● ● ●

## २१. चौकशी कमिशन

हिंदुस्थानांत ब्रिटिश नोकरशाहीनें जो अवाढव्य व अवास्तव खर्च चालविला आहे, त्याची एकदां चौकशी करावी, अशाबद्दल दादाभाईनीं आतांपर्यंत अनेक वेळां प्रयत्न केले. त्यांत त्यांना यश येऊन एकदांची कमिशनची नेमणूक झाली. या कमिशनचे अध्यक्ष लॉर्ड वेल्बी हे होते व केन, वेडरबर्न आणि दादाभाई हे तीन सदस्य होते. चौकशी कमिशनच्या कामाची व्याप्ति किती असावी याविषयीं प्रथमक्षणींच या कमिटींत वाद झाला. दादाभाईचें म्हणणें, एकंदर हिंदी राज्यकारभाराच्या कामाची चौकशी करावी अशी मागणी आपण पार्लमेंटमध्येंच केली आहे. इतर सदस्यांचें म्हणणें इंडिया ऑफिस आणि वॉर ऑफिस, आरमारी खातें यांमधील विवादक प्रश्नांचीच चौकशी करावयाची आहे. यासंबंधांत दादाभाईनीं आपलें साग्र म्हणण्याचें टिपणच लॉर्ड वेल्बी यांना दिलें. पार्लमेंटांत त्यांनीं केलेल्या भाषणांतील सर्व मुद्दे त्यांत तपशीलवारपणें मांडले होते. कमिशनच्या कामाकडे हिंदुस्थानचेंहि लक्ष वेधलें होतेंच व कमिशनपुढें साक्ष देण्यासाठीं कॉंग्रेसतर्फे कोणा जाणत्या माणसास पाठवून देण्याबद्दल त्यांनीं वाच्छास लिहिलें व सुरेंद्रनाथ बानर्जी, वीर राघवाचारियर, पं. मदनमोहन मालवीय, मोतीलाल घोष, प्रभृति अनेक कॉंग्रेस कार्यकर्त्यांना कमिशनपुढें मांडण्यायोग्य पुरावा पाठविण्याबद्दल कळविलें. मुंबई प्रे. असोसिएशन मार्फत श्री. वाच्छा, व पुण्याच्या डेक्कन सभेमार्फत श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांची साक्षी-साठीं निवड झाली.

दादाभाईंनीं स्वतः आपली कैफियत उत्कृष्टपणें मांडिली. कमिशनपुढें अनेक प्रश्न होते. त्यांत हिंदुस्थानाबाहेर जो खर्च होतो तो खर्च हिंदुस्थाननें काय म्हणून सोसावा, हा मुख्य प्रश्न होता. ब्रिटिश साम्राज्यासाठीं होत असलेला खर्च हिंदी तिजोरीवर पडतां कामा नये, असें दादाभाईंचें म्हणणें. ॲबिसीनियन युद्धाचा खर्च हिंदुस्थानच्या डोक्यावर काय म्हणून ? दादाभाईंनीं आपले सर्व मुद्दे विशद करण्यासाठीं एकंदर सात मुद्दयांवर तपशील कमिशनला सादर केला व शेवटीं ते स्वतःच कमिशनपुढें साक्षीदार म्हणून उभे राहिले. तीं झालेलीं सर्व प्रश्नोत्तरें मनोरंजक व दादाभाईंचा स्पष्टवक्तेपणा व्यक्त करणारीं आहेत.

अध्यक्ष विचारतात : तुम्हांला पाहिजे तरी काय ? सर्व इंग्रजी धोरण नाहींसें व्हावें असें का तुम्हांस वाटतें ?

दादा : होय, आज आहे तें धोरण नष्टच झालें पाहिजे.

अध्यक्ष : नोकऱ्यांत प्रमाण काय असावें ?

दादा : प्रमाण असें ठेवलें पाहिजे कीं, लोकांना आपणच राज्य करीत आहों असें वाटलें पाहिजे.

अध्यक्ष : युरोपियन सिव्हिल सर्व्हिस ठेवावी कीं नको ?

दादा : व्हाइसरॉय, गव्हर्नर्स व सेनापति गोरे चालतील.

अध्यक्ष : म्हणजे त्यांच्या हाताखालीं गोरे लोक नसावेत असेंच ना?

दादा: त्यांची आवश्यकताच वाटत नाहीं.

अध्यक्ष : पुढें क्रमाक्रमानें त्यांचेंहि उच्चाटन करणारच !

दादा : आम्ही धीराधीरानें तो मार्ग क्रमूं.

मुख्य प्रश्न असा होता कीं, इंग्रजी सत्ता हिंदुस्थानांत स्थापन झाल्यापासून हिंदुस्थानची एकंदर स्थिति सुधारली कीं नाहीं ? परंतु कमिशनचें कार्यक्षेत्र मर्यादित असल्यानें अनेक महत्त्वाचे प्रश्न हाताळले गेलेच नाहींत. कमिशननें अनेक सूचना केल्या, पण कमिशनच्या कामाचा पुढें कांहीं विशेष उपयोग झाला नाहीं. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा, सिव्हिल मेडिकल सर्व्हिस हीं लष्करापासून तुटक करावी. वगैरे प्रश्नहि उपस्थित झाले. बऱ्याच हिंदी गाऱ्हाण्यांना या निमित्तानें वाचा फुटली. तूर्त एवढ्यावरच समाधान मानलें पाहिजे, अशी दादाभाईंची मनोवृत्ति या निमित्तानें झालेली दिसते.

• • •

## २२. ब्रिटिशांचें लोकशाहीविरुद्ध धोरण :

ब्रिटिश राज्यघटना अत्यंत उत्कृष्ट असून तींत लोकमताला खराखुरा मान दिला जातो. तेथें लोकमताला किंमत आहे व कोणताहि पक्ष सत्तारूढ झाला तरी त्याला लोकमतापुढें वाकावेंच लागतें, अशी दादाभाईंची खात्री झाली होती. म्हणून त्यांचा भारतावरील ब्रिटिश सत्तेला विरोध नव्हता. पण इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें लोकसंमतीनें कारभार चालतो, देशांतील पैसा बाहेर न जाऊं देण्याबद्दल ब्रिटिश लोक जसे दक्ष असतात, त्याप्रमाणें त्यांनीं हिंदुस्थानांतील राज्यकारभार करावा, ही दादाभाईंची भूमिका ठाम होती. सत्ताधारी वर्ग हिंदुस्थानचें सतत शोषण करीत आहे. राणीनें आपल्या जाहीरनाम्यांत दिलेल्या आश्वासनाला नोकरशाही कार्डइतकीहि किंमत देत नाहीं, ही गोष्ट दादाभाईंनीं ओळखून

अनुक्रम
विभाग

ब्रिटिश जनतेलाच जागृत करण्याचें व ब्रिटिश जनतेला हिंदुस्थाना-तील वस्तुस्थिति पटवून देण्याचें काम सतत ४०।४५ वर्षें केलें. वेल्बी कमिशन नेमण्यांत त्यांचा एक प्रकारें जयच झाला. परंतु त्या संबंधांत पार्लमेंटांत विशेष हालचाल दिसेना. वस्तुतः इतका दीर्घकाल उद्योग केल्यानंतर त्यांत अपेक्षेप्रमाणें यश न आलें, तर एखादा मनुष्य निराश व्हावा अशीच परिस्थिति होती. परंतु दादाभाईंच्या कोशांत निराशा हा शब्दच नव्हता. मे २७ स. १८९७ ला त्यांनीं टाटांना लिहिलेल्या पत्रांत ते स्पष्टच म्हणतात : चिकाटीशिवाय यशप्राप्ति नाहीं. चालू आहे यापेक्षांहि जोरानें लढा चालू ठेवला पाहिजे." अशाच आशयाचीं पत्रें त्यांनीं पृथ्वीचंद्रराय, जी. सुब्रह्मण्यम् अय्यर यांना लिहिलीं.

स. १८९६ मध्यें प्लेगचा उद्भव झाला व त्यामागोमाग दुष्काळ भेटीला आला. हिंदुस्थानावर ही सर्व आपत्ति ब्रिटिश राज्यकारभारा-मुळेंच आली, असा दादाभाईंचा ठाम ग्रह झालेला. इंग्रजी लोकमत पुनः ढवळून काढावें यासाठीं त्यांनीं सर्वव्यापी चळवळ आरंभिली. स. १८९७ मध्यें दिनशा वाच्छा व ना. गोखले इंग्लंडमध्यें गेलेच होते. ते दोघेहि दादाभाईंच्या घरींच मुक्कामाला होते. या संधीचा फायदा घेऊन सर्व इंग्लंडभर व्याख्यानांची मोहीम त्यांनीं सुरू केली. हिंदु-स्थानांतील वास्तविक स्थिति तरी काय आहे, ती लोकांस समजून द्यावी हा यांतील मुख्य उद्देश होता. सौथ लॅम्बेथ, सन्दरलॅन्ड, क्रॅपहॅम, एडिन्बरो, हेस्टिंग्ज, लेविशॅम, त्याप्रमाणें यॉर्कशायर, ग्लूस्टर इत्यादि भागांत व्याख्यानांचे कार्यक्रम यशस्वीपणें झाले.

डिसेंबर २८ स. १८९७ ला लंडन इंडियन सोसायटीची एक

मोठी सभा होऊन तींत दादाभाईनीं एक ठराव मांडला. त्यांत इंग्रज राजवट सुरू झाल्यापासून दुष्काळ, प्लेग, यांच्या वार्षिक भेटी, लोकांचें वाढतें दारिद्र्य, सरकारची लोकहिताबद्दलची बेफिकिरी, वृत्त-पत्र-स्वातंत्र्यावर प्रहार, नातू-बंधूंना अटक, देशाचें सारखें होत अस-लेलें द्रव्यशोषण, राणीच्या जाहीरनाम्याची होत असलेली हेटाळणी, या सर्व गोष्टींचा उल्लेख करून वायव्य प्रांतांतील स्वारीचा खर्च ब्रिटि-शांनीं सोसावा, व ती लढाई बंद करून आक्रमक धोरण ( Forward policy ) थांबवावें. इत्यादि सूचना ठरावांत केल्या.

दादाभाईनीं या ठरावावर भाषण करतांना लॉर्ड लिटन, लॉर्ड सॅलिसबरी, यांच्या विधानांचा आधार घेतला होता. हिंदुस्थानांतील राज्यकारभार म्हणजे ढोंगीपणाचा देखावा व जनतेची शुद्ध फसवणूक आहे, असे उद्गार लॉर्ड सॅलिसबरीनेंच काढले होते.

लोकक्षोभाचा उद्रेक शांत होण्याला वृत्तपत्रांचाच उपयोग होतो. परंतु सरकारनें टिळकांसारख्या लोकाग्रणीला व इतर अनेकांना कारागृहीं डांबून टाकलें, म्हणजे इंग्रजांनीं रशियन नीतीचा स्वीकार केला असें म्हणावें लागतें, असें दादाभाईनीं स्पष्टपणें बजावलें.

ही सभा झाल्यानंतर सोशालिस्ट पुढारी हिंडमन यानें दादा-भाईंना पत्र लिहून त्यांचें अभिनंदन केलें व तो पुढें म्हणतो. "आतांपर्यंत हिंदुस्थानबद्दल आपण न्याय मागीत आलां हें ठीक आहे, परंतु असल्या साध्या मागणीला इंग्रज मनुष्य दाद देणार नाहीं. या-पेक्षांहि उग्र स्वरूपाची चळवळ केली तरच तुमची दाद लागेल, एरवीं नाहीं. कारण इंग्रज मनुष्य अन्य कांहीं समजूं शकत नाहीं."

हिंडमननें हिंदुस्थाननें बंडच पुकारावें अशी सूचना केली. अर्थात् दादाभाईंना ती रुचणें शक्य नव्हतें व तसें त्यांनीं मोतीलाल घोष यांना लिहिलेल्या पत्रांत स्पष्टपणें कळविलें कीं, हिंडमन यांची बंडाची कल्पना मला पटत नाहीं, इंग्रजाला हिंदुस्थानची सत्य स्थिति पटाविणें व ती पटली तर आपल्या तक्रारी दूर होतील अशीच माझी श्रद्धा आहे.

स. १८९७ च्या सुमारास अनेक वृत्तपत्रांवर खटले भरले. संपादकांना तुरुंगांत डांबलें. नातूबंधूंना विना चौकशी अडकविण्यांत आलें. या सर्व गोष्टी राजकीय दृष्ट्या घोडचुका आहेत असें त्यांनीं वाच्छा यांना एप्रिल २८ स. १८९८ ला लिहिलेल्या पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे.

इंग्लंडमध्यें दादाभाईचें काम सुरू होतें तरी काँग्रेसच्या कामा-कडेहि त्यांचें लक्ष असे. रावब. मुधोळकर यांना वरचेवर पत्रें पाठ-वून काँग्रेस यशस्वी करा, असें प्रोत्साहन देत होते.

१ नोव्हेंबर १८९८ ला लण्डन इंडियन सोसायटीचें वार्षिक भोजन होतें. त्या वेळीं राणीला शुभेच्छा व्यक्त करतांना दादाभाई म्हणाले : राणीसाहेबांबद्दल आम्हांला आदर आहे. पण त्यांनीं दिलेल्या आश्वासनांच्या सर्वस्वी विरुद्ध वर्तन त्यांचे मंत्री करीत आहेत. ही गोष्ट सांगितल्याशिवाय राहवत नाहीं.

" अन्यायामुळें रावणासारख्यांचाहि नाश होतो, " ही गोष्ट सत्ताधाऱ्यांनीं विसरूं नये, असें दादाभाई कानीं कपाळीं ओरडत असतां तिकडे सर्वस्वी दुर्लक्ष करून दडपशाही सुरू केली. तेव्हां त्यांनीं ब्रिटिश साम्राज्याचें भवितव्य भीषण आहे, व आजच्या

परिस्थितींत त्यांनीं योग्य बदल न केल्यास आपलें थडगें आपल्या हातांनीं खणीत आहेत असा त्यांना अनुभव आल्याखेरीज राहणार नाहीं, असा इषारा दादाभाईनीं त्यांचे स्नेही जॉर्ज फ्रीमन यांना लिहिलेल्या पत्रांत दिला आहे. याच गृहस्थांना ते लिहितात "इंग्रजांची समुद्रसत्ता वाढत आहे असें तुम्ही म्हणतां; परंतु आशिया खंड रेल्वे–रस्त्यानें जोडला गेला म्हणजे या समुद्रसत्तेला महत्त्व काय? युरोपवर त्यांचा दाब राहावा असें वाटत असेल तर त्यांनीं भारताला संतुष्ट, समाधानी ठेवलें पाहिजे व भारत आणि इंग्लंड यांचा प्रेमभाव राहिला तर दोघेजण युरोपला भारी आहेत हेंहि इंग्रजांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे."

• • •

## २३. ब्रिटिश लोकमताला आव्हान

सन १८९८ च्या नोव्हेंबर महिन्यांत दादाभाईनीं पुन: देशव्यापी व्याख्यान-दौरा काढला. या वेळीं लँकेशायरवर मुख्य मोर्चा लावला. कारण हिंदी व्यापार मारण्याला मुख्य कारण लँकेशायरच्या गिरण्या होत. तेव्हां तेथील लोकांना हिंदुस्थानची वस्तुस्थिति समजावून देणें जास्त उपयुक्त, असें त्यांनीं ठरविलें. पहिलें व्याख्यान ईस्ट मँचेस्टर लिबरल असोसिएशनच्या विद्यमानें झालें. त्यानंतर त्यांनीं कॅसलटन, चोर्ले, अॅथरटन, नट्सफोर्ड येथें व्याख्यानें दिलीं. चेंबर्स, रोमेशचंद्र दत्त, विपिनचंद्र पाल असे सुप्रसिद्ध वक्ते या दौऱ्यांत होते. कॉंग्रेसच्या ब्रिटिश कमिटीनेंहि चळवळ सुरू केली. केन यांनीं नॅशनल कॉंग्रेसवर व्याख्यान दिलें.

लँकेशायरमधील व्याख्यानांत दादाभाईनीं तेथील लोकांस बजावलें कीं, ' मी पंचवीस वर्षे या शहरांत व्यापार केला असल्यानें मला येथील लोकस्वभाव पुरा माहीत आहे. हिंदुस्थानची लूटच तुम्हांला करावयाची आहे तर ती दोन प्रकारांनीं करतां येईल. एक प्रत्यक्ष लूटमार करून व दुसरा मार्ग व्यापार करून, असें जॉन ब्राइट नेहमीं म्हणतो. इंग्रज मनुष्य दुसरा मार्ग पसंत करतो. पण तुम्हांला पैसाच कमवावयाचा असेल तर त्याला प्रथम हिंदी लोक संपन्न असावयास पाहिजेत. पण तेथील माणसाचें वार्षिक उत्पन्न आहे फक्त वीस रुपये. अशा लोकांपासून तुम्हांला प्राप्ति काय होणार ? "

दादाभाईच्या या भाषणाचा उत्तम परिणाम झाला व तेथील एक व्यापारी दादाभाईचे आभार मानतांना म्हणाला : "ही गोष्ट आम्हांला माहीत नव्हती. दादाभाईप्रमाणें व्याख्यानें वरचेवर झालीं तर हिंदुस्थानची खरी स्थिति आम्हांला चांगली समजेल. " इतरत्रहि व्याख्यानांच्या शवटीं व्यापाऱ्यांनीं असेच उद्गार काढले.

यानंतर दादाभाईनीं द. आफ्रिकेंत हिंदी लोकांवर होत असलेल्या जुलुमांची कहाणी सांगितली व त्याचा परिणाम म्हणून मँचेस्टर येथें " मँचेस्टर सोसायटी फॉर दि प्रोटेक्शन ऑफ दि नेटिव्ह रेसेस,' नांवाची संस्था स्थापन झाली.

दादाभाईची डिसेंबरमध्यें पुन: लँकेशायरमध्यें व्याख्यानें ठरविण्यांत आलीं. स्ट्रॅटफर्ड, ओल्डहॅम्, फेल्सवर्थ, रोसेनडेल इत्यादि ठिकाणीं व्याख्यानें झालीं. तींतहि दादाभाईनी हिंदी लोकांचें आर्थिक शोषण कसें होत आहे हें निवेदन केलें. इंग्लंडमध्यें अशा अनेक ठिकाणीं सभा झाल्या.

स. १९०० सालीं हिंदुस्थानांत अत्यंत भयंकर स्वरूपाचा दुष्काळ पडला. हिंदुस्थानांत वरचेवर दुष्काळ कां पडतो व सुबत्तेच्या काळांतहि कोट्यवधि लोकांना अर्धपोटी कसें राहावें लागतें यासंबंधीं व्याख्यानें दिलीं. दुष्काळ-मदतीसाठीं सभा घेण्यांत आल्या. एका सभेंत ते असें स्पष्टच म्हणाले : " अशा अनंत आपत्ति येत असूनहि हिंदुस्थान निष्ठेनें वागत आहे. पण राजकीय स्थिति न बदलली तर ही परिस्थिति बदलल्याखेरीज राहणार नाहीं. " हिंदुस्थानाबद्दल पूर्ण सहानुभूति असणारा पण दादाभाईंचे मवाळ प्रयत्न पाहून चिडणारा एक इंग्रज होता हिंडमन म्हणून. तो दादाभाईंना नेहमीं म्हणे व पत्रें लिही कीं, आतां हें आळवण्याचे मार्ग सोडून अन्यमार्ग स्वीकारा तरच इंग्रजांचें लक्ष तुमच्याकडे वेधेल, एरवीं नाहीं. परंतु दादाभाईंचा इंग्रजजनतेच्या सद्बुद्धीवर विश्वास असल्यानें त्यांनीं आपला क्रम सुरूच ठेवला, पण हिंडमनला तोडून मात्र काढला नाहीं.

दादाभाईंना आतां वाटूं लागलें कीं, हिंदी राजकारणाची धुरा तरुणांनीं स्वीकारावी. दादाभाईंचे अनुयायी मेथा, वाच्छा, बानर्जी यांना तरुणांत होत असलेल्या जागृतीचें भय वाटू लागलें होतें, व हा तरुण वर्ग जहाल मार्गाकडे झुकू लागला आहे, असा त्यांचा आक्षेप होता. यासंबंधांत दादाभाई रोमेशचंद्र दत्तांना लिहितात. " ॲंग्लो-इंडियन पत्रें हिंदी तरुणांबद्दल लिहितात ते हेतुपूर्वक लिहि-तात. पण आपणांस काम करावयाचें तर तरुणांना हातीं घेऊनच केलें पाहिजे. जगांत ज्या महत्त्वाच्या उलाढाली झाल्या त्या तरुणांच्या उत्साहामुळेंच झाल्या आहेत व पुढेंहि होतील. भविष्यकाळ तरुणांचा

आहे. आमचे दिवस संपत आले, कार्यकर्त्यांची नवी भरती झालीच पाहिजे. तरुण म्हणून त्यांना तुच्छ लेखूं नका. आपण त्यांना योग्य मार्गदर्शन करूं. ''

दादाभाईंचें म्हणणें असें कीं,हिंदुस्थानांत तर चळवळ जोरानें सुरू झालीच पाहिजे, पण त्याज बरोबर इंग्लंडमध्यें ती करावयास पाहिजे. हिंदुस्थानवर आपण अन्याय करीत आहों याची जाणीव इंग्रज लोक व वृत्तपत्रांना होऊं लागली आहे. आशियांत जागृति होऊं लागली आहे. आपल्या मुक्ततेचा क्षण फार दूर नाहीं. जरा दमानें घ्या. निराश होऊं नका. लाहोरला १९०० सालीं कॉंग्रेस झाली. तिला उद्देशून वेडरबर्न, ह्यूम व दादाभाई यांनीं एक जाहीर पत्रक प्रसिद्ध केलें. त्यांत ते म्हणतात: " कॉंग्रेसचें काम गेलीं पंधरा वर्षें आम्हीं शक्तिबुद्धीप्रमाणें केलें. आतां यापुढें तरुणांनीं पुढें येऊन तो भार उचलला पाहिजे. ''

इंग्लंडमध्यें दादाभाईंनीं आपलें कार्य चालू ठेवलें होतें. केनिंग्टन येथें सेन्टजॉन लिटररी व डिबेटिंग सोसायटींत त्यांनीं " हिंदुस्थानांतील दुष्काळ = कारणें व उपाय '' या विषयावर व्याख्यान दिलें. स्टोक न्यूइंग्टन येथील भाषणांत त्यांनीं असें सांगितलें कीं : " हिंदी लोकांस गुलामाप्रमाणें वागविल्यास त्याचा स्फोट झाल्याशिवाय राहणार नाहीं. इंग्रज प्रजाजनाप्रमाणें त्यांना वागणूक मिळावी इतकेंच माझें सांगणें आहे. ''

१ जानेवारी स. १९०१ रोजीं आस्ट्रेलियन कॉमनवेल्थची संस्थापना झाली. तत्क्षणीं दादाभाईंच्या डोक्यांत विचार उत्पन्न झाला कीं, आस्ट्रेलियासारखी ४०।५० लक्ष वस्तीची छोटी वसाहत

इतक्या अल्पावधींत आपली प्रगति करून घेते आणि भारतासारखा संपन्न देश दिवसानुदिवस रसातळाला जात आहे, यांतील रहस्य काय ? संयुक्त संस्थानांनीं स्वातंत्र्य संपादन केलें म्हणून त्याचा उत्कर्ष होत आहे. वसाहतीप्रमाणें हिंदुस्थानाला वागणूक मिळत नाहीं, हाच याचा उघड अर्थ आहे आणि याच विषयावर त्यांनीं व्याख्यान देऊन अंतःकरण खुलें केलें व ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनीं आपलें वर्तन सुधारावें अशी सूचना केली.

टॉयन बी हॉलमध्यें "हिंदुस्थानांतील परिस्थिति " या विषयावरहि त्यांनीं व्याख्यान देऊन त्यांची अशी दुःस्थिति कां झाली याची आंकडेवार माहिती दिली. नॉर्थ कॅम्बरवेल येथील भाषणांत ते म्हणाले : " तुम्हां मतदारांच्या हातीं देशाची खरी सत्ता आहे. हिंदुस्थानांतील दुष्काळांत लक्षावधि लोक कां मरत आहेत हें पाहणें तुमचें काम आहे. हिंदुस्थानांत साम्राज्य-स्थापनेसाठीं तुम्हीं एक पै खर्च केला नाहीं अगर रक्ताचा एक बिंदु सांडला नाहीं, अशी स्थिति असतां तुम्ही आमचें सारखें शोषण चालविलें आहे. पण तो पैसा तरी तुमच्या खिशांत न पडतां भांडवलवाले मात्र गबर होत आहेत. ब्रिटनचा असा दावा आहे कीं, तो कधींहि कोणाचा गुलाम होणार नाहीं. दुसऱ्यांना गुलाम करणें इतकाच त्याचा अर्थ आहे कीं काय ? तुम्ही पार्लमेंटामधील आपल्या प्रतिनिधींनी न्याय मिळेल असे प्रयत्न केले पाहिजेत. " या सभेंत असा ठराव करण्यांत आला कीं, " हिंदुस्थानांत सध्यां चालत असलेला कारभार स. १८३३ च्या कायद्याच्या अगदीं विरुद्ध असून सरकार विश्वासघातकीपणानें वागत असल्यानेंच हिंदुस्थानवर आपत्ति कोसळत आहेत. "

दादाभाईंनीं सर्वत्र व्याख्यानांचा धुमधडाका चालविला होता व सर्वत्र इंग्रजांच्या कुटिल नीतीनें हिंदुस्थानचें आर्थिक शोषण कसें होत आहे, दुष्काळासारख्या आपत्तींत लक्षावधि लोक प्राणांस मुकत आहेत, तरीहि इंग्रज राज्यकर्त्यांचा हव्यास बंद पडत नाहीं, हें सोपपात्तिक रीतीनें सांगत. ब्रिक्स्टन येथें 'हिंदुस्थान व लष्करी सत्ता' या विषयावर भाषण झाल्यावर कर्नल हाना नांवाच्या हिंदुस्थानांत लष्करांत काम केलेल्या अधिकाऱ्यानें, इंग्रजांच्या आक्रमक धोरणानें (Forward policy) १८७८ ते १८९६ पर्यंत ७ अब्ज १४ कोटी, दहा लक्ष रुपयांचा भूर्दंड हिंदुस्थानच्या माथीं कसा बसला व त्या पायीं हिंदी सैनिक अर्धपोटी राहिले, व लक्षावधि दुष्काळांत कसें मरण पावले हें सांगितलें. कॉंग्रेसची ब्रिटिश कमिटी व लंडन इंडियन सोसायटीच्या विद्यमानें एक मोठी सभा होऊन हिंदुस्थानच्या खर्चानें द० आफ्रिकेंत ब्रिटिश सैन्य ठेवण्यांत आलें, या गोष्टीचा निषेध करण्यांत आला. या ठरावाला लॉर्ड वेल्बी यांनी पाठिंबा दिला. व इंग्रजांचें लष्करी धोरण हिंदुस्थानला मारक कसें आहे व हिंदुस्थानचा पैसा वसाहतींतील ब्रिटिश लष्करावर कसा खर्च होत आहे हें सांगून ते म्हणाले, ही गोष्ट अभूतपूर्व, अन्याय्य व असंमजसपणाची आहे.

याच काळांत न्यायमूर्ति रानडे यांचे हस्तें मुंबईस दादाभाईंच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ झाला. न्या. रानडे हे आपणांस दादाभाईंचें शिष्य म्हणवीत. हें तैलचित्र अनावरण केल्यानंतर थोड्याच दिवसांत न्या. रानडे दिवंगत झाले.

• • •

## २४. स्वराज्याशिवाय अन्य मार्ग नाहीं·

दादाभाई हे इंग्रजांचे द्वेष्टे नव्हते, इंग्रजांची राजवट सुरू झाल्यापासून हिंदुस्थानचे अनेक फायदे झाले होते, ही गोष्टहि त्यांनीं अनेकदां मुक्त कंठानें मान्य केलेली आहे. इंग्रजांची राज्यपद्धति सर्व मान्य होण्याजोगी आहे, अनुकरणीय आहे अशी त्यांची श्रद्धा होती व त्याच पद्धतीनें त्यांनीं हिंदुस्थानचा राज्यकारभार करावा अशाबद्दल त्यांनीं अट्टाहास केला. त्यांनीं इंग्लंडमध्यें लेख, व्याख्यानें इत्यादिकांचा जो प्रचंड उद्योग केला, त्यांतहि विशिष्ट अर्थ आहे. इंग्रजी राज्यघटनेंत मतदारांच्या हातींच सर्व सत्ता केंद्रित झाली असल्यानें मतदारांच्या निर्णयानुसार राज्यकारभार चालतो ही गोष्ट त्यांनीं स्वानुभवानें पाहिली. तेव्हां तो मतदार-संघच जर आपल्याला अनुकूल करून घेतां आला तर आपलें कार्य सुलभपणें तडीस जाईल ही त्यांची भावना असल्यानें त्यांनीं इंग्लंडमध्यें प्रचंड खटाटोप केला. परंतु त्यांना अनुभव असा आला कीं, इंग्रज माणसाला हिंदुस्थानाबद्दल विशेष माहितीच नाहीं व ज्यांना तशी माहिती होती ते लोक स्वार्थ-पीडित, भांडवलवाल्यांचे हस्तक असल्यानें त्यांजकडून कार्य भाग होणेंहि कठीण. जे थोडेबहुत इंग्रज त्यांच्या मताशीं सहमत होते ते आपल्या परीनें खटपट करीत होते पण सर्व राज्ययंत्र अनुकूल करून घेण्याइतके ते बलसंपन्न नव्हते, परंतु अशी स्थिति असूनाहि त्यांनीं आशा सोडली नाहीं. चळवळ करा चळवळ करा, आणि चळवळ करा, त्या चळवळींतूनच मार्ग निघाल्याशिवाय राहणार नाहीं, अशी त्यांची खात्री होती.

अशा विपरीत अवस्थेंत ते चिकाटीनें काम करीत असतां स. १९०४ च्या आरंभीं त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनीं जखमेवर मीठ चोळावें त्याप्रमाणें कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान-प्रसंगीं भाषण केलें व त्यांत हिंदी लोकांची अत्यंत अवहेलना होईल असें भाषण केलें. लोकमत अगोदरच क्षुब्ध झालें होतें त्यांत या भाषणानें तेल ओतण्याचें काम केलें. मुंबई, मद्रास, कलकत्ता, लाहोर, प्रयाग व इतर ठिकाणीं जाहीर सभांतून त्यांच्या भाषणाचा निषेध करण्यांत आला. दादाभाईनीं अर्थात् आपल्या देशबांधवांना पाठिंबा दिला व आतां सर्व देशच सरकारविरुद्ध उलटला ही गोष्ट त्यांना एकंदरीनें बरीच वाटली. कर्झनला परत बोलवा, असा ओरडा हिंदी लोकांनीं केला. दादाभाईनीं हिंदी लोकांना इतकेंच सांगितलें कीं, ब्रिटिश अधिकारी अशा प्रकारें उद्दामपणें बोलूं शकतो, तो का याचें कारण शोधून तें राज्ययंत्रच आमूलाग्र बदलून घेतल्याशिवाय असे अन्याय दूर होणार नाहींत. याला मार्ग दोनच : एक शांततामय क्रांति व दुसरा मार्ग बण्डाचा.

दादाभाईनीं तेथील एका भाषणांत इंग्रजी सत्ता बद्धमूल व्हावी असे प्रयत्न लॉर्ड हार्टिंग्टन प्रभृतींचें कसे चालले आहेत हें अनेक उदाहरणें देऊन सांगितलें. लंडन इंडिया सोसायटींत भाषण करतांना त्यांनीं श्रोत्यांना प्रश्न टाकला कीं हिंदी लोक कायमचे गुलाम राहावेत अशी तुमची अपेक्षा आहे कीं काय व या प्रश्नाचें उत्तरहि त्यांनींच दिलें. ते म्हणाले, ‘ आजचें अपमानास्पद जिणें नष्ट होण्याला एकच उपाय आहे व तो म्हणजे ब्रिटिश साम्राज्यान्तर्गत स्वराज्य मिळविणें, ह्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

यानंतर दादाभाई ॲमस्टरडॅम येथें भरलेल्या जागतिक समाजसत्तावाद्यांच्या परिषदेला गेले. युरोपमध्यें मजुरांची चळवळ जोरांत सुरू झाली होती. तेव्हां त्या वाढत्या पक्षाचें पाठबळ मिळवावें हा त्यांचा हेतु होता. ही परिषद १४ ऑगस्ट ते २० ऑगस्ट १९०४ पर्यंत चालली होती. ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत चालविलेल्या राज्यपद्धतीचा परिषदेनें निषेध केला. परिषदेचे अध्यक्ष व्हॅान कोल यांनीं श्रोत्यांना दादाभाईंची ओळख करून दिली. तेव्हां सभागृहानें त्यांचा अपूर्व सत्कार केला. परिषदेंत दादाभाईंनीं हिंदुस्थानच्या परिस्थितीवर उत्कृष्ट भाषण केलें. त्यांचें भाषांतर फ्रेंच व जर्मन भाषांत सांगण्यांत आलें, तें ऐकतांच सुमारें एक हजार प्रतिनिधींनीं दादाभाईंचा मोठ्या उत्साहानें गौरव केला. इंग्रज राजवटीच्या निषेधाचा ठरावहि परिषदेनें केला.

या प्रसंगावरून असें निश्चित दिसून येतें कीं दादाभाई हळूहळू जहाल मतप्रणालीकडे झुकूं लागले होते. दादाभाईंनीं इंग्लंडमधील जनतेचें मन वळविण्याचें काम सुरूच ठेवले होतें. हिंदुस्थानांतील कॉंग्रेसच्या विसाव्या अधिवेशनास त्यांनीं यावें अशी विनंती त्यांना करण्यांत आली. परंतु त्यांनीं आपल्या ऐवजीं सर हेनरी कॉटन व वेडरबर्न यांना पाठवून दिलें व स्वतः सेन्ट आल्बन्स येथें "हिंदुस्थानांतील स्वराज्य गतकालीन व भावी" या विषयावर भाषण केलें.

लॉर्ड कर्झननें बंगालची फाळणी केल्यामुळें तो अत्यंत अप्रिय झाला होता. त्या वेळीं त्यांनीं केलेलें भाषण अत्यंत कडक झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत इंग्रजी सत्ता सुरू झाल्यापासून कर्झनशाहीपर्यंत हिंदुस्थानांत इंग्रज सत्ताधाऱ्यांनीं कसा धिंगाणा घातला याचा

साद्यंत इतिहास सांगून, " अशा रीतीनें राज्यकर्ते, व जनता ह्यांमध्यें लढा सुरू झाल्यास त्याचा परिणाम काय होणार "? असा प्रश्न सभेपुढें टाकला. इंग्रजांची राजवट किती अन्यायमूलक आहे याचे अनेक दाखले त्यांनीं जॉन माल्कम, विल्यम हंटर इत्यादि प्रतिष्ठित इंग्रजच काय म्हणतात त्यांच्या उताऱ्यांतूनच दिले.

बंगालमध्यें असंतोष धुमसत होताच. तो विझवूं नका, अशीच चळवळ चालू ठेवा, असा आदेश त्यांनीं बंगाली मित्रांना दिला, व हिंदी लोकांनाहि स्वाभिमान आहे ही गोष्ट पटवून द्या; असेंहि त्यांना कळविलें.

संयुक्त राज्यांतील हिंदी लोकांनीं दादाभाई व गोखले यांना मोठी थाटाची मेजवानी दिली, त्या प्रसंगी बोलतांना त्यांनीं उद्गार काढले, " साम्राज्यांतील वसाहतींची सारखीं भरभराट होत आहे, व हिंदुस्थान मात्र दिवसानुदिवस दरिद्री होत आहे, याचें कारण वसाहती स्वराज्योपयोगी आहेत व भारताला स्वराज्य नाहीं. मी ५२ वर्षें येथें खूप चळवळ केली, ती वायां गेली असें मात्र मला वाटत नाहीं. आज ना उद्यां भारताला स्वराज्य मिळालेंच पाहिजे. सर हेन्री कॅम्बेल बॅनरमन व लॉर्ड रॉसबरींसारख्या उदारमतवादी गृहस्थांनीं असें स्पष्टच सांगितलें आहे कीं, ब्रिटिश साम्राज्याचें ध्येयच स्वातंत्र्य हें आहे. त्यावर माझा विश्वास आहे. "

• • •

## २५. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोक :

दक्षिण आफ्रिकेंत युरोपियन लोकांनीं वसाहत केली परंतु त्या वसाहतीला सौंदर्यसंपन्न करण्यासाठीं लागणारा कामगारवर्ग त्यांजपाशीं नव्हता. तेव्हां वसाहतवाल्यांनीं हिंदुस्थानसरकाराशीं कट करून हिंदुस्थानांत मुदतबंदीनें मजूर नेण्याचा करार केला व त्याप्रमाणें नोव्हेंबर १६ स. १८६० मध्यें कलकत्ता व मद्रास बंदरांतून हजारों हिंदी मजूर द० आफ्रिकेंत नेण्यांत आले. हिंदी मजुराबरोबर कांहीं धंदेवाले लोकहि तेथें गेले. हें मजूर नाताळ, ट्रान्सवाल, ऑरेंज फ्री स्टेट व केप कॉलनी या भागांत गेले. यापैकीं बरेच मजूर त्यांचा करार संपल्यानंतर तेथेंच शेतकरी म्हणून स्थाईक झाले. असा कांहीं प्रकार होईल अशी वसाहतवाल्यांना कल्पना नव्हती. परंतु हिंदी मजूर स्थाईक झाले व अल्प प्रमाणांत कां होईना त्यांची व्यापारांत चढाओढ सुरू झाली ही गोष्ट गोऱ्या लोकांना पटेना व अशा रीतीनें हिंदुस्थानांतून प्रतिवर्षीं हजारों हिंदी लोक तेथें जाऊं लागले तर आपणांस उभे राहण्यासहि जागा मिळणार नाहीं, अशीं भीति वसाहतवाल्यांस वाटूं लागून, "आशियांतील लोकांना हाकून द्या," अशी हाकाटी त्यांनीं सुरू केली.

करार संपताच मजुरांना त्यांच्या देशांत परत पाठवून द्यावें, त्यांच्यावर जबरदस्त कर लादावेत, अशा सूचना पुढें येऊं लागल्या. हिंदुस्थान सरकारनें तिकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. नाताळ ही ब्रिटिश कॉलनी असल्यानें तेथें फारसा उपद्रव झाला नाहीं. परंतु ट्रान्सवाल हें स्वतंत्र लोकसत्ताक असल्यानें तेथें कोणाचें चालेना. प्रे. क्रूगर याला भेटण्यास कांहीं प्रमुख हिंदी लोक गेले असतां त्यानें

त्यांना अंगणांतच उभें करून ठेवलें. वस्तुत: बोअर व ब्रिटिश यांमध्यें सर्व जमातींना सारख्या दर्जानें वागवावें असा करार 'लंडन कन्व्हेन्शन' म्हणून झाला असतां तो धाब्यावर बसवून हिंदी लोकांवर प्रतिवर्षी २५ पौंड डोईपट्टी आकारण्यांत आली. त्यांनीं जमीन धारण करतां कामा नये, घरेंदारें करतां कामा नयेत, असे निर्बंध घालण्यांत आले. ही डोईपट्टी पुढें तीन पौंड करण्यांत आली, परंतु इतर त्रास कायमच राहिला. या लोकांनीं शहराबाहेरच राहिलें पाहिजे असा ठराव झाला व त्या वस्तींतहि पाणी व इतर कसलीहि सोय करण्यांत आली नाहीं.

त्रान्सवालपेक्षांहि ऑरेंज फ्री स्टेटमधील भारतीयांची फार शोचनीय अवस्था होती. त्यांना व्यापारधंदा करण्याला अगर शेती करण्याला प्रतिबंध करण्यांत आला. अशीच स्थिति कमी अधिक प्रमाणांत केप-कॉलनींत होती. तेव्हां याविरुद्ध चळवळ करण्यासाठीं तेथील लोकांनीं श्री. अली यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति नेमून इंग्लंडचे मुख्य प्रधान ग्लॅड्स्टन व दादाभाई यांना तारा करून सर्व स्थिति कळविली. दादाभाईंनीं लागलीच वसाहतमंत्री लॉर्ड रिपन यांजकडे तक्रार केली व १०३४१ सह्यांचा एक अर्ज त्यांजकडे पाठविला. दादाभाई ब्रॅडलॉ यांसाहि भेटले. त्रान्सवालमधील व्यापाऱ्यांनींहि दादाभाईकडे गाऱ्हाणें नेलें. लॉर्ड रिपनहि कांहीं तडजोड करण्याच्या उद्योगाला लागले. त्यांनीं नाताळ व त्रान्सवाल सरकारकडे पत्रव्यवहार चालविला.

याच सुमारास म्हणजे स. १८९३ च्या एप्रिलमध्यें म. गांधी वकिलीच्या धंद्यानिमित्त द. आफ्रिकेंत गेले असतांना तेथें प्रवासांत

हिंदी लोकांना कसा अपमान सोसावा लागतो याचा त्यांना प्रत्यक्ष अनुभवच आला व त्याच सुमारास त्या सरकारनें हिंदी लोकांचा मतदानाचा हक्क काढून घेणारा कायदा करण्याचें ठरविल्याचें समजतांच गांधीनीं आपला मुक्काम वाढवून या अन्यायाचा प्रतिकार करण्याचें ठरविलें. तेथें 'नाताळ इंडियन काँग्रेस' ची स्थापना केली व वेडरबर्न व दादाभाई यांजशीं पत्रव्यवहार सुरू केला.

इतर लोकांनीं, व्यापाऱ्यांनींहि दादाभाईशीं पत्रव्यवहार सुरू केला. या अन्यायाची दाद लावून घेण्यासाठीं दादाभाईनीं श्री. चेंबरलेन यांजकडे एक शिष्टमंडळ नेऊन द. आफ्रिकेंत हिंदी लोकांवर होत असलेल्या अन्यायाची दाद लावा अशी मागणी केली. याप्रमाणें सतत दोन वर्षें द. आफ्रिकन प्रश्नाबद्दल ते झगडले. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. इकडे गांधीहि हिंदुस्थानांत परतले व त्यांनीं द. आफ्रिकेंत हिंदी लोकांची काय दुरवस्था होत आहे याबद्दल भारतांत मुंबई, पुणें, मद्रास, कलकत्ता इत्यादि अनेक ठिकाणीं व्याख्यानें देऊन हिंदी लोकांचीं करुण कहाणी निवेदली. परंतु द. आफ्रिकन सरकारच्या धोरणांत काडीइतकाहि फरक पडला नाहीं. त्यांनीं नित्य नवे जुलमी कायदे करून हिंदी लोकांची गळचेपी चालविलीच. द. आफ्रिकन सरकारनें आपलें धोरण बेदरकारपणें चालूच ठेवलें होतें. ट्रान्सवाल सरकारनें एक नवा कायदा करून प्रत्येक हिंदी स्त्री-पुरुषानें व आठ वर्षांवरील मुलानें आपलें नांव रजिस्टरकडे नोंदवून दाखला घेतला पाहिजे व रजिस्टर प्रत्येक माणसाच्या शरीरावरील विशेष खुणा टिपून घेईल.त्या दाखल्यावर अर्जदारानें आपला अंगठा उमटविला पाहिजे. हा कायदा मोडणारास तुरुंगवास व हद्दपारी या शिक्षा देण्यांत येतील असेंहि जाहीर केलें.

हिंदी लोकांना गुन्हेगाराप्रमाणें वागविण्याचा हा कायदा मानावयाचा नाहीं असें त्रान्सवाल येथें हिंदी लोकांनीं ठरविलें व इंग्लंडला म. गांधी व अली यांचें शिष्टमंडळ पाठविण्यांत आलें. त्यांनीं दादाभाईंची भेट घेऊन सर्व परिस्थिति निवेदन केली.

त्रान्सवाल लोकसभेनें एका बैठकींतच ठराव पास करून घेतला व म. गांधींना पूर्वयोजित सत्याग्रहाची चळवळ करणें भाग पडलें. दादाभाईंनीं हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें लोकमत जागृत करण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले. पुढें दादाभाई वरसोवा येथें विश्रांतीसाठीं राहण्यास आल्यावरहि त्रान्सवालच्या हिंदी लोकांनीं त्यांना आपल्या कामांत लक्ष घालण्याबद्दल विनंती केली. त्याप्रमाणें मुंबईस एक मोठी सभाहि झाली. दादाभाई मात्र प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें सभेस जाऊं शकले नाहींत.

इकडे सत्याग्रह सुरू झाला व १९१४ मध्यें सत्याग्रहाचा विजय झाला. द. आफ्रिकन सरकार नरमलें. दादाभाईंना याबद्दल पराकाष्ठेचा आनंद झाला.

• • •

## २६. कलकत्ता कॉंग्रेस व स्वराज्याची घोषणा

**दादाभाईंनीं** पुनः पार्लमेंटच्या निवडणुकीसाठीं उभें राहण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें नॉर्थ लॅम्बेथ मतदार संघातर्फे ते उमेदवार म्हणून उभेहि राहिले. या वेळीं त्यांचें वय ८२ वर्षांचें होतें. तरी निवडणुकीचा प्रचार त्यांनीं नेटानें केला. बहुधा प्रत्येक मतदाराला भेटण्याचें त्यांनीं टाळलें नाहीं.

परंतु अखेरीस निवडणुकीत त्यांना यश मिळालें नाहीं. तरी त्यामुळें निराश न होतां त्यांनीं देशसेवा अखंड चालविलीच होती. पार्लमेंट-मध्यें जाण्याचा त्यांचा हेतु तरी हिंदुस्थानकडे पार्लमेंटचें लक्ष वेधून घेऊन कांहीं सुधारणा घडवून आणणें हाच होता.

याच सुमारास कॉंग्रेसचे बाविसावें अधिवेशन कलकत्ता येथें भरविण्याचें ठरलें. कॉंग्रेसमध्यें नवा तरुणांचा पक्ष निर्माण झाला होता व त्या पक्षाला कॉंग्रेसचें अर्जविनंत्यांचें धोरण मुळींच पसंत नव्हतें व जुनें कॉंग्रेस कार्यकर्ते तर आपलें धोरण सोडण्यास तयार होईनात. नवीन पक्षाला कांहींतरी परिणामकारक कार्यक्रम हवा होता व त्यानें बहिष्काराचें प्रभावी अस्त्र कॉंग्रेसनें हातीं घ्यावें असा प्रचार सुरू केला. सरकारशीं कसलेंहि सहकार्य करावयाचें नाहीं, येथपर्यंत बहिष्कार व्यापकपणें घालावा अशी नव्या पक्षाची विचारसरणी. उभय पक्षांत असा तंटा सुरू होता. नव्या पक्षाच्या मनांत लो. टिळकांना कॉंग्रेसचे अध्यक्ष करावें असें होतें. पण लोकमान्यांचीं जहाल मतें सुरेंद्रनाथ बानर्जी, भूपेंद्रनाथ बसू प्रभृतींना पसंत नसल्यानें त्यांनीं अध्यक्षपदासाठीं दादाभाईंचें नांव सुचविलें. दादाभाईंची देशसेवाच इतकी मोठी होती कीं त्यांचें नांव पुढें येतांच सर्वच पक्षांनीं त्यास संमति दिली व दादाभाईंनीं अध्यक्ष-पद स्वीकारलें.

शिवाय दादाभाईंचीं अलीकडील भाषणें जहाल म्हणून समजण्या-इतकीं खडखडीत होतीं. दादाभाईंनीं आमंत्रण स्वीकारल्यावर श्री. मोतीलाल घोष यांनीं त्यांना लिहिलें: " आपण अध्यक्षपद स्वीकारलें; आनंद झाला. कॉंग्रेस लोकांच्या वाढत्या आकांक्षा पुऱ्या करण्याला

असमर्थ आहे. तेव्हां धोरणांत कांहीं तरी फरक केला पाहिजे, तसें तुम्ही आपल्या अलीकडच्या व्याख्यानांतून सूचित केलें आहे. आपणच व्यवहार्य असा मार्ग दाखवा. आज कॉंग्रेस संस्था पांच जणांच्या हातचें खेळणें झालें आहे. बहुजनसमाजाला त्याचें ज्ञानहि नाहीं. तेव्हां सर्वांचा समावेश होईल अशी योजना आंखणें इष्ट झालें आहे. ''

दादाभाई भारतांत येण्यास निघणार म्हणून 'फ्रेन्डस् ऑफ इंडिया' यांनीं त्यांना मेजवानी दिली. वेडरबर्न हे अध्यक्ष होते. त्यांनीं व सॅम्युअल स्मिथ यांनीं गेलीं पन्नास वर्षें दादाभाईंनीं हिंदुस्थानची स्थिति सुधारावी म्हणून कसे जिवापाड परिश्रम केले हें मोठ्या भावनामय भाषेंत सांगितलें. दादाभाई १४ डिसेंबरला मुंबईस उतरले. लोकांनीं त्यांचें अपूर्व स्वागत केलें. कलकत्ता येथें तर उत्साहास नुसता पूर लोटला होता. कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष रासबिहारी घोष होते. दादाभाईंच्या अध्यक्षीय भाषणांत मुख्य व महत्त्वाचा मुद्दा 'स्वराज्य' हा होता. हिंदुस्थानच्या तक्रारीवर एकमात्र उपाय स्वराज्य हाच आहे. अशी टिळकांची घोषणा होती, तर दादाभाई कित्येक दिवसांपासून तीच मागणी करीत आले होते. " ज्याप्रमाणें संयुक्त राज्यांतील राज्यकारभार लोकाभिमुखी चालतो, तसा तो हिंदुस्थानांतहि चालला पाहिजे व हीच आमची मुख्य मागणी आहे. '' असें अध्यक्षीय भाषणांत दादाभाईंनीं सांगितलें. आम्हांस न्याय पाहिजे. मेहेरबानी नको. भारताचीं सर्व दुःखें दूर होण्याला सं. राज्यांत अगर वसाहतींना जसें स्वराज्य आहे, तसें स्वराज्य आम्हांस पाहिजे, असेंहि पुनः पुनः बजावून त्यांनीं सांगितलें. शेवटीं ते म्हणाले: " कल्पनातीत

निराशा होण्यासारखे प्रसंग मीं अनुभवले, परंतु मी निराश मात्र झालों नाहीं. आतां माझें आयुष्य जें काय थोडेंसें राहिलें आहे त्या अवधींत हिंदुस्थानला सन्मानानें स्वराज्य देणें हाच एकमात्र उपाय आहे एवढेंच मला सांगावयाचें आहे.

" वंगभंग ही भयंकर चूक आहे. ती दुरुस्त होईल अशी मला खात्री वाटते. स्वदेशीचा महामंत्र फार उपयोगी पडणारा आहे. शेवटीं मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, ऐक्य अभंग राखा, सतत चळवळ चालू ठेवा व स्वराज्य संपादन करा, म्हणजे सर्व राष्ट्रीय आपत्ति नष्ट होतील. " या कॉंग्रेसमध्यें वंगभंगासंबंधीं बहिष्काराची चळवळ बंगालमध्यें सुरू झाली आहे ती पूर्ण न्याय्य आहे असा ठराव झाला. टिळकांनीं स्वदेशीचा ठराव मांडला. तेव्हां ते म्हणाले : "या कॉंग्रेस-मध्यें दुफळी माजणार म्हणून कित्येक ॲंग्लो-इंडियन पत्रांना हर्षवायु झाला होता. त्यांना कॉंग्रेसमधील ही जूट पाहून वाईट वाटलें, पण हें ऐक्याचें सर्व श्रेय अध्यक्षांना आहे.

पुण्यांतील देशी छत्र्यांचे कारखानदार श्री. कांबळे यांनीं आपल्या कारखान्यांत तयार झालेली एक छत्री या प्रसंगीं अध्यक्षांना अर्पण केली.

" मीं पन्नास वर्षे जी तपश्चर्या केली तिनें आपलें ध्येय निश्चित केलें यांत मला समाधान आहे, " असे दादाभाईंनीं उद्गार काढले.

• • •

## २७. पुनः स्वदेशीं परत

**कलकत्ता** कॉंग्रेस संपतांच दादाभाई लंडनला परत जाऊन पूर्ववत् आपल्या कामास लागले. दादाभाईंची प्रकृति वयोमानाप्रमाणें उत्तम होती. एका वृत्तपत्रीय वार्ताहरानें प्रकृति चांगली कशी राहिली याबद्दल विचारतां ते म्हणाले. " मीं मद्याला व तंबाखूला स्पर्शहि करीत नाहीं. सकाळीं ८॥ ला न्याहारी, ११ ते ७।३० पर्यंत कचेरींतील कामें, नंतर भोजन, सुमारें एक तास चालण्याचा व्यायाम, नंतर मध्यरात्रीपर्यंत काम. माझा भारताशीं पत्रव्यवहार फार मोठा आहे. "

दादाभाईंची प्रकृति एकंदरीनें निकोप असली तरी इतक्या उतार-वयांत त्यांना ही प्रवासाची दगदग सोसली नाहीं. लंडनला येतांच ते आजारी पडले. दादाभाईंनीं आतां सार्वजनिक कामांतून निवृत्त व्हावें अशी त्यांच्या सुहृदांची इच्छा होती व दादाभाईंनीं आपले अखेरचे दिवस मातृभूमींत घालवावे अशी यांच्या आप्तेष्टांची इच्छा होती. परंतु अद्यापि आपलें काम संपलें नाहीं, स्वराज्याचा कार्यक्रम नुकताच आंखलेला आहे त्यांत अद्यापि काम करावयाचें आहे, अशी दादाभाईंना तळमळ लागलेली.

परंतु मनानें कितीहि उचल घेतली तरी शरीर थकत चाललें, तेव्हां सर्वांच्या मतानें दादाभाईंनीं हिंदुस्थानांतच परत जावें असें ठरलें. " लंडन इंडियन सोसायटीनें " एक निरोपाचा मोठा समा-रंभ केला, परंतु त्याला दादाभाईंनीं हजर राहणें अशक्य झालें. त्यांना जरा बरें वाटतांच ते मातृभूमीला परतले. इंग्लंडमध्यें मातृ-

भूमीच्या मुक्ततेसाठीं पन्नास वर्षे सतत झगडणारा हा वीर इंग्लंड कायमचें सोडून स्वगृहीं परतला व वरसोवा या आपल्या पूर्वजांच्या गांवीं जाऊन राहिला. तेथें त्यांच्या मुलीनें (माणकबाई) उत्कृष्ट शुश्रूशा केल्यामुळें त्यांची प्रकृति जरा सुधारली. पण तेथेंहि शेंकडों लोक त्यांच्या भेटीस येत; सल्लामसलत विचारीत; नित्य शेकडों पत्रें त्यांना येत; त्या पत्रांत अनेक प्रकार असत. त्यांचे चरित्रकार श्री. मसानी यांनीं लिहिलेल्या इंग्रजी चरित्रांत त्यांचीं अनेक गमतीदार उदाहरणें दिलीं आहेत. कोणाची कांहीं तक्रार असली कीं तो दादाभाईकडे दाद मागण्यास यावयाचा; जणुं आपल्या घरचा कोणी वडील मनुष्यच! या भावनेनें लोक त्यांजकडे पाहात व तेहि शक्यतों लोकांच्या उपयोगी पडत. ती त्यांची जन्मखोडच होती.

दादाभाई इंग्लंडमधून परत आल्यावर मोर्ले–मिंटो सुधारणा प्रसिद्ध झाल्या. त्यांत विशेष अर्थ नसला तरी प्रगति-पथावरील एक पाऊल या दृष्टीनें दादाभाईंनीं त्यांचें स्वागत केलें. वेडरबर्न यांनीं त्यांना पत्र लिहून आपण आतांपर्यंत चालविलेल्या खटपटीचें हें फळ आहे, तेव्हां आपलेंच स्वागत मी करतों असें लिहिलें. तथापि दादाभाईंचें या सुधारणांनीं मात्र समाधान झालें नाहीं. त्यांनीं लॉर्ड मिंटो व मोर्ले यांना अभिनंदनाचीं पत्रें लिहिलीं त्यांत त्यांनीं असें स्पष्टच लिहिलें कीं, आम्हांस पाहिजे तें अद्याप मिळालें नाहीं. तें प्राप्त झाल्याशिवाय अशा सुधारणा यशस्वी होणार नाहींत. हें पत्र ऐंशी टाईप केलेल्या पृष्ठांचें असून त्यांत त्यांनीं आतांपर्यंतच्या राज्यकारभाराचा आढावा घेऊन इंग्रजी राजवटीपासून हिंदुस्थानची स्थिति कशी शोचनीय झाली आहे हें तपशीलवार लिहिलें.

राजकीय वातावरण दिवसानुदिवस तप्त होऊं लागलें होतें. कर्झन वायलीचा खून पडला होता. असे अत्याचार करूं नका असा दादाभाईंनीं तरुणांना जाहीरपणें उपदेश केला. याच सुमारास दादाभाईंची पत्नी मृत्यु पावली. चिरोल महाशयांनीं त्यांची मुलाखत घेतली त्या वेळीं वरसोवा म्हणजे एक यात्रेचें ठिकाणच झालें होतें. शेंकडों लोंक भेटीसाठीं, दर्शनासाठीं, मुलाखतीसाठीं येत. त्यांचा पत्रव्यवहारहि अखंड चालूच होता. पहिलें महायुद्ध सुरू झालें तेव्हां ब्रिटिश नागरिक म्हणून हिंदी लोकांनीं साहाय्य करावें अशी प्रकट विनंती त्यांनीं केली. त्याचप्रमाणें कॉंग्रेस, द. आफ्रिकेंतील हिंदी लोक या सर्व गोष्टींकडे त्यांचें सारखें लक्ष असे. एकदां लॉर्ड हार्डिंज यांनीं कौन्सिलमध्यें सांगितलें, जगांतील कित्येक देशाच्या मानानें हिंदुस्थानची आर्थिक स्थिति चांगली आहे. दादाभाईंनीं हे विधान वाचतांच (आक्टोबर ८, स. १९१३) रोजीं हार्डिंज साहेबांचें म्हणणें साधार खोडून काढलें. म्हणजे ९० वर्षें वय असतांनाहि किती जागरूकतेनें ते भारत—हित पाहात हें ध्यानीं येईल.

बेझन्टबाईंनीं होमरूल लीग ही संस्था काढली, तिचें अध्यक्षपद दादाभाईंनीं स्वीकारावें असे प्रयत्न सुरू होते. वाच्छाप्रभृतींना ती गोष्ट मान्य नव्हती व त्यांनीं दादाभाईंना तसें कळविलेंहि. बेझन्टबाईंना दादाभाई, वेडरबर्न सुब्रह्मण्यम् अय्यर या सर्वांचेंच साहाय्य हवें होतें. बेझन्टबाईंनीं अध्यक्ष होण्याबद्दल दादाभाईंची मान्यताहि मिळविली. परंतु लीगनें कॉंग्रेसला विरोध करतां कामा नये, अशी अट मात्र घातली. परंतु पुढें त्यांनीं कांहीं कारणानें अध्यक्ष होण्याचें नाकारलें. अशा रीतीनें हा अध्याय संपला.

● ● ●

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## २८. अखेर

स. १९१६ हें वर्ष दादाभाईंना अत्यंत शांततेचें गेलें. या वर्षी दादाभाईच्या आयुष्यांतील एक महत्त्वाची घटना घडून आली ती म्हणजे मुंबई विद्यापीठानें त्यांना 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी देण्याचें ठरविलें. मुंबई विद्यापीठ दीर्घ निद्रेंतून जागें होऊन तिनें दादाभाईंचा गौरव केला असें म्हणण्यापेक्षां दादाभाईंनीं पदवी स्वीकारून विद्यापीठाचाच गौरव केला असें म्हणणेंच उचित आहे. दादाभाईंची प्रकृति अत्यंत क्षीण झालेली; त्यांना मुंबईस येऊन पदवीदानाचा सर्व सोहाळा सहन होईल कीं नाहीं अशी शंका होती. परंतु दादाभाईंनीं मान्यता दिली. ते विद्यापीठांत उपस्थित राहिले, पदवीचा स्वीकार केला. नंतर पेडर रोडवरून मिरवणूक निघून सर्व कार्यक्रम यथासांग पार पडला.

दरम्यान भारतमंत्री व व्हाइसरॉय यांमध्यें वाटाघाटी सुरू होत्या व हिंदुस्थानाला जास्त सुधारणा मिळणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. दादाभाईंनीं आमरण ज्या कार्यासाठीं आपला देह झिजविला, तें कार्य सफल होणार असें दिसूं लागलें. अर्थात् दादाभाईंना आनंद वाटणें स्वाभाविकच होतें. सुधारणा सुरू झाल्याचें आपण पाहावें, अशी त्यांची मनीषा होती. परंतु दैवयोग तसा नव्हता. दि. २० ऑगस्ट १९१७ चा सुधारणांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. तत्पूर्वी ते आजारी पडले. तेव्हां त्यांना वरसोवा येथून खंबाला हिलवरील पालिठाणा हौस येथें नेण्यांत आलें व तेथें आप्तइष्ट जमलेले असतां या राजर्षीनें जून ३० रोजीं शांतपणें आपली इहलोकींची यात्रा संपविली.

दादाभाईनीं देशासाठीं अपरमित कष्ट केले व सर्व देशभर त्यांच्या मृत्यूनें शोकाची छाया पसरली.

• • •

## २९. दादाभाई

ब्रिटिश नोकरशाहीच्या लोखंडी पकडींतून भारत मुक्त झाल्याखेरीज त्याला सुखाचे दिवस लाभणार नाहींत, अशी खात्री पटल्यावर सर्व आयुष्य मातृबंधविमोचनार्थ ज्यांनीं आपल्या आयुष्यांतील क्षण न् क्षण, व देहांतील प्रत्येक श्वास खर्च केला अशा देशभक्तांचें दादाभाई हे मुकुटमणि होते. जन्म गरिबींत झालेला, तेव्हां दारिद्र्याचे चटके कसे बसतात याची पुरापूर कल्पना आलेली; व हें दारिद्र्य येण्याचें कारण तरी काय ? या गोष्टीचा शोध घेतांना, इंग्रजी सत्ता हीच आपत्तीचें कारण आहे अशी खात्री पटल्यानंतर पुढें आलेल्या मोठ्या नोकरीचा मोह बाजूस सारून दादाभाईनीं सर्व आयुष्यभर एकाच ध्येयप्राप्तीसाठीं कष्ट केले.

बालपणापासून सत्यनिष्ठेची पराकाष्ठेची आवड व त्याप्रमाणें वागणें, सर्व व्यसनांपासून दूर व मित्रकार्यासाठीं पदरास खार लावून घेण्याची वृत्ति, हे गुण दादाभाईंत उत्कटत्वानें वास करीत होते. कामा कंपनीचे भागीदार म्हणून ते विलायतेंत प्रथम गेले, तेव्हां कामा कंपनी अफूचा व्यापार करी व या अफूच्या व्यसनामुळें चीन-सारखा देश कसा दीनवाणा झाला आहे, त्या लोकांना व्यसनांत पाडून आपण आपली तुंबडी भरणें इष्ट नाहीं, असें म्हणून त्यांनीं आपल्या भागीदारींतील अफूच्या व्यापारांतील फायद्याला स्पर्शहि केला नाहीं. हें ध्यानीं घेण्याजोगें आहे.

त्याचप्रमाणें लंडनमधील त्यांच्या एका स्नेह्यास दिवाळें काढण्याची आपत्ति आली असें समजतांच आपलें सर्वस्वी नुकसान होणार आहे हें जाणत असतांहि त्याचें संकट दूर केलें; ही मित्रनिष्ठा.

दादाभाई प्रारंभापासूनच पुरोगामी विचाराचे. आज पारशी समाज पुढारलेला दिसत असला तरी दादाभाईंच्या वेळीं तो समाजहि जुन्या कल्पनांनीं भरलेला होता. स्त्रीशिक्षण नव्हतें व दादाभाईंना विलायतेंत शिक्षणासाठीं पाठवावें, असें त्यांच्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉलनें पारशी जमातींतील पुढाऱ्यास सांगितलें तेव्हां विलायतेंत गेला तर तो बाटेल म्हणून पैसा देण्याचें त्यांनीं नाकारलें अशी स्थिति. दादाभाईंनीं या सर्वांच्या मुळावरच आघात केला. प्रथम स्त्रीशिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला व तो यशस्वीपणें सोडविला. स्त्री व पुरुष एकदम भोजनास बसले पाहिजेत अशा शपथा देणारा तरुणवर्ग त्यांनीं निर्माण केला. आज या गोष्टी हास्यास्पद वाटण्याजोग्या आहेत. तथापि त्या वेळीं एकंदर समाजस्थिति कशी होती याची कल्पना यावरून येईल.

यांचें मुख्य कार्य म्हणजे राजकारण. इंग्रज राजवट सुरू झाल्यापासून भारताचें सतत द्रव्यशोषण होत आहे, त्यामुळें दारिद्य, दुष्काळ वाढत आहेत. याचें मूळ कारण म्हणजे राज्यकारभार परकीयांच्या हातीं, स्वदेशीयांना त्यांत स्थान नाहीं. हें पाहून त्यांनीं सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदी लोकांना खुली ठेवून तीं दोन्ही देशांत एकाच वेळीं घेण्यांत यावी यासाठीं जिवाचा आटापिटा केला.

इंग्रज माणूस जात्या लोकसंमत राज्यपद्धतीला अनुकूल व ही गोष्ट ब्रि. पार्लमेंटनें पटवून दिलेली. तेव्हां आपण ब्रिटिश जनतेलाच

हिंदी प्रश्नाचें सत्यस्वरूप समजावून सांगितलें पाहिजे, यासाठीं व्याख्यानें, चर्चा, इत्यादींच्या द्वारें त्यांनीं जिवाचें रान केलें व अखेर सिंहाच्या गुहेंत शिरून त्याची आयाळ उपटावी त्याप्रमाणें त्यांनीं प्रत्यक्ष पार्लमेंटांत शिरून तेथें ब्रिटिश राजनीतीनें भारतांत कसा नंगा नाच चालविला आहे त्याचें चित्र संधि साधेल तेव्हां पुढें करण्यास ते कचरले नाहींत

सतत पन्नास वर्षे देशासाठीं त्यांनीं अपरमित परिश्रम केले. त्याची फलश्रुति मिळावी तशी मिळाली नाहीं, असें त्यांस आढळून आल्यानंतर त्यांचा कल मजूर—चळवळीकडे—समाजवादी पक्षाकडे वळूं लागला, असें आमस्टरडाम परिषदेवरून वाटूं लागतें. त्यांच्या अखेरच्या काळांत मोर्ले-मिंटो सुधारणा प्रकट झाल्या. म्हणजे एका अर्थानें त्यांचें ईप्सित अल्प प्रमाणांत कां होईना साध्य होणार असें वाटूं लागलें होतें व शेवटीं त्यांना हें केवढें तरी समाधान लाभलें !

भारतांतील उच्च श्रेणीचे देशभक्त म्हणून दादाभाईंची गणना करण्यांत येते तें योग्यच आहे. १९०६ च्या कलकत्ता कॉंग्रेसमध्यें ‘ स्वराज्य ’ हें आपलें ध्येय धरून चळवळ करा, सतत चळवळ करा, अखंड चळवळ करा, हें सूत्र त्यांनीं सांगितलें होतें व त्यांच्या हेतूप्रमाणें त्यांच्या मृत्यूपासून अवघ्या तीस वर्षांत भारत स्वराज्यसंपन्न झाला ! दादाभाईंसारख्या निष्ठावन्तांनीं स्वराज्यप्राप्तीसाठीं जी अखंड तपस्या केली तिचें फळ आज आपण उपभोगीत आहोंत व याबद्दल आपण त्यांचें सदैव कृतज्ञच राहिलें पाहिजे.

समाप्त

• • •

परिशिष्ट

## आयुष्यातील महत्त्वाच्या घटना.

| | |
|---|---|
| जन्म | ४ सप्टेंबर १८२५ |
| शिक्षक | १८४७ |
| गणिताचे प्रोफेसर | १८५४ |
| कामा कंपनीचे भागीदार, इंग्लंडची सफर | १८५५ |
| लंडन विद्यापीठ गुजरातीचे प्राध्यापक | १८५६ |
| हिंदी-सिव्हिल सर्व्हिस पाहिजे म्हणून चळवळीस आरंभ | १८५९ |
| बडोद्याचे दिवाण | १८७४ |
| मुंबई महानगरपालिकेचे सदस्य | १८७५ ते ८१ |
| मुंबई कायदेमंडळाचे सभासद | १८८५ |
| काँग्रेसची स्थापना | १८८५ |
| काँग्रेसचे अध्यक्ष (कलकत्ता) | १८८६ |
| पार्लमेंटचे सभासद | १८९२ |
| काँग्रेसचे अध्यक्ष (लाहोर) | १८९३ |
| हेग परिषदेचे सभासद | १८९४ |
| रॉयल कमिशनचे सभासद | १८९५ |
| वेल्बी कमिशनपुढें साक्ष | १८९७ |
| काँग्रेसचे अध्यक्ष (कलकत्ता) | १९०६ |
| परत मातृभूमींत | |
| निर्याण | |

IRBK-0105657